CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, २२ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २०४ | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



समाजाने विविध संसाधने देऊन आपले जीवन समृद्ध केले. आपणही समाजाची समृद्धी वाढवण्यासाठी काही तरी दान दिले पाहिजे. देशाने उत्तम सुसंस्कृत व सुरक्षित जीवन उपलब्ध करून दिले म्हणून आपणही आपल्या देशाची संस्कृती व सुरक्षा टिकवून ठेवण्यासाठी काही योगदान दिले पाहिजे.

**- स्व. कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# तिजोरीवर पहिला हक्क बळीराजाचाच : मुख्यमंत्री



### आजपासून पावसाळी अधिवेशन

**मुंबई, २१ जून**

कमी पाऊस आणि 'अल निनो'च्या प्रभावामुळे दुष्काळी संकटाच्या पार्श्वभूमीवर, सरकारी तिजोरीवर पहिला हक्क या राज्यातील बळीराजाचाच आहे,' अशी ग्वाही देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे स्पष्ट केले आहे.

यंदाच्या अधिवेशनात शेती आणि शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक मोठे निर्णय घेतले जाणार असून, महिलांना 'शेतकरी' म्हणून अधिकृत दर्जा देणारे महत्त्वपूर्ण विधेयक या अधिवेशनात मांडले जाणार असल्याची मोठी घोषणा यावेळी करण्यात आली. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या चहापाननंतरच्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यातील कृषी स्थिती, अल निनोचे संकट आणि कर्जमाफी यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सवस्तिर माहिती दिली.

यंदाच्या पावसाळी अधिवेशनात एकूण १० नवीन विधेयके मांडली जाणार आहेत. यातील सर्वात महत्त्वाचे पाऊल म्हणजे महिला शेतकऱ्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी सरकार कटिबद्ध असून, त्यांना अधिकृत 'शेतकरी दर्जा' देणारे विधेयक आणले जाणार आहे. सुनेत्रा पवार यांनी या नर्णियाचे महत्त्व अधोरेखित करत, महिलांच्या सक्षमीकरणासाठी हे मोठे पाऊल असल्याचे सांगितले.



पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित चहापान कार्यक्रमाला उपस्थित असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि मंत्रिमंडळातील सहकारी

**अल निनोचे संकट आणि पेरण्यांबाबत आवाहन**

राज्यावर, विशेषतः विदर्भात पावसाचे मोठे संकट आहे. विदर्भात सरासरीच्या तुलनेत तब्बल ८० टक्के पाऊस कमी झाला आहे. 'अल निनो'च्या प्रभावामुळे नर्माण झालेल्या या परस्थितीची सरकारने गंभीर दखल घेतली असून, आवश्यक ती सर्व पूर्वतयारी केली जात आहे. देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, त्यांनी घाई न करता केवळ 'सरकारी आणि हवामान खात्याच्या सल्ल्यानुसारच' पेरण्या कराव्यात, जेणेकरून दुबार पेरणीचे संकट ओढवणार नाही.

एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून विरोधकांना थेट आव्हान दिले. 'सरकारी तिजोरीवर पहिला अधिकार बळीराजाचा आहे. या सरकारने शेतकऱ्यांना किती हजार कोटींची मदत केली आणि विरोधकांच्या काळात किती मदत मिळाली, यावर त्यांनी आमनेसामने येऊन चर्चा करावी,' असे आव्हान त्यांनी दिले. गेल्या दीड वर्षात घेतलेल्या ३०० हून अधिक नर्णियांपैकी बहुतांश नर्णिय शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या हिताचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. (तभा वृत्तसेवा)

### कर्जमाफीवरून विरोधकांना चपराक

शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, 'बँका वाचवणे हे अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे असले, तरी आमची कर्जमाफी ही मुळात शेतकऱ्यांसाठीच आहे. विरोधकांना कर्जमाफीवर बोलण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. मविआ सरकारच्या काळात केलेल्या दोन्ही कर्जमाफी योजना फोल ठरल्या होत्या. जर त्यांनी खरोखरच सातबारा कोरा केला होता, तर आम्हाला नव्याने कर्जमाफी करण्याची वेळ का आली,' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच,विद्यमान सरकारच्या कर्जमाफी योजनेत जाचक अटी नसून, ती प्रक्रिया 'मविआ'पेक्षा अत्यंत सोपी आणि पारदर्शक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करा

### विरोधकांची मागणी; सरकारच्या चहापानावर बहिष्कार

**मुंबई, २१ जून**

राज्यातील महायुती सरकारचा कारभार पूर्णपणे अपयशी ठरला असून जनतेच्या प्रश्नांबाबत हे सरकार असंवेदनशील असल्याचा आरोप करत, महाविकास आघाडीने (मविआ) विधिमंडळ पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या सरकारच्या पारंपरिक चहापानावर बहिष्कार टाकला. तसेच, सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी फसवी असून शेतकऱ्यांचा ७/१२ थेट कोरा करावा, अशी आक्रमक मागणी मविआच्या नेत्यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

दुष्काळ, शेतकरी प्रश्न, महिलांवरील वाढते अत्याचार, बिघडलेली कायदा-सुव्यवस्था आणि अमली पदार्थांचा वाढता सुळसुळाट यांसारख्या गंभीर प्रश्नांकडे सरकारचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे सांगत महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी सरकारवर सडकून टीका केली.

विधान परिषदेचे काँग्रेस गटनेते सतेज पाटील यांनी सरकारवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले. 'हे महायुतीचे सरकार नसून '५६ टक्के कमिशन' घेणारे सरकार आहे,' अशी घणाघाती टीका त्यांनी केली. राज्यात कंत्राटदारांना त्यांची बिले मिळवण्यासाठी मोठे कमिशन द्यावे लागत असल्याचा आरोप त्यांनी केला. कंत्राटदारांची तब्बल १ लाख कोटी रुपयांहून अधिक बिले प्रलंबित आहेत. जल जीवन मिशनच्या निधीतही कपात झाल्याने विकासकामे रखडली आहेत. दुसरीकडे राज्यावरील कर्जाचा बोजा साडेनऊ लाख कोटींवर पोहोचला आहे, असे सतेज पाटील म्हणाले.

**कोरडा दुष्काळ जाहीर करा : भास्कर जाधव**

शिवसेनेचे गटनेते भास्कर जाधव यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून सरकारला धारेवर धरले. राज्यात दुष्काळाचे संकट असून पेरण्या लांबल्या आहेत. शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत असताना सरकारने तत्काळ 'कोरडा दुष्काळ' जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली. सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी अटी आणि शर्तींमध्ये अडकली असल्याची टीका त्यांनी केली. (तभा वृत्तसेवा)

### आक्रमक भूमिका घेणार

राज्यातील १३ कोटी जनतेच्या हिताचे प्रश्न सोडवण्याची व त्यावर चर्चा करण्याची सरकारची तयारी नसल्यानेच या औपचारिक चहापानाला उपस्थित राहणे योग्य नसल्याचा निर्णय मविआने घेतला आहे. तसेच, उद्यापासून सुरु होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात जनतेचे हे सर्व मुद्दे विरोधक आक्रमकपणे मांडणार असल्याचा इशारा महाविकास आघाडीने दिला आहे.

## महत्त्वाचे

### जदयूच्या अध्यक्षपदी पुन्हा नितीशकुमार



**पाटणा :** जनता दल युनायटेड (जदयू) पक्षाची राष्ट्रीय बैठक रविवारी पाटणा येथील राज्य मुख्यालयातील कर्पूरी सभागृहात पार पडली. यावेळी नितीश कुमार यांची चौथ्यांदा राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या नियुक्तीला मंजुरी देण्यात आली. त्यांना आवश्यकतेनुसार पक्षाच्या घटनेत योग्य दुरुस्त्या करण्याचे अधिकार देण्यात आले. बैठकीनंतर जदयूचे राष्ट्रीय प्रवक्ते राजीव रंजन सिंह यांनी पत्रकारपरिषदेत सांगितले की, सम्राट चौधरी यांचे सरकार नितीश कुमार यांच्या 'सात निश्चय भाग-३' च्या योजनांची अंमलबजावणी करत आहे. माजी मुख्यमंत्री यावर खूप खूश असून त्यांनी रालोआ सरकारचे अभिनंदन केले.

### तुषार मेहता यांना मुदतवाढ

**नवी दिल्ली :** तुषार मेहता यांना पुन्हा तीन वर्षांसाठी महान्यायाभिकर्ता म्हणून नियुक्त करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. त्यांची नियुक्ती १ जुलैपासून प्रभावी असेल. त्यांची तिसऱ्यांदा फेरनियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी दोन वेळा त्यांचा कार्यकाळ वाढवण्यात आला होता. मेहता यांनी अतिरिक्त महान्यायाभिकर्ता म्हणून सेवा दिल्यानंतर ऑक्टोबर २०१८ मध्ये त्यांना महान्यायाभिकर्ता म्हणून नियुक्त करण्यात आले होते.



### काय बघतोस असे म्हणत काचेच्या बाटलीने मारहाण

**सोलापूर, दि.२१ जून-**

तू काय बघतोस असे म्हणून एका तरुणाला काचेच्या बाटलीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जखमी करण्यात आल्याची घटना घोंगडे वस्ती येथे घडली. आकाश अशोक जमादार (वय-२५, रा.घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) असे त्या तरुणाचे नाव आहे. शनिवारी रात्री ८ वाजता घोंगडे वस्ती येथे तक्रार चालू असताना तो समोर थांबला होता. त्यावेळी तू काय बघतोस, असे म्हणत दिनेश येमूल, ब्रिजेस येमुल व इतर दोन जणांनी मारहाण केली. उपचाराकरिता नातेवाईक लक्ष्मण नाटीकर यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# विधान परिषद निवडणूक निकाल आज

### ११ उमेदवारांच्या भविष्याचा लागणार निर्णय, मतमोजणीची तयारी पूर्ण

**मुंबई, २१ जून**

राज्य विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १७ पैकी सहा जागांवर महायुतीने मतदानापूर्वीच बिनविरोध विजय मिळवला, तर ११ जागांसाठी झालेल्या निवडणुकीचा निकाल सोमवारी लागणार आहे. बहुचर्चित निवडणुकीची मतमोजणी सकाळी १० वाजतापासून संबंधित मतदान केंद्रावर होईल आणि दुपारी २ वाजेपर्यंत निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे.

या निवडणुकीत अमरावती मतदारसंघात काँग्रेसमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला. पक्षाने आपल्या सदस्यांना मतदानात तटस्थ राहण्याचा 'व्हीप' (पक्षादेश) बजावला होता. मात्र, काँग्रेस नगरसेवकांनी तो धुडकावून लावत मतदानात भाग घेतला. दुसरीकडे, नाशिक आणि भंडारा-गोंदिया या मतदारसंघांमध्ये मतदारांनी १०० टक्के मतदानाचा हक्क बजावला.

छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघात ६३७ पैकी ६३० मतदारांनी मतदान केले. येथे महायुतीचे सुहास शिरसाठ, महाविकास आघाडीचे गणेश लोखंडे आणि अपक्ष उमेदवार इसाक खान सांडू खान यांच्यात तिरंगी लढत आहे. अमरावती आणि छ. संभाजीनगर-जालना मतदारसंघात यावेळी चुरशीची लढत आहे. रविवारी निवडणूक अधिकाऱ्यांनी मतमोजणी केंद्रांवर पाहणी केली. मतमोजणीसाठी अधिकारी, कर्मचारी मतमोजणी केंद्रावर तैनात करण्यात आल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी विनय गौडा यांनी सांगितले.

**असा ठरणार विजयाचा 'कोटा'!**

या निवडणुकीत विजयाचे गणित थोडे वेगळे असते. विजयी होण्यासाठी एकूण वैध मतांच्या ५० टक्के अधिक एक मत असा 'विजयाचा कोटा' निश्चित केला जातो. पहिल्या पसंती क्रमाच्या मतमोजणीत हा कोटा पूर्ण न झाल्यास, दुसऱ्या पसंतीची मते मोजली जातात. जर सर्व मते वैध ठरली, तर विजयासाठी ३१० मतांचा कोटा लागेल. मात्र, मते अवैध ठरल्यास हा कोटा कमी होऊ शकतो. (तभा वृत्तसेवा)

### तरुणाने बाळगला धारदार कोयता; पोलिसांनी त्यास घेतले ताब्यात

**बार्शी दि.२१ जून-**

एका तरुणाने धारदार कोयता बाळगल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्यास ताब्यात घेत कॉन्स्टेबल बाळासाहेब श्रीमंत होरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केले. ही घटना बार्शी शहरातील अलीपूर रोड येथील माऊली चौक परिसरात घडली. प्रवीण अशोक शिवशरण (वय-२१, रा.त्रिमूर्ती चौक, उपळाई रोड, बार्शी) असे त्या तरुणाचे नाव आहे. रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास डायल ११२ नियंत्रण कक्षाकडे मदतीसाठी आलेल्या कॉलच्या अनुषंगाने कॉन्स्टेबल होरे यांच्यासह माने, साळवे, शहाणे आदींचे पथक माऊली चौक, अलीपूर रोड परिसरात दाखल झाले. तेव्हा, पारधी कॅम्प परिसरात एक संशयित युवक थांबलेला दिसला. त्याची चौकशी सुरु केल्यावर असता सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याजवळ एक धारदार कोयता आढळून आला.

# गोकुळ शुगरने ऊस बिल थकविल्याने कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जून-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील गोकुळ शुगरने ऊस बिल थकविल्याने कर्जबाजारी झालेल्या एका शेतकऱ्याने तणनाशक प्राशन करुन आत्महत्या केली. रामचंद्र अप्पाशा कळके (वय-५०, रा.मुस्ती, ता.दक्षिण सोलापूर) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

यातील मयत शेतकरी रामचंद्र कळके यांची मुस्ती येथे शेती आहे. त्यांनी धोत्री येथील गोकुळ शुगर कारखान्याला ५० टन ऊस दिला होता. मात्र, त्याचे बिल वेळेत न मिळाल्याने त्यांच्यावर कर्जाचा डोंगर वाढत गेला. या मानसिक तणावातून त्यांनी दि.१८ जून रोजी रात्री राहत्या घरी तणनाशक औषध प्राशन केले होते.

याचा त्रास होऊ लागल्याने भाऊ सूर्यकांत कळके यांनी त्यांना दि.१९ जून रोजी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान दि.२१ जून रोजी त्यांचा मृत्यू झाला. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

गोकुळ शुगरकडील सभासदांची तब्बल १३० कोटी रुपयांची ऊस बिले थकीत आहे. यासंदर्भात सोलापुरात आंदोलन करण्यात आले होते. १५ दिवसांच्या आंदोलनानंतर अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन थकबाकी मिळवून देण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आले.

# खासदार ओमराजे निंबाळकर यांचा शिवसेनेत जाण्याचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि.२१ जून-**

जिल्ह्याच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला. गोवर्धनवाडी येथे आयोजित केलेल्या कार्यकर्ता मेळाव्यात खासदार ओमराजे निंबाळकर यांनी आपल्या राजकीय भूमिकेबाबत बोलताना विकासकामांना गती देण्यासाठी आणि निधी मिळविण्यासाठी सत्तेची साथ हवी असते. त्यामुळे मी जो निर्णय घेईन, त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसोबत जाण्याचा आपण निर्धार केला आहे.



राजकीय प्रतिस्पर्ध्यांशी तडजोडीच्या चर्चांवर भाष्य करताना त्यांनी आपल्या खास शैलीत उत्तर देताना ते म्हणाले, 'मी कोणाच्या मांडीला मांडी लावून बसणार नाही, तर त्यांच्या उरावर जाऊन बसण्यासाठी निर्णय घेत आहे.' आपल्या राजकीय भूमिकेशी कोणतीही तडजोड करणार नाही. स्व.पवनराजे निंबाळकर हत्याकांड प्रकरणात मी स्वतः खासदार असूनही आपल्याच कुटुंबाला न्याय मिळवून देऊ शकलो नाही तर सामान्य नागरिकांचे काय? असा उद्विग्न सवालही त्यांनी उपस्थित केला. स्व.पवनराजे निंबाळकर हत्याकांड प्रकरणाच्या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपणाशी संपर्क साधला. केवळ राजकीय गणित नसून विकास आणि जनतेच्या प्रश्नांसाठी सत्तेची ताकद आवश्यक असते यासाठी आपण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत जाण्याचा निर्णय घेतला आहे. सत्तेच्या माध्यमातूनच अनेक प्रश्न मार्गी लावता येतात. शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या विकासकामांसाठी प्रभावीपणे काम करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# सागरी क्षमताच निर्णायक घटक : पंतप्रधान

**कोलकाता, २१ जून**

देशाच्या आर्थिक आणि सामरिक प्रभावासाठी मजबूत सागरी क्षमता हा निर्णायक घटक आहे, हे भारत चांगल्या प्रकारे समजतो व त्यासाठी तयारी करीत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सांगितले.

संरक्षण क्षेत्रात भारताला केवळ शस्त्रखरेदी करणारा देश म्हणून राहायचे नाही आणि देशाची संरक्षण दले केवळ एक बाजारपेठ असू शकत नाही, असे त्यांनी येथील श्यामाप्रसाद मुखर्जी बंदरावर स्वदेशी बनावटीच्या तीन युद्धनौकांचे लोकार्पण करताना स्पष्ट केले. आपल्या क्षमतांची ओळख आपल्या स्वावलंबनात आहे, जगासाठी केवळ एक बाजारपेठ बनण्यात नाही. काही वर्षांपूर्वी

### नौदलाच्या तीन नौकांचे जलावतरण



'आयएनएस विक्रांत' ही विमानवाहू नौका सेवेत दाखल करून भारताने आपली सागरी क्षमता सिद्ध केली, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

मागील काही वर्षांत ४० पेक्षा जास्त युद्धनौका आणि पाणबुड्या सेवेत दाखल करण्यात आल्या आहेत. तसेच ४५ मोठ्या नौदलाच्या मंचांचे (नौदलाच्या मोठ्या यंत्रणांचे) बांधकाम सुरू आहे. सागरी सामर्थ्याशिवाय कोणताही देश मोठी शक्ती बनू शकत नाही. विकास, सुरक्षा आणि समृद्धी यांचा संबंध समुद्राशी जोडलेला आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

नरेंद्र मोदी यांनी स्वदेशी बनावटीची शत्रूच्या रडारला गुंगारा देण्याची क्षमता असलेली युद्धनौका 'दुनागिरी', सर्वेक्षण जहाज 'संशोधक' आणि उथळ पाण्यातील पाणबुडीविरोधी नौका 'अग्रय' कार्यान्वित केली. आघाडीचे मंच सागरी युद्ध, जलमापन सर्वेक्षण आणि पाणबुडीविरोधी युद्ध या क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण कार्यात्मक क्षमतांचे प्रतिनिधित्व करतात, असे मोदी यांनी सांगितले.

या सोहळ्याला उपस्थित असलेल्या मान्यवरांमध्ये पश्चिम बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी, मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी आणि भारतीय नौदल प्रमुख अॅडमिरल कृष्ण स्वामीनाथन् यांचा समावेश होता. या जहाजांची रचना भारतीय नौदलाच्या वॉरशिप डिझाईन ब्युरोने केली असून, कोलकाता येथील संरक्षण सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम असलेल्या गार्डन रीच शिपबिल्डर्स अॅण्ड इंजिनिअर्स लिमिटेडने त्याची बांधणी केली आहे. (वृत्तसंस्था)

### निर्मितीत २०० पेक्षा जास्त एमएसएमई

या तिनही नौकांमध्ये ७५ टक्क्यांपेक्षा जास्त स्वदेशी घटक आहेत आणि त्यांच्या निर्मितीमध्ये २०० पेक्षा जास्त सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांसह (एमएसएमई) भारतीय उद्योगांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आहे.



# ‘मविआ’चा पाय ब्रेकवर; आमचा ॲक्सिलरेटरवर

## ‘लाडकी बहीण’ योजना सुरूच राहणार | विरोधकांच्या बहिष्कारावर महायुतीचा हल्लाबोल

**मुंबई, २१ जून**
पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राज्याच्या विरोधकांनी नेहमीप्रमाणे चहापानावर बहिष्कार टाकून पळ काढण्याची परंपरा कायम ठेवली आहे. यावर सत्ताधारी महायुतीने जोरदार पलटवार केला असून, महाविकास आघाडीचा पाय ब्रेकवर होता, तर आमचा ॲक्सिलरेटरवर आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना फटकारले. तसेच, ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.

सह्याद्री अतिथीगृहात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विरोधकांच्या आरोपांचा खरपूस समाचार घेतला. कृषी आणि शेतकरी प्रश्नांव्यतिरिक्त राजकीय आणि सामाजिक मुद्द्यांवर सत्ताधाऱ्यांनी विरोधकांची अक्षरशः हवा काढली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचे वाभाडे काढले. विरोधकांकडे सध्या कोणतेही मुद्दे राहिलेले नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून ते तेच पत्र ‘कॉपी पेस्ट’ करत आहेत. पत्रातील एक परिच्छेद तर वर्षानुवर्षे तोच आहे, अशी खिल्ली त्यांनी उडवली. विरोधकांनी आपल्या पत्रात ‘नीट’ परीक्षेचा उल्लेख केला आहे, मात्र आज नीट परीक्षा अत्यंत ‘नीट’ पार पडली आहे, असा मार्मिक टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला.

विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी आकडेवारीसह सडेतोड उत्तर देऊन विरोधकांचा दावा खोडून काढला. ते म्हणाले, परिस्थिती पाहूनच कर्जमाफीचे निर्णय घेतले जातात. समितीच्या शिफारशींनुसारच आम्ही निकष निश्चित केले असून, ३६ हजार ५८६ कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा फायदा तब्बल ५६ लाख शेतकऱ्यांना मिळाला आहे. ‘लाडकी बहीण’ योजनेवर बोलताना सांगण्यात आले की, या योजनेच्या नावावर काही पुरुषांनी पैसे घेतले असले, तरी पात्र महिलांसाठी ही योजना कधीही बंद होणार नाही. केवायसी पूर्ण झालेल्या महिलांचा एकही हप्ता थकलेला नाही. ◂ (तभा वृत्तसेवा)

### ‘उबाठा’म्हणजे ओसाड गावाची पाटीलकी

मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधत म्हटले की, ओसाड गावाची पाटीलकी सोडतो, असे म्हणणे कितपत योग्य आहे? शिवसेना हा बाळासाहेबांचा विचार आहे. उद्धव ठाकरेंनी जेव्हा तो विचार सोडला, तेव्हा एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सर्वजण एकत्र आले. आता ठाकरेंसाठी खूप उशीर झाला आहे. तसेच महायुतीत ‘केवळ भावकी आहे, कुठलाही वाद नाही’, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### संवादातून मार्ग काढावा : सुनेत्रा पवार

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी लोकशाहीत संवादाचे महत्त्व अधोरेखित केले. जनतेच्या हितासाठी संवाद महत्त्वाचा आहे. विरोधकांनी बहिष्कार घातला असला तरी त्याचा काहीही उपयोग नाही. चर्चा करूनच मार्ग काढण्याची आमची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### बांगलादेशी घुसखोरांवर कठोर कारवाई

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न सोडवणे आता अधिक सोपे झाले आहे, कारण तिथे आता भाजपाचे सरकार आहे. त्यामुळे घुसखोरांना डिपोर्ट करण्याची (परत पाठवण्याची) प्रक्रिया अधिक जलद होईल. अमली पदार्थ हे माओवादानंतरचे दुसरे मोठे आव्हान असून देशाच्या गृहमंत्र्यांच्या घोषणेनुसार अमली पदार्थांच्या विरोधात धडक कारवाई करून ते समूळ नष्ट केले जाईल.



राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) च्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांची कन्या व ज्येष्ठ नेते शरद पवार यांची नात रेवती आणि श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचे माजी अध्यक्ष उद्योगपती अरुण लखानी यांचे चिरंजीव सारंग यांचा विवाहसोहळा २० जून रोजी मुंबईत पार पडला. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत तसेच देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले राजकीय नेते, बॉलिवूड अभिनेते, उद्योगपती आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी नवदांपत्यास शुभेच्छा दिल्या.


# रस्ते अपघातात पाच महिन्यांत ६७८८ जण ठार

## पुण्यात सर्वात जास्त घटना

**अनिल कांबळे**

**नागपूर, २१ जून**
राज्यात रस्ते अपघातात दिवसेंदिवस चिंताजनक वाढ होत असून गेल्या पाच महिन्यांत राज्यात १५ हजार ८१९ रस्ते अपघात झाले असून, त्यात ६ हजार ७८८ जणांचा मृत्यू झाला आहे. या रस्ते अपघातांमध्ये १४ हजार १५४ जण जखमी झाले आहेत. राज्यात सर्वाधिक प्राणांतिक अपघात पुण्यात झाले आहेत. येथील ८६५ रस्ते अपघातांत ४१२ जणांचा मृत्यू झाला असून ५६७ जण जखमी झाले आहेत. वाढत्या अपघातांमुळे राज्यातील रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नागपुरात रस्ते अपघातांत मोठी घट झाल्याचे अहवालातून समोर आले आहे.

राज्यातील वाढत्या अपघातांच्या पृष्ठभूमीवर वाहतूक विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्थानिक प्रशासनाने समन्वयाने काम करणे गरजेचे झाले आहे. अपघातांचे प्रमाण कमी करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. राज्यात गेल्या पाच महिन्यांत १५ हजार ८१९ रस्ते अपघात झाले असून, त्यात ६ हजार ७८८ जण ठार झाले आहेत. या रस्ते अपघातांमध्ये १४ हजार १५४ जण जखमी झाले आहेत. पुणे, ठाणे, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर, अहिल्यानगर आणि पिंपरी-चिंचवड या शहरांत प्रामुख्याने अपघातांत वाढ झाली आहे, तर गडचिरोली, नवी



मुंबई, नंदूरबार, बीड, वाशीम आणि चंद्रपूर शहरांत प्राणांतिक अपघातांत घट झाली आहे. रस्ते अपघातांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने गांभीर्याने उपक्रम राबविण्याची गरज आहे.

प्राणांतिक अपघातांच्या बाबतीत पुणे शहर राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे. पुण्यात जानेवारी ते मे या कालावधीत ८६५ अपघातांमध्ये ४१२ जणांचा मृत्यू झाला असून, ५६७ जण जखमी झाले आहेत. वाढती वाहन संख्या, वेगमर्यादांचे उल्लंघन आणि वाहतूक नियमांकडे होणारे दुर्लक्ष ही या परिस्थितीमागील प्रमुख कारणे मानली जात आहेत. दुसऱ्या स्थानावर नाशिक शहर असून, तेथे ५५७ रस्ते अपघातांमध्ये ३८२ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच ८५९ जण जखमी झाले आहेत. नाशिकमध्येही राष्ट्रीय महामार्ग आणि शहरातील प्रमुख मार्गांवरील अपघातांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. तिसऱ्या स्थानावर सोलापूर शहर असून, येथे ५४४ रस्ते अपघातांत ३१४ जणांचा मृत्यू झाला आहे.

### नागपुरात अपघातांमध्ये घट

राज्यातील अनेक शहरांमध्ये अपघातांचे प्रमाण वाढत असताना नागपूर शहरात रस्ते अपघातांच्या घटनांमध्ये तुलनेने घट झाल्याचे दिसून आले आहे. वाहतूक पोलिसांकडून राबविण्यात येणाऱ्या विशेष मोहीम, चौकांमधील सुधारित सिग्नल व्यवस्था, वेगमर्यादा अंमलबजावणी आणि जनजागृती उपक्रमांचा सकारात्मक परिणाम होत असल्याचे मानले जात आहे. नागपुरात ‘ऑपरेशन यू टर्न’ मुळे रस्ते अपघातांवर नियंत्रण मिळाले आहे. पोलिसांनी योग्यप्रकारे जनजागृती केल्यामुळे अपघातांत घट आल्याचे बोलले जाते.

## महत्त्वाचे

### बेपत्ता मृतदेह शोधण्यात यश

**चिपळूण :** जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गणपतीपुळे येथे पर्यटनासाठी आलेल्या आणि समुद्रात बुडून बेपत्ता झालेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाचही तरुणांचे मृतदेह शोधण्यात प्रशासनाला अखेर यश आले आहे. पोलीस प्रशासन, कोस्टगार्ड, जीवरक्षक तसेच स्थानिक नागरिकांनी युद्धपातळीवर राबवलेल्या शोधमोहीमेनंतर पाचही जणांचे मृतदेह हाती लागले. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण गणपतीपुळे परिसरासह बिडकीन गावावर शोककळा पसरली आहे. मृतांमध्ये आदित्य संतोष राऊत, अनिकेत बंडू हिवराळे, आनंद राजू नरवडे, प्रेम दीपक आदमाने आणि यश रामेश्वर कांबळे यांचा समावेश असून, सर्वजण बिडकीन (ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील रहिवासी आहेत. समुद्रातील प्रतिकूल परिस्थिती असूनही सलग प्रयत्न सुरू ठेवण्यात आले. अखेर अथक प्रयत्नांनंतर पाचही तरुणांचे मृतदेह बाहेर काढण्यात यश आले.

### विजयन यांच्या मुलीला ईडीची नोटीस

**तिरुवनंतपुरम :** सीएमआरएल मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडीने केरळचे माजी मुख्यमंत्री पिनारयी विजयन यांची मुलगी वीणा टी. यांना चौकशीसाठी दुसऱ्यांदा नोटीस बजावली आहे. त्यांना २९ जून रोजी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगण्यात आले. ईडीचा आरोप आहे की, वीणाच्या ‘एक्झालॉजिक’ या कंपनीने कोणतीही सेवा न देता सीएमआरएलकडून २.७८ कोटी रुपये घेतले. या प्रकरणात बँक लॉकरचीही तपासणी करण्यात आली. यापूर्वी ईडीने वीणाची १७ जून रोजी त्यांची नऊ तासांहून अधिक काळ चौकशी केली होती.

### एव्हीएस समुहाची मालमत्ता जप्त

**पणजी :** गोव्यातील अवैध लोहखनिज खाण प्रकरणात ईडीने साळगावकर समूह आणि एव्हीएस समुहाची १,०२३.८५ कोटींची जंगम आणि स्थावर मालमत्ता जप्त केली. जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये सिंगापूरमधील मालमत्तांचाही समावेश आहे. लोहखनिजाचे अवैध उत्खनन, विक्री आणि निर्यातीद्वारे अंदाजे २,४९२.९५ कोटींची कमाई झाल्याचे ईडीच्या तपासात उघड झाले.

# डॅमेज कंट्रोलसाठी उद्धव ठाकरे ‘मातोश्री’ बाहेर

## बंडखोर खासदारांच्या मतदारसंघात दौरे

**मुंबई, २१ जून**
शिवसेनेत पडलेली मोठी फूट आणि अनेक खासदारांनी साधलेली फारकत यानंतर आता उद्धव ठाकरे स्वतः डॅमेज कंट्रोलसाठी मैदानात उतरत आहेत. पक्षाला लागलेली गळती थांबवण्यासाठी, उरल्यासुरल्या कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी आणि खिळखिळी झालेली संघटना पुन्हा बांधण्यासाठी ठाकरे यांनी आता थेट बंडखोर खासदारांच्या मतदारसंघांचा दौरा करण्याची रणनीती आखली आहे. या निमित्ताने ठाकरे गटाकडून जनतेशी संवाद साधून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न होणार असून, बंडखोर नेत्यांवर निशाणा साधला जाण्याची दाट शक्यता आहे.

उद्धव ठाकरे यांनी रविवारी ईशान्य मुंबईतील भांडुप येथे दौरा केला. त्यानंतर २७ जून रोजी यवतमाळ आणि हिंगोली या दोन महत्त्वाच्या लोकसभा मतदारसंघांत ठाकरे गटाच्या बैठका पार पडतील. २८ जूनला परभणी आणि धाराशिव, तर २९ जून रोजी शिर्डी येथे जाऊन ते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. आपल्या हातून निसटलेल्या या मतदारसंघांमध्ये पुन्हा एकदा पक्षाची पायाभरणी करण्याचा त्यांचा हा प्रयत्न असणार आहे.

गेल्या काही काळात पक्षाचे अनेक खासदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेल्यामुळे ठाकरे गट राजकीयदृष्ट्या बॅकफूटवर गेला होता. या धक्क्यांमधून सावरण्यासाठी आणि नैराश्य आलेल्या कार्यकर्त्यांना पुन्हा सक्रिय करण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी थेट जनतेच्या दरबारात जाण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या मतदारांनी या खासदारांना निवडून दिले, त्यांच्याकडे जाऊन सहानुभूती मिळवण्याचा आणि ‘बंडखोरांनी कसा विश्वासघात केला’ हे पटवून देण्याचा त्यांचा मुख्य अजेंडा या दौऱ्यात असणार आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

# गोवंशीय प्राण्यांचे अवशेष सापडल्याने हिंदुत्ववादी संघटना आक्रमक

**रत्नागिरी, २१ जून**
रत्नागिरीत दीड टन गोमांस सापडल्याच्या अनुषंगाने पुढील दिशा ठरवण्यासाठी सोमवार २२ जून रोजी सायंकाळी साडेसहा वाजता रत्नागिरी शहरातील पतीत पावन मंदिर येथे हिंदुत्ववादी संघटना आणि बांधवांच्या बैठकीचं आयोजन करण्यात आले असून येथे पुढील नियोजन ठरवण्यात

रत्नागिरी शहरात आतापर्यंत चारवेळ गोवंशीय प्राण्यांचे अवयव आणि मांस सापडून आलेले आहे. २०२४ मध्ये हिंदू संघटनाकडून या विरोधात मोठे आंदोलन करण्यात आले. परंतु पोलीस प्रशासनाकडून त्याची गांभीर्याने दखल घेण्यात आलेली नाही.

त्यामुळेच यातील सूत्रधार आणि त्यांचे हस्तक मोकाट सुटले आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासन काय करते हा प्रश्न हिंदू संघटनाना पडलेला आहे.

रत्नागिरी तालुक्यातील फणसवळे गावात गुरांच्या कत्तलीचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, गावाच्या हद्दीत बेवारस स्थितीत गुरांचे अवयव आढळून आल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# योग मानवतेला जोडणारी शक्ती : मोदी

**कोलकाता, २१ जून**
पश्चिम बंगाल ही रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांसारख्या संतांची भूमी आहे. त्यांनी जगभरात योग संदेश पसरवण्यास मदत केली. या पवित्र भूमीवर सामूहिक योगाभ्यास केल्याने एक अनोखा आध्यात्मिक अनुभव मिळतो. योग हे केवळ शारीरिक श्रमाचे साधन नाही, किंवा ते कोणत्याही विशिष्ट वयोगटापुरते मर्यादित नाही. योग हा चेतना आणि ऊर्जेसह मानवी जीवनाचा प्रकाश असून, मानवतेला जोडणारी शक्ती असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी केले. यावेळी त्यांनी नागरिकांसोबत योगासने केली.

पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथील प्रसिद्ध ‘रेड रोड’वर योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना मोदी म्हणाले, आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त परदेशातील २१० हून अधिक भारतीय दूतावासांनी जगभरातील सुमारे २,५०० ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन केले. देशभरातील १०० नामांकित सांस्कृतिक आणि ऐतिहासिक स्थळांवर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले. योगामुळे लोकांना वाढत्या वयातही तरुण आणि निरोगी राहण्यास मदत होते. योगाभ्यासामुळे सतत शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना मिळते. योग मानवी जीवनाला सतत विकासाच्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा देऊ शकतो. लोकांनी वाढत्या वयानुसार अधिक लवचिक, उत्साही आणि बलवान बनण्याचे ध्येय ठेवायला हवे. वयाच्या २० व्या वर्षापेक्षा वयाच्या ४० व्या वर्षी अधिक लवचिक, वयाच्या ३० व्या वर्षापेक्षा वयाच्या ५० व्या वर्षी अधिक उत्साही आणि वयाच्या ४० व्या वर्षापेक्षा वयाच्या ७० व्या वर्षी आजारांशी लढण्यास अधिक सक्षम असणे, हे आपले ध्येय असले पाहिजे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संपूर्ण देश आणि जग एकजूट झाले आहे. योग म्हणजे लोकांना एकत्र आणणारी आणि मानवतेला जोडणारी शक्ती आहे. ◂ (वृत्तसंस्था)



कोलकाता येथे योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात नागरिकांसोबत योगासने करताना पंतप्रधान मोदी



### काश्मीर ते कन्याकुमारी योगमय

भारतात हिमालयापासून हिंद महासागरापर्यंत, ईशान्य आणि पूर्वेकडील बंगालपासून पश्चिमेकडील सौराष्ट्रापर्यंत, संपूर्ण देश योगाच्या ऊर्जेने भरलेला दिसत आहे. संपूर्ण जग आणि संपूर्ण देश एकमेकांशी जोडलेले दिसत आहेत आणि हीच योगाची शक्ती आहे. योग केवळ निरोगी वृद्धत्वाची हमीच देत नाही, तर तो मानवतेचा पुरस्कार करत जगाला एकत्रही आणतो. योग ही केवळ आपल्या जीवनशैलीसाठीच नव्हे, तर जगाच्या उज्ज्वल भविष्यासाठीही एक गरज असल्याचे मोदी म्हणाले.

# पंढरपूर वारीसाठी श्रींच्या पालखीचे राजवैभवी थाटात प्रस्थान

## हजारो भाविकांनी दिला पालखीला निरोप

**शेगाव, २१ जून**
श्री संत गजानन महाराजांची पालखी पंढरपूर आषाढी वारीसाठी रविवार २१ जून रोजी सकाळी हजारो भाविकांच्या साक्षीने, हरिनामाच्या अखंड गजर आणि भक्तिभावाच्या अविस्मरणीय वातावरणात राजवैभवी थाटात येथून मार्गस्थ झाली. सकाळी ७ वाजता श्री गजानन महाराज संस्थानच्या सेवाधारी विश्वस्तांच्या हस्ते पालखीचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर श्रींचे दर्शन घेऊन सुमारे ७०० वारकरी आणि हजारो भाविकांच्या उपस्थितीत पालखीने श्री मंदिरातून प्रस्थान केले.

ज्ञानोबा-तुकाराम, गजानन महाराज की जय, अशा गगनभेदी जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. सनई-चौघड्यांचा मंगल निनाद, टाळ-मृदंगाचा गजर आणि भगव्या पताका फडकवत चालणार्या वारकऱ्यांमुळे शेगावचे वातावरण भक्तिमय झाले होते. श्रींच्या पालखीला निरोप देण्यासाठी शहरातील प्रमुख मार्गांवर भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

पालखी मार्गावर विविध सेवाभावी संस्थांनी पिण्याचे पाणी, चहा, लिंबू सरबत, मठ्ठा आदींची व्यवस्था करून वारकर्यांची सेवा केली.

ठिकठिकाणी आकर्षक रांगोळ्या काढून पुष्पवृष्टीने पालखीचे स्वागत करण्यात आले. सकाळी १० वाजता पालखी श्रीक्षेत्र नागझरीकडे जात असताना रोहणकार परिवारातर्फे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी वारकर्यांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर सकाळी ११.३० च्या सुमारास श्रीक्षेत्र नागझरी येथे श्री संत गोमाजी महाराज संस्थानचे अध्यक्ष धनंजय पाटील यांच्या हस्ते पालखीचे विधिवत पूजन करून स्वागत करण्यात आले.

पालखीला नागझरीपर्यंत निरोप देण्यासाठी आलेल्या हजारो भाविकांनीही महाप्रसाद ग्रहण केला. नागझरी येथे दिवसभर यात्रेचे स्वरूप आले होते. श्री संत गजानन महाराज आणि श्री संत गोमाजी महाराजांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. ◂ (तभा वृत्तसेवा)



राजवैभवी थाटात पंढरपूरकडे निघालेली श्रींची पालखी

# नांदेड गुरुद्वारासाठी नवा कायदा

## भाटीया समितीच्या शिफारशींना मंजुरी

**मुंबई, २१ जून**
जगप्रसिद्ध ‘दि नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहीब’ चा प्रशासकीय कारभार आता काळाच्या ओघात अधिक सक्षम, पारदर्शक आणि गतिमान होणार आहे. या गुरुद्वारासाठी तब्बल ७० वर्षांपूर्वी (१९५६ मध्ये) तयार करण्यात आलेला जुना कायदा रद्द करून, त्याऐवजी संपूर्ण नवीन कायदा लागू करण्याच्या प्रस्तावाला रविवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागाच्या वतीने हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर केला.

याविषयी अधिक माहिती देताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, नांदेडच्या या ऐतिहासिक गुरुद्वारामध्ये दर्शन घेण्यासाठी देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांच्या संख्येत गेल्या काही वर्षांत प्रचंड वाढ झाली आहे. साहजिकच, प्रशासकीय कामकाजाची आणि व्यवस्थापनाची व्याप्तीही मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. या बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, १९५६ च्या जुन्या कायद्यातील अनेक तरतुदी आता कालबाह्य झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. गुरुद्वाराचा कारभार अधिक उत्तम आणि सक्षमपणे चालवण्यासाठी कायद्यात आवश्यक सुधारणा सुचवण्याकरिता ‘न्यायमूर्ती भाटीया समिती’ची नियुक्ती करण्यात आली होती. या समितीने केलेल्या शिफारशींची दखल घेत राज्य सरकारने जुना कायदा रद्द करून नवा कायदा आणण्याचे निश्चित केले आहे. नव्या कायद्याचे प्रारूपः ‘दि नांदेड शीख गुरुद्वारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहीब अधिनियम, १९५६’ हा कायदा रद्द करण्यात येईल. त्याऐवजी आता ‘दि तख्त सचखंड श्री हजूर अपचलनगर साहीब गुरुद्वारा अधिनियम’ या नव्या नावाने कायद्याचे प्रारूप तयार केले जाणार आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)



मी उद्धव ठाकरे यांच्यावर मुळीच नाराज नाही. आपण पाहतोय गेल्या अनेक दिवसांपासून सत्तेशिवाय कुठलीही कामे होत नाहीत. मी जे काही पाऊल उचलले आहे ते लोकांनी मला ज्या आशेनं खासदार म्हणून निवडून दिलंय, ती त्यांची कामे पूर्ण करायची आहेत.
- **नागेश पाटील आष्टीकर**, खासदार, उबाठा





वडिलांच्या हत्या प्रकरणाचा निकाल लागण्याच्या एक दिवस अगोदर मी दुसऱ्या पक्षात गेल्याची टीका माझ्यावर होत आहे. तसे काही असते तर मी २०२२ मध्येच गेलो असतो. लोकांनी ट्रोल करताना विचार करायला हवा. तीन दिवसांतच मी एवढा वाईट झालो का?
- **ओमराजे निंबाळकर**, खासदार, उबाठा

**१२** नागरिकांचा मृत्यू

**४५** जखमी

# संघर्षविरामातही गाझात इस्रायलचा हल्ला

**लष्कराकडून तोफगोळे-ड्रोनचा मारा**



इस्रायलच्या हल्ल्यानंतर गाझात झालेला विध्वंस

**गाझा, २१ जून**

गाझा पट्टीत अमेरिकेच्या मध्यस्थीने संघर्षविराम होवून सहा महिन्यांपेक्षा अधिकचा काळ झाला असतानाही तेथील परिस्थिती अद्यापही अतिशय भीषण आहे. अशातच दहशतवादी हमासच्या अड्ड्यांना लक्ष्य करत रविवारी पहाटे इस्रायलचे लष्कर आणि वायुदलाने मध्य गाझात जोरदार हल्ले चढवले. यात मुले आणि महिलांसह १२ नागरिकांचा मृत्यू तर, ४५ पेक्षा अधिक जखमी झाले. या हल्ल्यांमुळे युद्धविरामाच्या परिणामकारकतेबाबत आणि गाझामधील सतत बिघडत चाललेल्या मानवी परिस्थितीबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गाझामध्ये युद्धविराम लागू असतानाही हिंसाचार थांबण्याचे नाव घेत नाही. इस्रायली हवाई हल्ल्यांमध्ये दोन महिला, लहान मुले आणि एका पत्रकारसह १२ नागरिकांचा मृत्यू झाला. पॅलेस्टाइन आरोग्य विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, इस्रायली सैन्याने रविवारी पहाटे मध्य गाझात जोरदार हल्ले केले. यात अनेक इमारती, स्थलांतरित नागरिकांसाठी तयार करण्यात आलेले तात्पुरते निवास केंद्रे आणि दोन रुग्णालये उद्ध्वस्त झाले. ऑक्टोबरमध्ये इस्रायल आणि हमास यांच्यात युद्धविराम झाला असला तरी गाझामध्ये जवळपास दररोज इस्रायली हल्ले सुरूच आहेत. युद्धविरामानंतर आतापर्यंत एक हजाराहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. गाझामधील रुग्णालयांच्या माहितीनुसार, तीन इस्रायली हल्ल्यांमध्ये चार जणांचा मृत्यू झाला आणि सुमारे डझनभर लोक जखमी झाले. इस्रायली लष्कराने एका घटनेची चौकशी सुरू असल्याचे सांगितले. तसेच पत्रकार अहमद विशाह हा हमासच्या लष्करी शाखेचा सदस्य होता आणि सैनिकांसाठी धोका निर्माण करत होता, असा दावा इस्रायली लष्कराने केला आहे. हमासचे काही नेते एका इमारतीत लपून असल्याचे गोपनीय माहिती मिळाल्यानंतर हल्ले केल्याची पुष्टी इस्रायलच्या संरक्षण विभागाने केली आहे.

आरोग्य मंत्रालयानुसार, पहिला हल्ला शनिवारी रात्री २ वाजता गाझा शहरातील एका अपार्टमेंटवर झाला. घटनास्थळी ढिगारा आणि रक्ताने माखलेले काँक्रीटचे तुकडे दिसून आले. चार वर्षांची झिना आणि १४ वर्षांची लाना या दोन बहिणींचे मृतदेह शिफा रुग्णालयाच्या शवागारात नेण्यात आले. कोणतीही पूर्वसूचना न देता इस्रायलने क्षेपणास्त्राचा मारा केला.

(वृत्तसंस्था)

## अमेरिकेच्या दबावापुढे झुकणार नाही : बेझलेल स्मोट्रिच

गाझाशिवाय लेबनॉनमध्येही इस्रायलचे हल्ले सातत्याने सुरूच असल्याने इराणच्या अमेरिकेसोबत झालेला शांतता करार धोक्यात आला. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इस्रायलला संयम बाळगण्याचा सल्ला दिला असला तरी, लेबनॉनमधून आपले सैन्य मागे घेण्याची इस्रायलची तयारी नसल्याचे स्पष्ट होत आहे. अशातच इस्रायलचे अर्थमंत्री बेझलेल स्मोट्रिच यांनी म्हटले की, इस्रायली सैन्य पुढील अनेक वर्षांपर्यंत दक्षिण लेबनॉनमधील सुरक्षा क्षेत्रात तैनात राहील. अमेरिकेने किती दबाव आणला तरी माघार घेणार नाही.



## वाटाघाटी करण्याची तयारी

स्मोट्रिच यांनी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हटले की, हिजबुल्लाह आपली शस्त्रे पूर्णपणे खाली ठेवून आत्मसमर्पण करत नाही, तोपर्यंत इस्रायल आपली भूमिका बदलणार नाही. अमेरिका सैन्य माघारीसाठी कोणत्याही औपचारिक मागण्या करेल, अशी अपेक्षा नाही. इस्रायल सुरक्षा क्षेत्रात केवळ तात्पुरत्या तपासणी नाक्यांऐवजी कायमस्वरूपी लष्करी पायाभूत सुविधा आणि तळ विकसित करू शकतो. हिजबुल्लाह माघार घेत नाही, तोपर्यंत आम्ही एक मिलीमीटरसुद्धा मागे हटणार नाही. वाटाघाटी करण्यासाठी आमची तयारी आहे.

# रशियाच्या ताब्यातील क्रिमियावर युक्रेनचा हल्ला

**१६ नागरिकांचा मृत्यू, २८ जखमी, ऊर्जा पायाभूत सुविधांवर ड्रोनचा मारा**



युक्रेनच्या हल्ल्यानंतर क्रिमियातील एका तेल डेपोला भीषण आग लागली

**कीव्ह, २१ जून**

रशियाच्या ताब्यात असलेल्या क्रिमिया आणि क्रास्नोदार प्रांतात युक्रेनने रविवारी पहाटे भीषण हल्ले चढवले. ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य करून ४०० पेक्षा अधिक ड्रोनचा मारा करण्यात आला, यात १६ नागरिकांचा मृत्यू झाला असून, २८ जखमी आहे. विशेष असे की, रशियाची हवाई संरक्षण प्रणाली बहुतांश हल्ले रोखण्यात अपयशी ठरली.

रशियाच्या ताब्यात असलेल्या क्रिमिया आणि क्रास्नोदार या दोन्ही महत्त्वाच्या क्षेत्रांवर मोठे ड्रोन हल्ले चढवून रशियाला मोठा हादरा दिला आहे. ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य करून ड्रोनचा मारा करण्यात आल्याची माहिती युक्रेनच्या संरक्षण मंत्रालयाने एक्सवरील पोस्टमधून दिली. रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने हल्ल्याची पुष्टी करत म्हटले की, युक्रेनच्या हल्ल्यात निष्पाप १६ नागरिकांना जीव गमवावा लागला, तर २८ जखमी आहे. या हल्ल्यात अनेक निवासी इमारतींचे नुकसान झाले असून,. बचावकार्य सुरू आहे. या हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल. या हल्ल्यांमुळे क्रिमियामध्ये इंधनाचे गंभीर संकट निर्माण झाले असून, रशियाला पेट्रोल आणि डिझेल विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्यासारखे टोकाचे पाऊल उचलावे लागले आहे. युक्रेनच्या ड्रोननी केवळ लष्करी तळांनाच नव्हे, तर इंधन पुरवठा साखळीलाही लक्ष्य केले.

**पेट्रोल, डिझेलच्या विक्रीवर बंदी**

क्रिमियाचे गव्हर्नर सर्गेई अक्स्योनोव यांनी समाज पोस्टमध्ये म्हटले की, युक्रेनच्या हल्ल्याच तेल शुद्धीकरण प्रकल्प आणि पायाभूत सुविधांचे नुकसान झाले. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये यासाठी प्रशासनाने पेट्रोल आणि डिझेलच्या विक्रीवर सामान्य नागरिक व खासगी व्यवसायांसाठी बंदी घातली आहे. आता इंधनाचा साठा केवळ सुरक्षा यंत्रणा, आपत्कालीन सेवा आणि महत्त्वाच्या सरकारी कामांसाठीच वापरला जाणार आहे. पर्यटन हंगाम सुरू असतानाच इंधन संकटामुळे स्थानिक नागरिक आणि पर्यटकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे.

**ऑईल टर्मिनलला आग**

क्रास्नोदार क्षेत्रात युक्रेनने एक तेल वाहतूक केंद्र लक्ष्य केले. या हल्ल्यात एका मोठ्या तेल टर्मिनलला भीषण आग लागली. या हल्ल्यात एका प्रवासी फेरीवर असलेल्या एका व्यक्तीचा मृत्यू झाला. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी या हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, आपल्या देशाची सुरक्षा आणि लष्करी ध्येय गाठण्यासाठी हे हल्ले सुरूच राहतील. दरम्यान रशियाच्या वायुदलाने युक्रेनचे २३९ ड्रोन हवेतच नष्ट केल्याचे म्हटले आहे. हल्ल्यांमुळे क्रिमियामधील अनेक भागांचा वीज पुरवठा विस्कळीत झाला आहे.

(वृत्तसंस्था)

## हिरा समूहाच्या २३ मालमत्तांचा लिलाव

**नवी दिल्ली :** मनी लाँड्रिंग प्रकरणात अंमलबजावनी संचालनालयाने (ईडी) हिरा समूहाच्या १५९ कोटी रुपयांच्या २३ मालमत्तांचा लिलाव केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ईडीने ही कारवाई केली. हैदराबाद येथील ईडीच्या विभागीय कार्यालयाने या प्रकरणातील आरोपी नौहेरा शेख, हिरा ग्रुप ऑफ कंपनीज आणि त्यांच्या संबंधित संस्थांच्या २३ स्थावर मालमत्तांचा यशस्वीपणे लिलाव केल्याचे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.


## चित्रपट वार्ता

### 'टॉक्सिक'ची नवी तारीख जाही




**मुंबई :** दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार यश यांच्या बहुप्रतीक्षित 'टॉक्सिक' या चित्रपटाची अखेर नवी रिलीज डेट जाहीर करण्यात आली आहे. काही महिन्यांपासून प्रदर्शनाची प्रतीक्षा वाढत चालली असताना आता चित्रपट २६ ऑगस्ट २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. सुरुवातीला हा चित्रपट मार्चमध्ये प्रदर्शित होणार असल्याची चर्चा होती. मात्र विविध कारणांमुळे त्याचे वेळापत्रक बदलण्यात आले होते. 'फादर्स डे'च्या निमित्ताने यशने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करीत ही घोषणा केली. नव्या रिलीज डेटची निवड सणासुदीच्या काळाला लक्षात घेऊन करण्यात आल्याचे मानले जात आहे.

### 'तू मेरा मामा लगता है'...



**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार सध्या आपल्या आगामी चित्रपटांच्या प्रमोशनमध्ये व्यस्त असून, त्याच्या सहजसोप्या आणि विनोदी स्वभावामुळे तो पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. अलीकडेच विमानतळावर पापाराझींशी झालेल्या त्याच्या मजेशीर संवादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे. विमानतळावर पापाराझींनी त्याला घेरून फोटो काढण्यास सुरुवात केली असता, एका फोटोग्राफरने 'पाजी, तुम्ही कुठे जात आहात?' असा प्रश्न विचारला. त्यावर अक्षय कुमारने आपल्या खास शैलीत उत्तर देत, 'का? 'तू मेरा मामा लगता है'... छोड देगा क्या? असे म्हटले. त्याच्या या विनोदी विधानाने उपस्थितांमध्ये हास्यकल्लोळ झाला.

### समंथा रुथ प्रभू आई होणार?



**मुंबई :** दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री समंथा रुथ प्रभू पुन्हा एकदा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. विविध माध्यमांतील आणि सोशल मीडियावरील चर्चांनुसार, समंथाच्या अलीकडील सार्वजनिक उपस्थितीत तिचा 'बेबी बंप' दिसल्याचे काही व्हिडीओ आणि फोटो व्हायरल झाले असून ती गरोदर असल्याच्या चर्चांना जोर आला आहे. मात्र या संदर्भात अद्याप समंथा किंवा तिच्या कुटुंबीयांकडून कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. अहवालांनुसार, समंथाने अलीकडेच तिच्या नव्या चित्रपटाच्या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी एका कार्यक्रमात सहभाग घेतला होता. या कार्यक्रमादरम्यान ती तिच्या टीमसह आणि पतीसोबत उपस्थित असल्याचे दिसून आले.

# जगभरात हजारो लोकांचा 'योग'

**आरोग्यासाठी भारताच्या प्राचीन पद्धतीचा स्वीकार**



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू



अभिनेत्री शिल्पा शेट्टी

**बीजिंग/वॉशिंग्टन, २१ जून**

आरोग्य आणि सुस्थिती जपण्यामध्ये योगाभ्यासाच्या प्राचीन पद्धतीची भूमिका अधोरेखित करणारे कार्यक्रम विदेशातील भारतीय दूतावासांनी आयोजित केल्यामुळे जगभरातील हजारो योगप्रेमींनी रविवारी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा केला.

२०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने मान्यता दिल्यापासून, २१ जून रोजी जगभरात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा केला जातो. या वर्षीच्या कार्यक्रमाची संकल्पना 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' ही आहे. चीनमधील शांघाय येथील बंड फायनान्स सेंटरमध्ये भारताच्या वाणिज्य दूतावासाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात मुत्सद्दी, शिक्षणतज्ज्ञ, योगसाधक आणि भारतीया वंशाच्या नागरिकांसह सुमारे ४०० लोकांनी सहभाग घेतला.

International Day of Yoga — 21 June

योग ही भारताने जगाला दिलेली भेट आहे, असे सांगत कौन्सिल जनरल प्रतीक माथूर यांनी सर्वांगीण आरोग्य, मानसिक स्वास्थ्य व सक्रिय वृद्धत्व यांना चालना देण्यात त्याची वाढती भूमिका अधोरेखित केली. योग राष्ट्रीय सीमांच्या पलीकडे जातो आणि जगभरातील लाखो लोकांना अधिक आरोग्यदायी व संतुलित जीवनशैली स्वीकारण्यासाठी प्रेरित करतो, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात मार्गदर्शित ध्यानसत्र, मणिपुरी नृत्य सादरीकरण, भारतीय शास्त्रीय संगीताची मैफल आणि योगासनांच्या फायद्यांच्या प्रात्यक्षिकांचा समावेश होता. जपानमध्ये, टोकियोतील ऐतिहासिक सुकिजी होंगन-जी मंदिरात भारतीय दूतावासाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात २१,०० पेक्षा जास्त अधिक योगप्रेमी सहभागी झाले. 'पाऊस असूनही, पाऊस असो वा ऊन, एकत्र करूया योग!' या ब्रीदवाक्यासह हे ठिकाण उत्साहाने भरून गेले होते, असे टोकियोमधील भारतीय दूतावासाने 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. ऑस्ट्रेलियातील कॅनबेरा येथील 'ओल्ड पार्लमेंट हाऊस' येथे 'योग ऑस्ट्रेलिया'चे मुख्य कार्यकारी अधिकारी जोश प्रायोर यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यासाठी मोठ्या संख्येने लोक जमले होते.

(वृत्तसंस्था)



सरन्यायाधीश सूर्य कांत



अमृता फडणवीस




संरक्षणंत्री राजनाथ सिंह



मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



युद्धभूमी रेझांग ला, लडाख

# अमोनिया गळतीमुळे सात महिलांचा मृत्यू

**सागरी खाद्य प्रक्रिया प्रकल्पात दुर्घटना**

**थिरुवल्लूर, २१ जून**

तामिळनाडूतील पेरियापालायम जवळच्या मंजांगरणई येथे सागरी खाद्य प्रक्रिया प्रकल्पात अमोनिया वायूच्या गळतीमुळे बाधित झालेल्या सात महिलांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. या प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर अमोनियाची गळती झाली होती.

गळती होताच एकूण ६७ कामगरांना स्थानिक वैद्यकीय केंद्रांमध्ये तत्काळ दाखल करण्यात आले होते, असे थिरुवल्लूरच्या जिल्हाधिकारी ए. कविता यांनी सांगितले. या दुर्घटनेवर राज्यपाल राजेंद्र आर्लेकर आणि मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी तीव्र दुःख व्यक्त केले.

या दुर्घटनेमागील कारणांचा शोध घेण्यासाठी प्रशासनाने चौकशीचा आदेश दिला आहे. वायू गळती झाल्याची माहिती मिळताच अरक्कोनम् येथील राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक अर्थात एनडीआरएफच्या चौथ्या बटालियनला सतर्कतेचा इशारा देण्यात आला. त्यानंतर चेन्नई येथूनही एनडीआरएफच्या ३० सदस्यांचे पथक घटनास्थळी रवाना करण्यात आले.

अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज एनडीआरएफचे पथक घटनास्थळी पोहोचले. त्यांच्याकडे पर्सनल प्रोटेक्टिव्ह इक्विपमेंट (पीपीई), गॅस डिटेक्शन डिव्हाईस आणि रासायनिक, जैविक, रेडियोलॉजिकल तसेच अणू संकटावर मात करणारी विशेष उपकरणे होती. गॅस गळती नियंत्रित करण्यासाठी आणि प्रभावित क्षेत्र सुरक्षित करण्यासाठी बचावकार्य वेगाने राबवण्यात आले. प्रशासन परिस्थितीवर नजर ठेवून असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

सध्या वेल्स रुग्णालयात ४६ जणांवर उपचार सुरू आहेत आणि २१ जणांना व्यंकेटश्वर रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती जिल्हाधिकारी के. कविता यांनी दिली.

(वृत्तसंस्था)

# बलुचिस्तान, व्याप्त काश्मिरात दडपशाही

**युनिसन जागतिक परिषदेत उपस्थित मानवाधिकाराचा मुद्दा**

**लंडन, २१ जून**

पाकिस्तानमधील मानवाधिकार उल्लंघन आणि अल्पसंख्याकांवरील वाढत्या हल्ल्यांचा जगभरातून निषेध होत असताना ब्रिटनमध्ये आयोजित सार्वजनिक क्षेत्रातील कामगार संघटना युनिसनने आयोजित केलेल्या जागतिक परिषदेत बलुचिस्तानमधील दडपशाहीवर आक्षेप घेत, पाकिस्तान सरकारवर मानवाधिकाराच्या उल्लंघनाचा आरोप केला.

अलिकडील प्रकरणांमध्ये बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनख्वासह व्याप्त काश्मीरात नागरिकांचा गळचेपी सुरू आहे. शांततेत आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर गोळीबार करण्यात आला. हा प्रकार मानवाधिकारचे घोर उल्लंघन असल्याचे युनिसनच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. वार्षिक प्रतिनिधी परिषदेत, कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी बलुच कार्यकर्त्यांना सक्तीने गायब करणे, कायदेशीर प्रक्रियेशिवाय हत्या, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील निर्बंध आणि बलुच याकझेहती समितीच्या (बीवायसी) सदस्यांना ताब्यात घेतल्याबद्दल पाकिस्तानवर टीका केली. बलुच कार्यकर्ते ओमर करीम यांनी हा मुद्दा उपस्थित केला. जगभरातून सुमारे हजार प्रतिनिधी आणि तितकेच निरीक्षक परिषदेला उपस्थित होते. त्यांनी पाकिस्तानातील परिस्थिती अत्यंत धोकादायक असल्याचे नमूद केले. करीम यांनी बलुच समुदायाच्या सदस्यांना जगभरातील कामगार संघटना, राजकीय संघटना आणि मानवाधिकार मंचांशी सक्रियपणे संलग्न होण्याचे आवाहन केले. परिषदेत सहभागी सदस्यांनी बलुचिस्तान, खैबर-पख्तुनख्वा आणि सिंधसारख्या राज्यांमध्ये महिला आणि मुलांवर होणाऱ्या अत्याचारांकडे लक्ष वेधले.

(वृत्तसंस्था)




सार्वजनिक क्षेत्रातील कामगार संघटना युनिसनच्या परिषदेत मत मांडताना पदाधिकारी

## आंदोलनकर्त्यांवरील गोळीबाराचा निषेध

बलुच यकजेहाती समितीचे (बीवायसी) अटकेत असलेले नेते क्वेट्टाच्या हुडा तुरुंगात धरणे आंदोलन करत आहेत. ते एका अपारदर्शक न्यायिक प्रक्रियेला आव्हान देत आहेत. न्यायालयीन कार्यवाही करण्याच्या प्रशासनाच्या निर्णयाविरोधात हे आंदोलन आहे. मात्र तुरुंगात त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना अतोनात यातना दिल्या जात आहे. व्याप्त काश्मीरात आंदोलन करणाऱ्यांवर गोळीबार करणे मानवाधिकाराचे उल्लंघन असून, याचा आम्ही निषेध करत असल्याचे युनिसन सदस्यांनी म्हटले आहे.

## अल्पसंख्यकांवरील हल्ल्यावर चिंता

मरदानमध्ये एका शीख दाम्पत्याच्या हत्येची गंभीर दखल परिषदेत घेण्यात आली. या घटनेचे वर्णन देशभरातील धार्मिक अल्पसंख्यकांच्या सुरक्षेसाठी आणि प्रार्थनास्थळांच्या संरक्षणासाठी गंभीर चिंतेचा विषय म्हणून केले. हत्येच्या घटनेमुळे अल्पसंख्यक हक्क कार्यकर्त्यांमध्ये तीव्र चिंता आहे. पाकिस्तानात सातत्याने अल्पसंख्यकांवर होणारे हल्ले गंभीर चिंतेचा विषय असल्याचे परिषदेत सहभागी झालेल्यांनी म्हटले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# भारताचे 'काटेरी' शेजारी

देशाच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या तृणमूल काँग्रेस पक्षाच्या सरकारला जनतेने सत्तेवरून हाकलून लावल्यानंतर पूर्वोत्तर भारतातील परिस्थितीत झपाट्याने बदल होतो आहे. म्यानमारमधील रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरांचे द्वार असलेल्या पश्चिम बंगालच्या सीमा संरक्षणाच्या दृष्टीने बंदिस्त करण्यात येत असल्याने आपला शेजारी बांगलादेशच्या पोटात दुखू लागले आहे. बांगलादेशात सध्या सत्तेवर भारतविरोधी धोरण असलेल्या पक्षाचे सरकार आहे. परिणामी भारताच्या शत्रूला हाताशी धरून कुरापती करण्याचा डाव बांगलादेशने आखला आहे. या देशाचे पंतप्रधान तारिक रहमान सोमवारी चीनच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात दोन्ही देश १२-१३ करारांवर स्वाक्षरी करणार आहेत. यामध्ये महत्त्वाचा मुद्दा असेल तो तिस्ता नदी जलवाटपाचा. गेल्या अनेक वर्षांपासून हा मुद्दा कायम आहे. शेजारी देशांमध्ये वाद असणे नवीन नाही. पाकिस्तान, चीन, नेपाळ, म्यानमार, बांगलादेश आणि श्रीलंका हे देश सातत्याने भारताच्या विरोधात कुरापती काढत असतात. मोठा भाऊ या नात्याने भारताने कधीही शेजारी देशांसोबत वाद निर्माण होतील, असे पाऊल उचलले नाही. पण, भारताच्या आतापर्यंतच्या शांततापूर्ण, सहिष्णू धोरणाचा फायदा हे शेजारी सतत उचलत आले आहेत. शेख हसीना वाजेद यांना २०२४ मध्ये एका सुनियोजित कटाच्या माध्यमातून सत्तेवरून खाली खेचण्यात आले. भारताचा हस्तक्षेप म्हणा की दबाव म्हणा वा आणखी काही, शेख हसीना कुटुंबासहित सुखरूप आहेत. अन्यथा, त्यांचे वडील शेख मुजीबूर रहमान यांची त्यांच्या कुटुंबीयांसह ज्या प्रकारे हत्या करण्यात आली होती, तसाच प्रकार शेख हसीना यांच्याबाबतीत घडणे अशक्य नव्हते. बांगलादेशचा जन्म भारतामुळे झाला आहे. तरीही बांगलादेशच्या भारतविरोधी म्होरक्यांना भारताच्या उपकाराचे भान राहत नाही. आता पंतप्रधानपदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर तारिक यांनी आपल्या पहिल्या विदेश दौऱ्यासाठी मलेशिया या मुस्लिम देशाची निवड केली. हा दौरा आटोपल्यानंतर ते चीनला जात आहेत. वास्तविक पाहता बांगलादेशला सर्वांत जास्त सहकार्य आणि मदत भारताने केली आहे. चीन आणि मलेशिया हे तसे भौगोलिक अंतराचा विचार केल्यास दूरचे देश. तरीही सुरुवातीच्या दौऱ्यांसाठी मलेशियाची निवड ही मुस्लिम देश, या नात्याने केली असावी तर चीन भेट ही भारतावर दबाव टाकण्यासाठी केली असावी अशी शंका घेण्यास वाव आहे. बांगलादेशवर किंवा अन्य कोणत्याही शेजारच्या राष्ट्रावर नैसर्गिक संकट आले की सर्वप्रथम भारतच मदतीला धावून जातो, हा इतिहास आहे. पण, शेजारी देशांना याचा विसर पडतो. पहिल्या अधिकृत दौऱ्यासाठी मलेशियाची निवड करणे, हा रहमान यांचा नाईलाज असेलही. पण, त्यातून चांगला संदेश जात नाही. मलेशियात लाखोंच्या संख्येने बांगलादेशी कामासाठी जातात. कधी काळी भारत हा त्यांच्यासाठी हक्काचा देश होता. सीमा ओलांडून विनासायास ते भारतात येऊ शकत होते. पण, आता परिस्थिती बदलली आहे. युरोपियन देशांनीही आता मुस्लिम देशांतील नागरिकांना प्रवेश देण्यासाठीचे नियम कठोर करण्यास प्रारंभ केला आहे. मध्यंतरीच्या काळात बांगलादेशचे अर्थकारण सुधारत होते. ते आता एकदम माघारले आहे. अंतर्गत परिस्थिती नाजूक आणि अस्थिर असल्याने बांगलादेशात पाश्चात्त्य देश गुंतवणूक करण्यास इच्छुक नाहीत. बांगलादेशच्या परकीय गंगाजळीत डॉलर्स ओतण्याचे काम परदेशात काम करणारे बांगलादेशी कामगार करीत असतात. आज पूर्वोत्तर आशियाई देशांमध्ये तेथील लक्षावधी कामगार काम करीत आहेत. सर्वाधिक आठ लाख कामगार मलेशियात आहेत. कामगारांच्या मुद्यावरून दोन्ही देशांच्या संबंधात सध्या तणाव आहे. मलेशियातील नोकर भरती प्रक्रियेत गैरप्रकार करून बांगलादेशी कामगार नोकरी मिळवितात, असा मलेशियाचा आरोप आहे. याच मुद्यावरून मलेशियाने जून २०२४ पासून बांगलादेशी स्थलांतरित कामगारांवर बंदी घातली आहे. ही बंदी उठवावी आणि कामगारांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणि मलेशियन कंपन्यांनी बांगलादेशात गुंतवणूक करावी, या उद्देशाने रहमान यांनी सुरुवातीला मलेशियाला प्राधान्य दिले, असे म्हणता येईल. तारिक रहमान गेल्या जानेवारी महिन्यात पंतप्रधान झाल्यानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना भारतभेटीचे निमंत्रण दिले होते. त्यानंतर चीननेही त्यांना बीजिंग दौऱ्याचे निमंत्रण पाठविले. रहमान यांनी पहिल्या विदेश दौऱ्यासाठी भारत-चीनऐवजी मलेशियाची निवड केली. भारतासोबतचे संबंध बिघडल्यानंतर बांगलादेशचे उद्योग संकटात सापडले. शेख हसीना वाजेद यांचे सरकार गेल्यानंतर मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वातील हंगामी सरकारने भारताला बाजूला ठेवून चीनसोबत जवळीक वाढविली. पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात चीनने प्रचंड पैसा ओतला आहे. अर्थात हा सारा पैसा कर्जाच्या रूपाने दिला गेलेला आहे. या सर्व घडामोडींकडे भारत बारीक नजर ठेवून आहे. शेजारी देशांनी चीनसोबत कितीही जवळीक साधली तरी आर्थिक आणि भू-राजकीयदृष्ट्या याचे काहीच परिणाम होणार नाही, अशा मजबूत स्थितीत आज भारत आहे.

कोरोनानंतरची आर्थिक परिस्थिती, युक्रेन-रशिया युद्ध, वर्तमानातील अमेरिका-इराण संघर्ष, या सर्व जागतिक संकट काळातील परिस्थिती ज्या कौशल्याने हाताळली, ते पाहता शेजारी देशांमध्ये घडत असलेल्या कोणत्याही घटनांचा भारतावर आता फार परिणाम होणार नाही. तरीही शेजारी कुरापत करीत असेल तर लक्ष ठेवावे लागतेच. तारिक यांच्या भेटीत चीनसोबत १३ करार होणार आहेत, अशी माहिती बांगलादेशचे परराष्ट्र सचिव असीम आलम सियाम यांनी दिली आहे. चीनसोबत तिस्ता प्रकल्पावरही चर्चा होणार असल्याचे सियाम म्हणाले. समजून घ्यायचे ते हे की, तिस्ता नदीचा प्रश्न भारत, बांगलादेश आणि चीन या तिन्ही देशांच्या भू-राजकीय हितसंबंधांशी जोडलेला आहे. भारताच्या ईशान्येकडील राज्यांसाठी सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या या परिसरात चीनचा वाढता हस्तक्षेप भविष्यात चिंतेचा विषय ठरू शकतो. चीनची नीती ही कधीच केवळ व्यापार आणि गुंतवणुकीपुरती मर्यादित नसते. तो आर्थिक मदतीच्या माध्यमातून संबंधित देशांच्या धोरणांवर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतो, हे श्रीलंकेतील हंबनटोटा बंदराच्या अनुभवातून जगाने पाहिले आहे. नेपाळ, मालदीव आणि पाकिस्तानमध्येही चीनने अशाच प्रकारे आपले आर्थिक आणि सामरिक हितसंबंध विस्तारले आहेत. कोणताही देश आपल्या राष्ट्रीय हितासाठी परराष्ट्र धोरण आखतो, हे स्वाभाविक आहे. परंतु भारताशी शत्रुत्व निर्माण करून चीनच्या छत्रछायेखाली जाणे, हा कोणत्याही दक्षिण आशियाई देशासाठी दीर्घकालीन लाभाचा व्यवहार ठरलेला नाही. पाकिस्तानचे उदाहरण त्यासाठी पुरेसे आहे. चीनकडून अब्जावधी डॉलर्सची मदत मिळूनही पाकिस्तानची अर्थव्यवस्था आज गंभीर संकटात सापडलेली आहे. कर्जाचा डोंगर वाढला असून आर्थिक स्वातंत्र्यावर मर्यादा येत आहेत. दक्षिण आशियातील स्थैर्य आणि शांततेसाठी बांगलादेशने वास्तवाचे भान ठेवणे आवश्यक आहे. १९७१ च्या इतिहासाची आठवण करून देण्याची वेळ भारतावर येऊ नये. पण, सध्या तरी बांगलादेशला तिरकी चाल आवडू लागली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकांत भारताने पाकिस्तानच्या वैरभावाचा, चीनच्या विस्तारवादी महत्त्वाकांक्षांचा, नेपाळच्या राजकीय अस्थिरतेचा, श्रीलंकेच्या बदलत्या भूमिकेचा आणि आता बांगलादेशातील वाढत्या भारतविरोधी प्रवाहांचा सामना केला आहे. भारताच्या वाट्याला सतत काटेरी शेजारीच आले. पण, त्यात भारताचे काही बिघडले नाही, उलट ज्यांनी काटे पेरले, त्यांचेच बिघडले, एवढे तरी बांगलादेशने लक्षात ठेवावे. ■

## दिल्ली दिनांक

# बेगानी शादी में पाकिस्तान दिवाना!

**रवींद्र दाणी**

बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना! उर्दूतील ही एक म्हण आहे. याचा अर्थ म्हणजे दोघांच्या लग्नात तिसराच हर्षभरित! पाकिस्तानचे सध्या तसे झाले आहे. युद्धबंदी करार झाला आहे अमेरिका व इराण यांच्यात. दोघांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत आणि जल्लोष सुरू आहे पाकिस्तानात!

एक दहशतवादी देश असूनही पाकिस्तानला अमेरिका, इस्त्रायल, इराण, लेबनान यांच्यातील युद्ध संपविण्याचे श्रेय दिले जात आहे. ओसामा बिन लादेनला आश्रय देणारा पाकिस्तान साऱ्या जगात अचानक शांतिदूत बनला आहे. विशेष म्हणजे ओसामाने ज्या अमेरिकेवर हल्ला चढविला व नंतर पाकिस्तानात आश्रय घेतला, आता तीच अमेरिका, त्याच पाकिस्तानचा उदोउदो करण्यात धन्यता मानत आहे.

**इस्लामाबाद करार :** अमेरिका-इराण यांच्यातील १४ कलमी करारावर स्वित्झर्लंण्ड या तटस्थ देशात सह्य करण्यात आल्या. तरी हा करार इस्लामाबाद करार म्हणून ओळखला जाणार आहे. पाकिस्तानचे फिल्ड मार्शल असिम मुनीर यांनी पाकिस्तानसाठी ही कामगिरी बजावली आहे. इराणी लष्करातील बड्या अधिकाऱ्यांशी मुनीर यांचे व्यक्तिगत संबंध आहेत. त्याचा वापर करून मुनीर यांनी अमेरिका-इराण यांना या समझोत्यासाठी तयार केले असे समजते. यासाठी मुनीर अनेकदा गोपनीयपणे तेहरानला गेले असेही समजते. या समझोत्याचे काही भाग अद्याप बाकी असले तरी पाकिस्तानने याचे श्रेय घेणे सुरू केले आहे. अरब लीग, ओआयसी म्हणजे ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कंट्रिज यांना जे जमले नाही ते पाकिस्तानने करून दाखविले असा प्रचार पाकिस्तानी माध्यमांनी सुरू केला आहे. ४७ वर्षांपासून अमेरिका-इराण यांच्यात साधी चर्चाही होत नव्हती. पाकिस्तानने ती घडवून आणली व मध्यपूर्वेत शांतता युग सुरू केले असा या प्रचाराचा एकूण रोख आहे.

**होर्मुझ उघडणार :** इराण व ओमान यांच्या मधोमध असणारी होर्मुझ सामुद्रधुनी लवकरच उघडली जाणार आहे. जगाचा २० टक्के तेल व्यापार या सामुद्रधुनीतून केला जातो. होर्मुझची दुहेरी नाकेबंदी झाली होती. प्रथम इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला आणि नंतर अमेरिकेनेही तसाच निर्णय घेतला. अमेरिकेने आपल्या लष्करी शक्तीच्या बळावर ही सामुद्रधुनी बंद केली तर इराणने त्याला लाभलेल्या भौगोलिक अनुकूलतेचा फायदा उठवीत होर्मुझ बंद केली. युद्धबंदीच्या कोणत्याही करारानंतर ही सामुद्रधुनी उघडली जाणे अपेक्षितच होते. त्यामुळे सामुद्रधुनी उघडली जाणे याला कराराचा फार महत्त्वाचा भाग मानला जात नाही. मात्र यासाठी इराण काही शुल्क आकारणार काय हे करारात स्पष्ट करण्यात आलेले नाही. याबाबत परस्परविरोधी बाबी सांगितल्या जात आहेत.

**मुनीर फॅक्टर :** इराणचा आण्विक कार्यक्रम, त्याच्याजवळ असलेले ४६० किलो शुद्ध युरेनियम व भविष्यकाळात इराणने एका मर्यादेबाहेर जाऊन युरेनियम शुद्ध न करणे आणि त्याबदल्यात अमेरिकेने इराणची गोठवलेली संपत्ती मोकळी करणे हा या कराराचा महत्त्वाचा भाग असून, त्यावर ६० दिवसात अंतिम करार केला जाणार आहे. हा या कराराचा खरा गुंतागुंतीचा भाग राहणार आहे. आणि तो लागू करणे एक अवघड भाग राहणार आहे. कारण, दोन्ही देशांमध्ये असलेले अविश्वासाचे संबंध. मात्र, या दोन देशांना जोडणारी समान कडी म्हणजे फिल्ड मार्शल मुनीर. अमेरिका व इराण दोघांनाही पुन्हा एक युद्ध परवडणारे नसल्याने मुनीर यांच्या मध्यस्थीने हा प्रश्न सोडविला जाईल असे मानले जाते. यासाठी मुनीर फार परिश्रम करीत असल्याचे वृत्त पाकिस्तानी माध्यमांनी दिले आहे. भारत-पाकिस्तान यांच्यात मागील वर्षी झालेल्या युद्धापासून मुनीर यांची प्रतिमा पाकिस्तानात, अमेरिकेत आणि मुस्लिम जगतात उंचावली आहे. पाकिस्तानी माध्यमांचा प्रचार हे त्याचे कारण असू शकते.

**युरेनियम, युरेनियम! :** वर्षभरापूर्वी अमेरिकेने इराणवर हल्ला चढविला होता. तेव्हा व आताही इराणचा आण्विक कार्यक्रम हाच वादाचा खरा मुद्दा होता असे सांगितले जाते. बराक ओबामा राष्ट्रपती असताना त्यांनी हे काम एक गोळीही न झाडता केले होते. पण राष्ट्रपती ट्रम्प यांचे जरा वेगळे उद्दिष्ट होते. व्हेनेझुएला या जगातील सर्वांत मोठा तेलसाठा असलेल्या देशात त्यांनी ज्या सहजतेने सत्ता परिवर्तन घडवून आणले, तसेच त्यांना इराणमध्ये घडवून आणावयाचे होते. त्यासाठी सर्वोच्च नेते खामेनी यांना संपविणे आवश्यक होते. खामेनी संपले की इराणचे नेतृत्व संपले असे राष्ट्रपती ट्रम्प यांना त्यांच्या सल्लागारांनी सांगितले असावे. युद्धाच्या पहिल्या दिवशी म्हणजे २८ फेब्रुवारी रोजी खामेनी यांना ठार करण्यात अमेरिकेला यश मिळाले. मात्र अमेरिकेच्या दुर्दैवाने दुसरे खामेनी बचावले. आणि त्यांनीच सारा खेळ पालटला. दुसरे खामेनी कितपत जखमी झाले होते याचा तपशील अद्याप बाहेर आला नसला तरी ते फार जखमी झाले नसावेत असे आता मानले जात आहे. या खामेनीला चीन व रशिया यांनी पूर्ण ताकद दिली. आणि त्याआधारे इराणने अमेरिका व इस्त्रायल यांचा मुकाबला केला.

**नजर तेलावर :** राष्ट्रपती ट्रम्प इराणच्या युरेयिनम शुद्धीकरण प्रकल्पाचा दाखला देत असले तरी त्यांची नजर इराणच्या तेलावर होती. त्यासाठी त्यांना तेथे कठपुतली सरकार हवे होते, जे त्यांना साध्य करता आले नाही. पण, इराणच्या तेलावर चीनने अगोदरच कब्जा केलेला आहे, हे ट्रम्प ओळखू शकले नाहीत. आता त्यांना इराणच्या आण्विक कार्यक्रमाला वेसण घातल्याचे श्रेय घेत या साऱ्या प्रकरणाला पूर्णविराम द्यावयाचा आहे असे दिसते.

**ओबामा आणि ट्रम्प :** बराक ओबामा राष्ट्रपती असताना, अमेरिकेने ओसामा बिन लादेनला पकडून ठार केले व नंतर समुद्रात त्याचे विसर्जन केले. पण, हा निर्णय घेण्यापूर्वी ओबामा यांनी कमालीची काळजी घेतली होती. अबोटाबादच्या हवेलीत वावरणारी व्यक्ती ओसामा बिन लादेन हीच आहे, याची वारंवार खात्री करून घेतल्यानंतर त्यांनी त्या कारवाईला हिरवी झेंडी दाखविली होती. आणि याठिकाणी ट्रम्प यांनी कोणतेही 'होमवर्क' न करता एका युद्धाचा निर्णय घेऊन टाकला. जी चूक राष्ट्रपती पुतिन यांनी केली, तीच राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराणबाबत केली आहे. युक्रेनला चार दिवसांत शरणागतीसाठी भाग पडू असे पुतिन यांना वाटत होते, तर अमेरिकेच्या ताकदीपुढे इराणचा काय निभाव लागणार असे ट्रम्प यांना वाटत होते. पण इराण युद्ध अंगलट येऊ लागल्यावर त्यांनी तेहरानसोबत तह करण्याचा निर्णय घेतला.

**आता पाकिस्तान ? :** राष्ट्रपती ट्रम्प यांची नजर आता पाकिस्तानकडे जाण्याची शक्यता आहे. पाकिस्तानवर आपली पकड मजबूत करण्यासाठी ते फिल्ड मार्शल मुनीर यांना पाकिस्तानच्या सिंहासनावर बसवतील काय? पाकिस्तानातील शाहबाज शरीफ सरकार तसेही नामधारी आहे. सारी सूत्रे मुनीर यांच्या हाती गेली आहेत. आता मुनीर यांनाही राष्ट्रपती होण्याची स्वप्ने पडू लागली आहेत. सारी सूत्रे आपल्या हाती आहेच, मग आता दुय्यम भूमिका कशाला? सत्तेची नशा फार वाईट असते.

अमेरिकेचे एक राष्ट्रपती ट्रूमन यांनी आपल्या एका भाषणात म्हटले होते, सत्ताधीशांच्या पतनाची तीन कारणे असतात- सत्तेचा हव्यास, पैशाची लालसा आणि महिला.

राष्ट्रपती ट्रूमन पुढे म्हणतात, ''माझ्या आयुष्यात एकच महिला आहे आणि सध्या ती माझ्या घरी माझी वाट पाहात आहे, म्हणजे माझी पत्नी.'' फिल्ड मार्शल मुनीर सर्वगुणसंपन्न आहेत. त्यामुळे अमेरिका-इराण यांच्यात घडवून आणलेल्या कराराची नशा त्यांना लवकर चढेल असे मानले जाते. ■

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# मुलींची चूक नाहीच का?

मागील वर्षीच्या पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात मागील वर्षभरात महाराष्ट्रात किती महिला आणि मुली बेपत्ता झाल्या, याची आकडेवारी सांगितली. ही आकडेवारी आहे, ३७ हजार ६९५! ही आकडेवारी केवळ एका राज्याची आहे. सर्व राज्यांची आकडेवारी पाहायला जायचे, तर डोळे पांढरे होतील, इतकी भयावह स्थिती आहे. ही आकडेवारी केवळ महिला आणि मुली बेपत्ता झाल्याची आहे. वर्षभरात किती मुलींवर अत्याचार झाले? किती मुलींना छेडखानीला सामोरे जावे लागले? किती मुलींनी अत्याचारामुळे आत्महत्या केल्या किंवा त्यांच्या हत्या झाल्या? या प्रश्नांची उत्तरे जर आपण मिळवायला लागलो, तर आपल्याला निश्चितच निराशा येईल. त्यामुळेच कदाचित आज आपण वृत्तपत्रांत छापून येणाऱ्या अशा प्रकारच्या बातम्या पाहून न पाहिल्यासारखे करत असू किंवा 'हे नित्याचेच', असे म्हणून वर्तमानपत्र बाजूला ठेवत असू; पण कधीतरी स्वतःच्या मुलींविषयी असे काही झाले तर..? हा प्रश्न आपल्याला निश्चितपणे अस्वस्थ करतो. हा प्रश्न जर आपल्याला अस्वस्थ करत असेल, तर आपण संवेदनशील पालक आहात आणि त्यामुळेच केवळ विचार न करता या समस्येवर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आपण पालकांनी निश्चितच विचार करायला हवा.

सध्या लव्ह जिहादचे प्रकार सातत्याने समोर येत आहेत. आधी फूस लावायची, नंतर प्रेमाच्या जाळ्यात ओढल्यावर धर्मांतर करायला लावायचे, असे प्रकार घडताहेत. कोणत्या समुदायातील लोक कोणत्या मानसिकतेतून हे सर्व करताहेत, हा मुद्दा सर्वांनाच माहिती आहे. पण, यात एका विषयाकडे समाज सोईस्कररीत्या दुर्लक्ष करतोय आणि तो म्हणजे मुलींचे वहावत जाणे. एका विशिष्ट वयापर्यंत मुलींना जपावे लागते, असे आपण पूर्वापार ऐकत आलोय. इथे पालक आणि शिक्षक यांची भूमिका महत्त्वाची ठरते. पण, आता हातातील मोबाईलमुळे मुला-मुलींच्या आकलनाच्या कक्षा प्रचंड विस्तारल्या आहेत. सर्व विषयातील सर्वच ज्ञान ते मोबाईलच्या माध्यमातून मिळवतात. समाज माध्यमांवर अगदी अनोळखी लोकही एकमेकांना फॉलो करतात. तरुण मुलं-मुली प्रोफाईलवर स्वतःचा आकर्षक फोटो ठेवतात. तो फोटो पाहून मैत्रीचे प्रस्ताव येतात आणि ते स्वीकारले जातात. माझे इतके मित्र आहेत, माझे इतके फॉलोअर्स आहेत, हा या वर्गामध्ये प्रतिष्ठेचा विषय असतो. मात्र, आपण ज्यांच्याशी मैत्री करतोय तो मुलगा किंवा मुलगी खरंच मैत्री करण्यास योग्य आहेत का, याचा विचार केला जात नाही. आपण फक्त मुलींच्या बाबतीत हा विचार केला तर १६ ते १८ या वयोगटातील मुली अगदी चांगले नाव, स्टायलिश फोटो पाहूनच हुरळून जातात. मग त्या स्वतःचेही आकर्षक फोटो टाकायला लागतात. मैत्रीला सुरुवात होते. काही जण तर इतके 'क्रेझी' असतात की एकमेकांविषयीच्या अपडेट्स तासा-तासाने देत असतात. या मैत्रीतून मग कधी अधिकार गाजवणे सुरू होईल, हे तिला कळतच नाही. तू हा ड्रेस घालत जा, हा नको घालू, तू अमक्याशी नको बोलू, घरच्यांचे अमुक म्हणणे मनावर नको घेऊ, इथवर सूचना केल्या जातात. गोडीगुलाबीने सुरू होऊन ही मैत्री कोणत्या दिशेने जाणार असते, याची पुसटशी जाणीवही त्या मुलीला तेव्हा येत नाही. जेव्हा जाणीव होते तेव्हा कदाचित उशीर झालेला असतो. नंतर तुम्ही पोलिसात जा किंवा जीवाचे बरेवाईट करा, परिणाम घडून गेलेला असतो. म्हणून सर्वांत महत्त्वाचा मुद्दा कौटुंबिक संवादावरच येऊन थांबतो. कुटुंबात पालक आणि मुले यांच्यात सुसंवाद हवा. मुलीने किंवा मुलाने पालकांना स्वतःहून रोजचे अनुभव सांगणे, ही प्रक्रिया स्वाभाविकपणे घडली पाहिजे. असे झाले तरच मोठे अनर्थ वेळीच टाळले जाऊ शकतात. मुलींनी याबाबतीत सर्वाधिक काळजी घेणे गरजेचे आहे. कारण जी गोष्ट वहावत जाते, ती पुढे जाऊन बुडणार, हे नक्कीच असते. तंत्रज्ञानाचा, संवाद माध्यमांचा वापर जरूर करावा. पण, सोबत आपली विवेकबुद्धी जागृत असू द्यावी. ऑनलाईन किंवा ऑफलाईन कोणाशीही फारसा परिचय नसताना मैत्री करण्याच्या भानगडीत पडूच नये. कोणीतरी तुमच्याशी खोट्या नावाने मैत्री करत असेल तर तुम्ही ते बरेचदा ओळखू शकत नाही. म्हणून समाज असो किंवा समाज माध्यम असो, कमळासारखे राहावे. जेणेकरून आजूबाजूला कितीही चिखल असला तरी फुलाला त्याचा स्पर्श होत नाही. 'मुलगी शिकली, प्रगती झाली', असे म्हणण्याच्या पुढे जात 'मुलगी जागरूक झाली, सुरक्षित राहिली' असे म्हटले पाहिजे. ■

७७५५९३८८२२

## कानोसा

# आंतरराष्ट्रीय योग दिनाचा संदेश

**अमोल पुसदकर**

दरवर्षी २१ जून हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा केला जातो. भारताच्या पुढाकाराने संयुक्त राष्ट्रसंघाने २०१४ मध्ये हा दिवस अधिकृतपणे मान्यता देऊन संपूर्ण जगाला योगाचे महत्त्व पटवून दिले. आज जगातील शेकडो देशांमध्ये लाखो लोक योगाभ्यास करीत आहेत. ही घटना केवळ भारतासाठी अभिमानाची बाब नाही, तर भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि ज्ञानपरंपरेच्या वैश्विक स्वीकाराची साक्ष आहे. मात्र या निमित्ताने एक प्रश्न स्वतःला विचारण्याची गरज आहे. ज्या योगविद्येने जगाला आकर्षित केले, ज्या ज्ञानपरंपरेचे महत्त्व जगातील प्रगत राष्ट्रांनी ओळखले, त्या परंपरेविषयी भारतीय समाजाने किती गांभीर्याने विचार केला आहे? योगाचा खरा अर्थ आपण समजून घेतला आहे का? की आपण योगाला केवळ काही शारीरिक व्यायाम आणि आसनांपुरते मर्यादित करून ठेवले आहे?

भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्यपूर्ण देणगी म्हणजे मनुष्याचा समग्र विचार. पाश्चात्त्य विचारपद्धती बहुधा शरीर आणि बुद्धीच्या विकासावर भर देताना दिसते, तर भारतीय दर्शनशास्त्र शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांचा एकात्म विचार करते. मनुष्य हा केवळ मांस आणि हाडांचा बनलेला देह नसून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक स्तर आहेत, अशी भूमिका भारतीय ऋषींनी हजारो वर्षांपूर्वी मांडली. त्यामुळे भारतीय जीवनदृष्टीत आरोग्य म्हणजे केवळ रोग नसणे नव्हे, तर शरीर, मन आणि बुद्धी यांचे संतुलित आणि सुसंवादी अस्तित्व होय.

योग ही त्याच भारतीय जीवनदृष्टीची फलश्रुती आहे. महर्षी पतंजली यांनी योगसूत्रांमध्ये 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' अशी योगाची व्याख्या केली आहे. म्हणजे चित्ताच्या वृत्तींचा निरोध किंवा नियंत्रण हेच योग होय. या व्याख्येचा विचार केला तर लक्षात येते की योगाचा संबंध केवळ शरीराशी नसून मनाशी आणि चित्ताशी आहे. मनातील अस्थिरता, तणाव, भीती, लोभ, क्रोध आणि असंख्य विकारांवर नियंत्रण मिळवून अंतर्मनात स्थैर्य निर्माण करणे हा योगाचा मूळ हेतू आहे.

भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी योगाचे विविध अर्थ स्पष्ट केले आहेत. 'समत्वं योग उच्यते' असे सांगताना सुख-दुःख, यश-अपयश, लाभ-हानी यांमध्ये समत्व राखणे म्हणजे योग असे त्यांनी प्रतिपादन केले. 'योगः कर्मसु कौशलम्' या वचनातून कर्मामध्ये कौशल्य आणि उत्कृष्टता प्राप्त करणे हा योगाचा आणखी एक अर्थ सांगितला आहे. यावरून स्पष्ट होते की योग म्हणजे केवळ आसनांची मालिका नसून जीवन जगण्याची एक परिपूर्ण कला आहे.

दुर्दैवाने अनेक वर्षांच्या परकीय आक्रमणांमुळे आणि इंग्रजी शिक्षणपद्धतीच्या प्रभावामुळे भारतीय समाज आपल्या ज्ञानपरंपरेपासून दूर गेला. राजकीय गुलामगिरीतून भारत मुक्त झाला; परंतु मानसिक गुलामगिरीचे ओझे आजही पूर्णपणे दूर झालेले नाही. स्वातंत्र्यानंतरही आधुनिकता म्हणजे पाश्चात्त्यांचे अंधानुकरण अशी एक चुकीची समजूत समाजात रुजत गेली. आपल्या परंपरा, जीवनशैली, आहारपद्धती, कुटुंबव्यवस्था आणि संस्कार यांच्याकडे मागासलेपणाच्या नजरेने पाहण्याची प्रवृत्ती वाढली.

भारतीय हवामान, भौगोलिक परिस्थिती आणि सांस्कृतिक पृष्ठभूमी लक्षात न घेता विदेशी जीवनशैलीचे अनुकरण सुरू झाले. अशा परिस्थितीत जगाने पुन्हा भारतीय ज्ञानपरंपरेकडे वळण्यास सुरुवात केली. योग, आयुर्वेद, ध्यान, प्राणायाम आणि भारतीय आरोग्यविषयक संकल्पना यांचा अभ्यास जगभरात होऊ लागला. अमेरिकेपासून युरोपपर्यंत आणि ऑस्ट्रेलियापासून आफ्रिकेपर्यंत योगकेंद्रांची संख्या वाढू लागली. तणावमुक्त जीवनासाठी, मानसिक आरोग्यासाठी आणि शारीरिक सुदृढतेसाठी योग हा प्रभावी उपाय असल्याचे संशोधनातून सिद्ध होऊ लागले.

जगातील प्रगत राष्ट्रांनी योगाचा स्वीकार केल्यानंतर भारतीय समाजातही योगाविषयी नव्याने आकर्षण निर्माण झाले. आज देशातील शहरांमध्ये, गावांमध्ये, उद्यानांमध्ये आणि घराघरांत योगाभ्यास केला जातो. ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. मात्र या वाढत्या लोकप्रियतेसोबत योगाचे तात्त्विक स्वरूपही समजून घेणे आवश्यक आहे.

योग म्हणजे फक्त सूर्यनमस्कार किंवा काही आसने नव्हेत. महर्षी पतंजली यांनी अष्टांग योगाची संकल्पना मांडली आहे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी हे योगाचे आठ टप्पे आहेत. यामध्ये आसन हा केवळ एक घटक आहे. सत्य, अहिंसा, संयम, शुचिता, आत्मपरीक्षण, ध्यान आणि आत्मिक उन्नती यांचा समावेश योगात होतो. त्यामुळे योग ही संपूर्ण जीवनपद्धती आहे. भारतीय परंपरेने नेहमीच ज्ञानाचे स्वागत केले आहे. मात्र आत्मविश्वास गमावून अंधानुकरण करणे आणि स्वतःच्या परंपरेला कमी लेखणे हे योग्य नाही. जगातील सर्वोत्तम गोष्टी स्वीकारताना स्वतःच्या संस्कृतीची मुळे अधिक घट्ट करणे हीच खरी प्रगती आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन हा केवळ योगासनांचे प्रात्यक्षिक करण्याचा दिवस नाही. तो आपल्या संस्कृतीचा, तत्त्वज्ञानाचा आणि जीवनमूल्यांचा पुनर्शोध घेण्याचा दिवस आहे. योगाला केवळ आरोग्याच्या चौकटीत न पाहता जीवनदृष्टी म्हणून स्वीकारण्याची आवश्यकता आहे. आज आवश्यकता आहे ती भारतीय समाजाला, विशेषतः युवकांना, आपल्या ज्ञानपरंपरेचे महत्त्व पटवून देण्याची. या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी केवळ योगासनांचा संकल्प करू नये, तर भारतीय ज्ञानपरंपरेच्या अभ्यासाचा आणि आचरणाचा संकल्प करावा.

भारतीय ज्ञानपरंपरेची ही कस्तुरी आपल्या जवळच आहे. तिचा सुगंध स्वतः अनुभवूया आणि जगालाही अनुभवू देऊया. हाच आंतरराष्ट्रीय योग दिनाचा खरा संदेश ठरेल. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### निर्मल वारी : वारकऱ्यांच्या सेवेतून विठ्ठलसेवा



आषाढ महिना जवळ येऊ लागला की, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात एक अनामिक हुरहूर आणि चैतन्य दाटून येते. शतकानुशतकांची परंपरा लाभलेली पंढरीची वारी म्हणजे केवळ पायी चालणारा मानवी समूह नव्हे, तर तो भक्ती, प्रेम आणि समतेचा अथांग महासागर आहे. ज्ञानोबा-तुकारामांच्या जयघोषात, टाळ-मृदंगाच्या तालावर लाखो पावले जेव्हा पंढरपूरच्या दिशेने पडू लागतात, तेव्हा अवघा महाराष्ट्र विठ्ठलमय होऊन जातो. वारी म्हणजे विठ्ठलाची पायी भक्ती, जिथे साक्षात भगवंतही आपल्या लाडक्या भक्तांसोबत दिंडीत चालतो, अशी सर्वसामान्यांची श्रद्धा आहे. याच सेवाभावाचे अत्यंत पवित्र आणि आधुनिक रूप म्हणजे 'निर्मल वारी अभियान' होय.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि संतशिरोमणी तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचा आणि 'निर्मल वारी अभियानात' प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव माझ्या आयुष्याला एक नवी दिशा देणारा ठरला. वारीमध्ये सेवा करण्यासाठी जेव्हा आम्ही पुण्यातून माळशिरसच्या दिशेने प्रवासाला सुरुवात केली, तेव्हा वाहनात अनेक नवीन चेहरे होते. वेगवेगळ्या विचारांचे, वयाने आणि व्यवसायाने भिन्न असलेले हे लोक सुरुवातीला एकमेकांसाठी अनोळखी होते. परंतु, जेव्हा एखादा स्वयंसेवक दुसऱ्या स्वयंसेवकाला भेटतो, तेव्हा अवघ्या काही तासांतच त्यांच्यात रक्ताच्या नात्यापेक्षाही घट्ट मैत्री निर्माण होते. आपण सगळे एकाच विठ्ठल परिवाराचे घटक आहोत, ही उदात्त भावना प्रत्येकाच्या मनात जागृत झालेली असते. प्रवासादरम्यान निसर्गरम्य वातावरणात आणि देशभक्तीपर तसेच भक्तिगीतांच्या सुरावलींमध्ये आम्हा स्वयंसेवकांमध्ये एक अभूतपूर्व जोश निर्माण झाला होता. प्रवासाचा एवढा मोठा पल्ला कसा पार पडला, हे कोणाला समजलेच नाही.

या संपूर्ण अभियानातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे समाजाची सामूहिक जबाबदारी. स्वच्छता हा केवळ शासनाचा किंवा एखाद्या अभियानाचा भाग नसून, ती प्रत्येकाची वैयक्तिक आणि सामाजिक कर्तव्याची भावना असायला हवी. लाखो लोक एका ठिकाणी जमूनही जर तो परिसर स्वच्छ राहू शकत असेल, तर ती लोकचळवळीची मोठी शक्ती आहे. 'निर्मल वारी' हे केवळ स्वच्छतेचे आंदोलन नाही, तर तो वारकरी संस्कृतीतील आंतरिक शुद्धतेचा बाह्य आविष्कार आहे.

**वीरेंद्र सोनवणे**/८८८८२४८८३

## वाचक पत्रे

■■■

### प्राचीन ऋषिमुनींची गणिते आणि सध्याचे हवामान खाते

आपली वेळ न चुकविता बरोबर हजेरी लावण्याचे श्रेय वरुणराजाला द्यावेच लागेल. यावर्षी अधिक ज्येष्ठ महिना आला आणि त्यानुसार निज ज्येष्ठात पाऊस अपेक्षित असणार, पण मृग नक्षत्राची सुरुवात करून तो थबकला आणि निज ज्येष्ठात आर्द्रा नक्षत्रावर तो हजेरी लावणार. त्याची जी सुयोग्य नक्षत्रे आहेत त्यांचा मान वरुणराजा नक्की राखणार. म्हणूनच ऋषिमुनींना त्याच्या गणिताचे श्रेय द्यायलाच हवे. काही अपवाद घडतात जसे १९६६ मध्ये पाण्याचा भयंकर दुष्काळ पडला आणि मुंबई रिकामी करण्याच्या योजना, एवढेच नाही तर त्याची ब्लूप्रिंटसुद्धा तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी तयार केली होती. पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांना कडक शिक्षा करण्याचा अध्यादेशसुद्धा निघाला होता. वरुण राजाला दोष देण्यापेक्षा निसर्गाचा आदर ठेवणे आपले कर्तव्य आहे. हवामान खाते एकवेळ चुकेल पण ऋषिमुनींची गणिते चुकणार नाहीत.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

■■■

### मूलभूत अधिकार पालन सक्तीचे

''पदपथावरून चालणे हा मूलभूत अधिकार आहे. ये-जा करणाऱ्या वाहनांच्या तुलनेत या अधिकाराला जास्त महत्त्व देणे गरजेचे आहे'' अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी एका खटल्याच्या सुनावणीवेळी केली. पायी चालण्याचा अधिकार हा राज्यघटनेच्या कलम १९ (१)(ड) अंतर्गत प्रवासाचा अधिकार आणि कलम २१ (जीविताचा व स्वातंत्र्याचा अधिकार) यांच्यासह इतर मूलभूत अधिकारांचा हा भाग असल्याचे तसेच पदपथावरून चालण्याच्या अधिकाराचे उल्लंघन होत असेल तर नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार असला पाहिजे व सरकारने यासंदर्भात कायदा करावा असे न्यायालयाने म्हटले आहे. हा आजच्या शहरातील परिस्थितीचा विचार करता अतिशय योग्य निर्णय आहे. शहरातील पदपथांवर टपऱ्यांचे साम्राज्य थाटले आहे हे उद्ध्वस्त करायची व नागरिकांना पदपथ खुला करून देण्याची जबाबदारी महानगरपालिका, नगरपालिका आणि विकास प्राधिकरणाची आहे. लोकसंखेच्या व वाहनांच्या तुलनेत नगरातील रस्त्यांचे रुंदीकरण करणे हेसुद्धा अत्यंत गरजेचे आहे. ■

**प्रा. डॉ. डी. डी. कुंभार**/पुणे. ९८६०१०८८८२

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ११ वी प्रवेश प्रक्रिया आजपासून सुरू होणार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत शिक्षण विभागाने एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

११ वी ते ११ वी आणि ११ वी ते १२ विद्यार्थी बदल प्रक्रियेसाठीची स्टुडंट ट्रान्सफर मॉड्युल ऑनलाईन संगणकीय प्रणाली आज सोमवार दि. २२ जूनपासून सुरु करण्यात येत आहे.

या संदर्भातील अधिकृत परिपत्रक शिक्षण विभागाकडून जारी करण्यात आले आले. विभागीय शिक्षण उपसंचालक, जिल्ह्यांचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी आणि शिक्षण निरीक्षकांना या नवीन प्रणालीबाबत आवश्यक बदल आणि पूर्वतयारी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



## विविध वृत्त...

### मंगेशकर महाविद्यालयात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २१ जून :- तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे होते. यावेळी योगप्रशिक्षक म्हणून महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाचे डॉ.आनंद मुसळे यांनी योगाची विविध प्रात्यक्षिके सादर करून निरोगी आरोग्यासाठी नियमित योगा व प्राणायाम, संतुलित व पौष्टिक आहार इत्यादी आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा प्रास्ताविक राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे डॉ.भगवान कदम यांनी केले. अध्यक्षीय समारोप प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी केले. याप्रसंगी पर्यवेक्षक प्रा.प्रमोद मरगणे, क्रीडा विभागप्रमुख प्रा.विजयकुमार हंडे, प्रा.अंजना मुळे, डॉ.सचिन हंचाटे, डॉ.विजयकुमार पवार, डॉ.विनोद जाधव, डॉ.विनोद चिंते, डॉ.सुचिता किडीले, डॉ.रितेश व्यास, डॉ.राजू हंबीर, प्रा.आशिष खडकेश्र्वर, प्रा.श्रीकांत ढेबे, प्रा.रवींद्र अंबुलगे, विलासराव होटकर, व्यंकटराव शिवणे, राजेंद्र बेलुरे, मारोती पवार, विजयकुमार बाबछडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे कॅडेट्स उपस्थित होते.

## लातूर जिल्हा माहेश्वरी सभेच्या वतीने लातुरात विविध उपक्रमांनी साजरी होणार महेश नवमी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही दि. २३ व २४ जून २०२६ रोजी विविध उपक्रमांनी महेश नवमी साजरी करण्यात येणार आहे.



महेश नवमीचे औचित्य साधून लातूर शहरातील छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील गौरीशंकर मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. शोभायात्रेदरम्यान माहेश्र्वरी ढोल ताशा पथक विशेष आकर्षण राहणार आहे. शोभा यात्रेचे संयोजक ईश्र्वर बाहेती, संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, नंदकिशोर लोया, राहुल लोया, ईश्र्वर चांडक, दिनेश गिल्डा हे आहेत. यावर्षीच्या महेश नवमी उत्सवाच्या स्नेहभोजनाचे यजमान तोष्णीवाल हे असून स्नेहभोजनाचा कार्यक्रम मंगळवार दि. २३ जून रोजी सायंकाळी ७ ते १० या वेळेत गोदावरीदेवी लाहोटी कन्या प्रशाला येथे होईल. याच ठिकाणी रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे.

दि. २४ जून रोजी दुपारी चार वाजता दयानंद सभागृहात माहेश्र्वरी समाजासाठी आपला अमूल्य वेळ, श्रम एवं यथाशक्ती आर्थिक सहयोग देणाऱ्या मान्यवरांना महेश भूषण, महेश गौरव, महेश सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या सोहळ्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो.चे सचिव अनिलकुमार नावंदर यांचे मार्गदर्शन होणार आहे. नावंदर हे विसरत चाललेले संस्कार आणि पारिवारिक संबंध दृढ करण्याकामी प्रेरणादायी - प्रखर वक्ते म्हणून परिचित आहेत. लातूर जिल्हा महिला माहेश्र्वरी संगठनच्या वतीने शिवस्य नवारसामृतम ही भव्य दिव्य नृत्य नाटिका सादर केली जाणार आहे. यावेळी माहेश्र्वरी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान केला जाणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजक आनंद चरखा, सुरभी कचोलिया, अनिकेत चांडक हे आहेत. या सोहळ्याप्रसंगी लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट , सचिव राजेशकुमार मंत्री, अ . भा. महासभा सदस्य हुकूमचंद कलंत्री, फुलचंद काबरा, बालकिशन मुंदडा, माहेश्र्वरी सभेचे कोषाध्यक्ष जगदीश भुतडा, महाराष्ट्र प्रदेश माहेश्र्वरी महिला संगठनच्या प्रदेश सचिव सौ.अनिता मालू, लातूर जिल्हा महिला संगठनच्या अध्यक्षा सौ. ललिता राठी, महाराष्ट्र प्रदेश युवा माहेश्र्वरी संगठन चे संगठन मंत्री तथा सहकार मंत्री राम भुतडा, लातूर जिल्हा युवा माहेश्र्वरी सांगाथांचे अध्यक्ष अभिषेक मुंदडा, लातूर शहर माहेश्र्वरी सभेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत सोनी, युवा माहेश्र्वरीचे अध्यक्ष निकुंज भुतडा,माहेश्र्वरी किशोरी मंडलच्या प्रांजल डागा, संयोजक संतोष तोष्णीवाल, गणेश हेड्डा, ईश्र्वर बाहेती, राहुल लोया, एड. नंदकिशोर लोया, संतोष तोष्णीवाल यांची मंचावर उपस्थिती राहणार आहे.

लातूर जिल्हा माहेश्र्वरी सभेच्या वतीने श्री महेश नवमी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सर्व उपक्रमात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा,असे आवाहन लातूर जिल्हा माहेश्र्वरी महासभेचे अध्यक्ष सीए प्रकाश कासट , सचिव राजेशकुमार मंत्री, कोषाध्यक्ष जगदीश भुतडा, संगठन मंत्री फुलचंद काबरा, उपाध्यक्ष शामसुंदर मानधना , विष्णुदास मंत्री, चांदकरण लड्डा, रामेश्र्वर पुनपाळे, अशोक बाहेती, ओमप्रकाश सारडा, रामेश्र्वर भराडिया, गोकुळदास चांडक, दिलीप सोमाणी, नंदकिशोर करवा , राजगोपाल बांगड, संजय जाजू, नंदकिशोर लोया, राजकुमार सोनी, प्रल्हाद चांडक,अशोक जाजू,संतोष तोष्णीवाल, ईश्र्वर चांडक, राहुल लोया, राम भुतडा, जयराम भुतडा, सत्यनारायण हेड्डा, राजगोपाल बाहेती, संतोष मुंदडा,गोपाल काबरा यासह समाजातील मान्यवरांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी बास्टेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण संरक्षणाचा संदेश

### एक व्यक्ती - पाच झाडे संकल्पाचा प्रचार



लातूर दि. २१ जून : वाढदिवस हा केवळ उत्सवाचा नव्हे तर समाजहिताचा संदेश देण्याचाही प्रसंग ठरू शकतो, याचा आदर्श लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त पाहायला मिळाला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त लातूर आणि कापडी पिशवी वापर जनजागृती अभियान उत्साहात राबविण्यात आले. यावेळी पर्यावरण रक्षणासोबतच नागरिकांच्या आरोग्यपूर्ण आणि जबाबदार जीवनशैलीवरही भर देण्यात आला.

कार्यक्रमात वाढदिवस, लग्नसमारंभ तसेच विविध आनंदाच्या प्रसंगी फटाके, हार-तुरे आणि अनावश्यक खर्च टाळून वृक्षारोपण करण्याचा संदेश देण्यात आला. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात छोटे पण प्रभावी बदल स्वीकारण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तसेच, प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णतः बंद करून कापडी पिशवीचा स्वीकार करण्याचे आवाहन करण्यात आले.

विशेष म्हणजे सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांच्या आपले आरोग्य, आपलीच जबाबदारी या अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या मोफत कापडी पिशवी वाटप उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले. पर्यावरण संरक्षणासोबतच नागरिकांमध्ये आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.बाजारात जाताना प्रत्येक नागरिकाने स्वतःसोबत कापडी पिशवी नेण्याचा संकल्प करावा, प्लास्टिकमुक्त लातूर उभारण्यासाठी सामूहिक सहभाग वाढवावा आणि पर्यावरण संवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

एक व्यक्ती - पाच झाडे, प्लास्टिकला नकार - कापडी पिशवीचा स्वीकार आणि पर्यावरण संरक्षण - प्रत्येकाची जबाबदारी हा संदेश देत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण रक्षणाचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले.

## फसवणूक प्रकरणात १७ वर्षांपासून फरार आरोपीला पुण्यातून अटक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : तब्बल १७ वर्षांपासून न्यायालय व पोलीस प्रशासनाला गुंगारा देत फरार असलेल्या फसवणूक प्रकरणातील आरोपीस लातूर पोलिसांच्या विशेष पथकाने पुणे येथून शिताफीने ताब्यात घेऊन न्यायालयासमोर हजर केले आहे.



पोलीस स्टेशन लातूर ग्रामीण येथे २००९ मध्ये दाखल झालेल्या गुन्हा क्रमांक १४५/२००९ कलम ४२० भावि मधील आरोपी गोविंद व्यंकटराव डांगे (वय ५३ रा. हासोरी बु., ता. निलंगा) हा गेल्या १७ वर्षांपासून फरार होता. न्यायालयाने त्याच्याविरुद्ध अटक वॉरंट तसेच जाहीरनामाही काढला होता; मात्र आरोपी सातत्याने आपले वास्तव्य बदलत असल्याने तो पोलीसांच्या हाती लागत नव्हता. या प्रकरणातील फिर्यादीने शेतीसाठी ट्रॅक्टर खरेदी करण्याच्या उद्देशाने आरोपी गोविंद डांगे याच्याकडे दि. ४ फेब्रुवारी २००९ रोजी एक लाख रुपये जमा केले होते. त्या बदल्यात आरोपीने एका महिन्यात ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्याचे आश्र्वासन दिले होते. मात्र मुदत उलटल्यानंतरही ट्रॅक्टर न देता अथवा घेतलेली रक्कम परत न करता आरोपीने फिर्यादीची फसवणूक केली. एवढेच नव्हे तर आणखीन एका कडून मोटारसायकल देण्याचे आमिष दाखवून ५५ हजार रुपये स्वीकारले आणि त्यांनाही वाहन अथवा पैसे परत न देता फसविले. अशा प्रकारे अनेक नागरिकांची आर्थिक फसवणूक झाल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या.

दरम्यान फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे निर्देशावर, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात विशेष पथकाने या आरोपीचा शोध सुरू ठेवला होता.

या तपासादरम्यान आरोपी गोविंद डांगे हा पुणे परिसरात वास्तव्यास असल्याची गोपनीय माहिती पोलीस अंमलदार दत्तात्रय शिंदे यांना प्राप्त झाली. माहितीची खातरजमा करून वरिष्ठांच्या आदेशानुसार पथकाने पुणे येथील लोणी काळभोर परिसरातील हडपसर टोलनाका भागात सापळा रचून आरोपीस ताब्यात घेऊन दि. १८ जून रोजी रात्री लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता मुख्य न्यायदंडाधिकारी सतीश पाटील यांनी त्यास न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार दत्तात्रय शिंदे, संतोष खांडेकर यांनी पार पाडली.

### प्राचार्य डॉ. कुंभार यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थी प्रिय ग्रंथपाल आदरणीय स्नेहलता मारुतीराव पाटील यांच्या नावाने दिला जाणारा पहिला स्नेहलता पाटील जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

प्रा. समाधान दहिवाळ, मुख्य संयोजक, छत्रपती संभाजीनगर येथील पुरोगामी सामाजिक, सांस्कृतिक फाउंडेशनचे मुख्य संयोजक प्रा. समाधान दहिवाळ यांनी हा पुरस्कार जाहीर केला. दि. २८ जून रोजी सकाळी १० वाजता या पुरस्काराचे वितरण महसूल प्रबोधनी, छत्रपती संभाजीनगर येथील दुसऱ्या स्त्रीवादी साहित्य संमेलनामध्ये होणार आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

## सुप्रभात ग्रुपच्या वतीने जागतिक योग दिवस साजरा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : येथील सुप्रभात ग्रुप, ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने जागतिक योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी महापौर जयश्रीताई सोनकांबळे, योग मार्गदर्शक वाघमारे गुरुजी, ग्रुपचे अध्यक्ष राजकुमार मस्के, शिवशंकर सुरवसे, मोहन रासुरे , दत्तात्रय स्वामी बसपुरे, प्रभाकर साबळे, बाबा गायकवाड, काशिनाथ वंजारे, द्वारकादास बिदादा, भीमराव बोयणे, ग्लोबल फाऊंडेशनचे अध्यक्ष नवनाथ गडदे, कवितके करबसप्पा पोपडे, डॉ. शिवपुजे, सौ. सरोजनी पोपडे, सौ. संगीता कवितके, गंगाधर ढोणे, व्यंकटराव सूर्यवंशी, धनराज माने, शुभम देवकते आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

योग दिनाचा हा कार्यक्रम हुतात्मा स्मारक या ठिकाणी पार पडला. यावेळी उपस्थितांना पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी येळण्यांचे वाटप महापौर जयश्रीताई सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवशंकर सुरवसे यांनी केले तर आभार दत्ता स्वामी यांनी मानले

## ११ वर्षापासून फरार २ आरोपींना अखेर बेड्या

### भादा पोलिस ठाण्याकडून विशेष मोहिमेंतर्गत कारवाई

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : वर्षानुवर्षे फरार राहून कायद्याला चकवा देणाऱ्या आरोपींना न्यायालयासमोर उभे करण्याच्या उद्देशाने जिल्हा पोलीस दलाकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आ-हे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये प्रलंबित असलेल्या गंभीर गुन्ह्यांचा तसेच फरार आरोपींच्या अभिलेखांचा सखोल आढावा घेत संबंधित अधिकारी व अंमलदारांना अशा आरोपींचा शोध घेऊन त्यांना तातडीने अटक करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स रू असलेल्या विशेष शोध मोहिमेत आणखी एक उल्लेखनीय यश पोलीसांना मिळाले आहे. पोलीस ठाणे भादा येथे २०१५ मध्ये दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील तब्बल ११ वर्षांपासून फरार असलेल्या दोन आरोपींना अटक करण्यात पोलीसांना यश आले आहे.



दि. ५ ऑगस्ट २०१५ ते ६ ऑगस्ट २०१५ च्या मध्यरात्री दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलकुंड येथील परिसरातील चंदनाच्या झाडाचा गाभा अज्ञात व्यक्तींनी चोरी करून नेला होता. चोरीस गेलेल्या चंदनाची किंमत सुमारे ५ हजार रुपये होती. याप्रकरणी प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलकुंड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण पळंगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि. ६ ऑगस्ट २०१५ रोजी पोलीस ठाणे भादा येथे गुरनं. ६६/२०१५, कलम ३७९ भादंवि तसेच भारतीय वन अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान यापूर्वी तीन आरोपींना अटक करण्यात आली होती. मात्र नितीन गोरख राऊत (वय ४८ वर्षे, रा. सर्जापूर, ता. बार्शी, जि. सोलापूर) व रामचंद्र उर्फ राम धर्मराज माळी (वय ५० वर्षे, रा. नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर) हे दोन्ही आरोपी गुन्हा दाखल झाल्यापासून फरार होते.

विशेष मोहिमेदरम्यान पोलीसांनी तांत्रिक माहिती, गोपनीय बातमीदारांचे जाळे तसेच विविध ठिकाणी पडताळणी करून या दोन्ही आरोपींचा माग काढला. अखेर त्यांना शोधून ताब्यात घेण्यात आले. आरोपींविरुद्ध आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पुरवणी दोषारोपपत्रासह त्यांना मा. न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे.

सदरची कारवाई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. विशाल शहाणे, पोहेकॉ फिरोज शेख, कांबळे, पोना/पाटील, पोअं/मोरे यांनी केली आहे.

## महागरपालिकेच्या स्वच्छता विभागाची कारवाई

### सिंगल युज प्लास्टिक वापरणाऱ्या आस्थापनांकडून २२ हजारांचा दंड वसूल



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून :महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आयुक्त श्रीमती मानसी यांचे निर्देशानुसार दि. २० जून रोजी शहरातील गंजगोलाई भागात सिंगल युज प्लास्टीकवर व सार्वजनिक रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यावर कार्यवाही करण्यात येऊन २० हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

सदर कार्यवाहीदरम्यान सिंगल युज प्लास्टिक वापर करणाया ४ आस्थापनांवर दंडात्मक कार्यवाही करून २० हजार रूपयेची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. तसेच सार्वजनीक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या एका नागरिकाला ५०० रुपये दंड करण्यात आला. सदर कार्यवाहीदरम्यान प्रमुख स्वच्छता निरीक्षक अक्रम शेख, शिवराज शिंदे, स्वच्छता निरीक्षक महादेव फिस्के, प्रदीप गायकवाड, रवि शेंडगे, श्रीकांत शिंदे, तसेच कर्मचारी उपस्थित होते.



## आजचे सामने

**अर्जेंटिना विरुद्ध ऑस्ट्रिया**
**वेळ :** रात्री १०:३० वाजतापासून
**स्थळ :** एटी अँड टी स्टेडियम, डॅलस

**फ्रान्स विरुद्ध इराक**
**वेळ :** सोमवारी रात्री २:३० वाजतापासून
**स्थळ :** लिंकन फायनान्शियल फील्ड, फिलाडेल्फिया

**नॉर्वे विरुद्ध सेनेगल**
**वेळ :** मंगळवारी पहाटे ५:३० वाजतापासून
**स्थळ :** मेटलाइफ स्टेडियम, न्यू जर्सी

**जॉर्डन विरुद्ध अल्जेरिया**
**वेळ :** मंगळवारी सकाळी ८:३०
**स्थळ :** लेव्हीज स्टेडियम, सॅन फ्रान्सिस्को बे एरिया
**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५)

## जर्मनीची बाद फेरीत धडक



विश्वचषकाच्या 'गट ई' सामन्यात, जर्मनीचा खेळाडू डेनिझ उंडाव्ह (२६) याने संघाचा दुसरा गोल केल्यानंतर त्याच्या सहकाऱ्यांनी त्याच्याभोवती गराडा घालून आनंद साजरा केला

**टोरंटो, २१ जून**

फिफा २०२६ फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत ई गटाच्या साखळी सामन्यात जर्मनीने आयव्हरी कोस्ट संघावर २-१ अशा गोलफरकाने विजय नोंदवून स्पर्धेच्या बाद फेरीत धडक मारली.

पिछाडीवरून मुसंडी मारत आयव्हरी कोस्टवर २-१ असा विजय मिळवताना बदली खेळाडू डेनिझ उंडाव्हने दोन गोल केले; या विजयासह जर्मनीने २०१४ नंतर पहिल्यांदाच फिफा विश्वचषकाच्या अंतिम ३२ संघाच्या बाद फेरीत प्रवेश केला.

फ्रँक केसीने अगदी जवळून गोल करत ३० व्या मिनिटाला आयव्हरी कोस्टला आघाडी मिळवून दिली होती; मात्र डेनिझ उंडाव्हने दुसऱ्या सत्राच्या मध्यावर 'व्हॉली'द्वारे गोल केला आणि त्यानंतर 'इंज्युरी टाइम'मध्ये अर्थात सामन्याच्या निर्धारित वेळेनंतरच्या अतिरिक्त वेळेत विजयी गोल नोंदविला.

जर्मनीच्या डेनिझ उंडाव्हने 'बॉक्स'च्या मध्यभागातून डाव्या पायाने फटका मारत गोलच्या डाव्या कोपऱ्यात चेंडू धाडला. फेलिक्स नमेचा याने 'थ्रू बॉल'द्वारे यासाठी साहाय्य केले.

येथे जर्मनी आणि आयव्हरी कोस्ट यांच्यातील 'वर्ल्ड कप' फुटबॉल स्पर्धेच्या 'गट ई' (Group E) मधील सामन्यात, जर्मनीचा खेळाडू डेनिझ उंडाव्हने संघासाठी दुसरा गोल करताच संघातील सहकारी खेळाडूंनी त्याच्या भोवती गराडा घालून आपला आनंद व्यक्त केला. ◂ (वृत्तसंस्था)

## नेदरलँड्सकडून स्वीडनचा धुव्वा



नेदरलँड्सचा तिसरा गोल करताना कोडी गॅकपो

**ह्यूस्टन, २१ जून**

फिफा २०२६ विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत नेदरलँड्सने स्वीडनचा धुव्वा उडवून विश्वचषक स्पर्धेला सुरुवात केली. स्वीडनवर ५-१ असा विजय मिळवून नेदरलँड्सने आपली ताकद दाखवून दिली. कोडी गाक्पो आणि ब्रायन ब्रॉबी या दोघांनी प्रत्येकी दोन गोल केले.

रोनाल्ड कोमन यांच्या मार्गदर्शनाखालील नेदरलँडसचा संघ दोन सामन्यांतून चार गुणांसह 'एफ' गटात अव्वल स्थानी आहे. त्यांच्यापाठोपाठ स्वीडन (तीन), जपान (एक) आणि ट्युनिशिया (शून्य) आहेत.

लिव्हरपूलचा बचावपटू व्हर्जिल व्हॅन डाइकच्या नेतृत्वाखालील नेदरलँड्स संघाला त्यांच्या सलामीच्या सामन्यात जपानविरुद्ध २-२ अशा बरोबरीत समाधान मानावे लागले. गटात अव्वल स्थानी असलेल्या स्वीडनने ट्युनिशियाचा ५-१ असा धुव्वा उडवला, ज्यानंतर ट्युनिशियाच्या प्रशिक्षकाला पदावरून हटवण्यात आले. ◂ (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### झेक ग्रांपी मुष्टियुद्धात भारताला बारा पदके

**प्राग :** राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या भारतीय मुष्टियोद्ध्यांनी झेक प्रजासत्ताकमधील ५६ व्या 'ग्रँड प्रिक्स उस्ती नाद लाबेम' मुष्टियुद्ध स्पर्धेत दमदार कामगिरी करत एकूण १२ पदके जिंकलीत, यात ८ सुवर्णपदकांचा समावेश आहे. पाच सदस्यांच्या महिला संघाने चार सुवर्ण आणि एक रौप्य पदक जिंकून आघाडी घेतली. ऑलिम्पिक पदक विजेती लवलिना बोर्गोहेन (७५ किलो), आशियाई विजेती प्रीती पवार (५४ किलो), साक्षी चौधरी (५१ किलो) आणि प्रिया घांघसने (६० किलो) अंतिम फेरीत एकमताने विजय मिळवत सुवर्णपदके पटकावली. परवीन हुडा (६५ किलो) हिने रौप्य पदक मिळविले. पुरुष संघानेही महिलांच्या यशाची बरोबरी करत चार सुवर्णपदके जिंकली. जादुमणी सिंग (५५ किलो), सचिन (६० किलो), अंकुश (८० किलो) आणि नरेंद्र (+९० किलो) हे आपापल्या गटात विजेते ठरले. लवलिनाने अंतिम फेरीत इटलीच्या मेलिसा जेमिनीचा, तर प्रीतीने फ्रान्सच्या जेसा मार्सेलचा तर साक्षीने फ्रान्सच्या मेसून बौरेगाचा ५-० असा विजय मिळवला. ■

## जपानचा ट्युनिशियावर ४-० ने विजय

### विश्वचषक इतिहासातील १,००० वा सामना; चार गोल करणारा जपान पहिला आशियाई संघ



ट्युनिशियाविरुद्ध गोल केल्याचा आनंद साजरा करताना जपानचा आयासे उएदा

**मेक्सिको, २१ जून**

'स्टेडिओ मॉन्टेरी' येथे फिफा विश्वचषकाच्या इतिहासातील १,००० वा सामना खेळला गेला. या सामन्यात आशियातील दिग्गज संघ असलेल्या जपानने ट्युनिशियावर ४-० असा दणदणीत विजय मिळविला आणि बाद फेरीसाठी पात्र ठरण्याच्या अगदी जवळ मजल मारली. ट्युनिशियाचा पराभव करत विश्वचषकात चार गोल करणारा जपान हा पहिला आशियाई संघ ठरला. या निकालामुळे 'गट एफ' मधील ट्युनिशियाचा सलग दुसरा पराभव झाला आणि विश्वचषकातून बाहेर पडणारा तो तिसरा संघ ठरला.

१३ जुलै १९३० रोजी फिफा विश्वचषकाचा पहिला सामना खेळला गेला होता; त्याला आता ९६ वर्षे पूर्ण होत असल्याने या ऐतिहासिक प्रसंगाचे महत्त्व अधिकच वाढले होते. फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फेंटिनो यांच्यासारख्या मान्यवरांच्या उपस्थितीत जागतिक फुटबॉलमधील एका ऐतिहासिक रात्रीसाठी वातावरण निर्मिती झाली होती. जपानने आपल्या आक्रमक खेळ, खेळावरील नियंत्रण आणि 'गोल करण्याची अचूकता' यांच्या जोरावर ही रात्र अविस्मरणीय बनवली. सामन्याची सुरुवात अतिशय वेगवान झाली आणि जपानने सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व प्रस्थापित केले. अवघ्या चार मिनिटांत दाइची कामाडाने गोल करत संघाचे खाते उघडले; केटो नाकामुराचा जमीनलगतचा पास बॉक्समध्ये आल्यावर कामाडाने तत्परतेने त्यावर प्रतिक्रिया देत जवळून चेंडू जाळीत धाडला. या सुरुवातीच्या गोलमुळे ट्युनिशियाची कोंडी झाली आणि त्यांना बचावात्मक पवित्रा घेण्यास भाग पाडले गेले, तर जपानने सामन्याची गती आपल्या नियंत्रणात ठेवली. दाइची कामादाने जपानला खाते उघडून दिल्यानंतर आयासे उएडा ३१ व्या व ८३ व्या मिनिटाला असे दोन गोल, तर जुन्या इतो याने ६९ व्या मिनिटाला एका गोलची भर घातली. ◂ (वृत्तसंस्था)

## पदार्पणात कुरासाओची ऐतिहासिक कामगिरी



कॅन्सस सिटी येथे झालेल्या विश्वचषकाच्या ''गट ई'' मधील फुटबॉल सामन्यादरम्यान, चेंडूला हेडर मारताना कुरासाओचा ताहित चोंग (डावीकडे) शेजारी इक्वेडोरच्या पिएरो हिन्कापी

**कॅन्सस सिटी, २१ जून**

गोलरक्षक एलॉय रूमच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे कुरासाओने इक्वेडोरच्या आक्रमक पण संधी वाया घालवणाऱ्या संघाला रोखून धरले आणि विश्वचषकातील आपला पहिला गुण मिळवला.

मियामी एफसीचा गोलरक्षक एलॉय रूम याने 'ग्रुप ई' मधील सामन्यात दक्षिण अमेरिकन संघाला रोखण्यासाठी तब्बल १५ बचाव केले आणि एका सामन्यात सर्वाधिक बचाव करण्याच्या विक्रमाशी बरोबरी केली. इक्वेडोरला सलग दोन सुरुवातीच्या सामन्यांत गोल करण्यात अपयश आले.

३७ वर्षीय रूमने जबरदस्त फॉर्म दाखवत विश्वचषकाच्या एका सामन्यात सर्वाधिक बचाव करण्याच्या अमेरिकेचा गोलरक्षक टिम हॉवर्डच्या विक्रमाची बरोबरी केली. हॉवर्डने २०१४ मध्ये बेल्जियमविरुद्धच्या सामन्यात (जो अतिरिक्त वेळेपर्यंत गेला होता आणि ज्यात त्याला दोन गोल स्वीकारावे लागले होते) १५ बचाव केले होते; मात्र रूमने 'क्लीन शीट' राखत (एकही गोल न स्वीकारता) डिक ॲडव्होकाट यांच्या संघाला ऐतिहासिक बरोबरी मिळवून दिली.

सामना सुरू झाल्यानंतर अवघ्या तीन मिनिटांतच त्याने पहिला बचाव केला; एनर व्हॅलेन्सियाचा जवळून मारलेला फटका रोखणारा हा बचाव कदाचित त्या रात्रीचा सर्वोत्तम बचाव ठरला. यानंतर त्याने जॉन येबोआचा प्रयत्न हाणून पाडला आणि पहिल्या सत्रातील सहा बचावांपैकी आणखी एक बचाव व्हॅलेन्सियाविरुद्ध केला.

मध्यंतरा नंतर रूमवर कामाचा अधिक ताण आला; त्याने मोईसेस कैसिडो, पेड्रो विटे, केविन रॉड्रिग्ज, निल्सन अंगुलो, गोन्झालो प्लाटा आणि इतरांचे प्रयत्न यशस्वी होऊ दिले नाहीत. सामन्याच्या ६० व्या मिनिटाला कुरासाओलाही गोल करण्याची मोठी संधी मिळाली होती, परंतु लिआंड्रो बाकुना यांचा फटका अडवण्यात आला आणि त्यानंतर लिव्हियाना कोमेनेंसियाचा प्रयत्नही रोखला गेला. इक्वेडोरला त्यांच्या वाया गेलेल्या संधींची खंत वाटेल, त्यांनी एकूण २७ प्रयत्न केले होते. सुरुवातीच्या सामन्यात आयव्हरी कोस्टकडून पराभव पत्करल्यामुळे, बाद फेरीत (नॉकआउट स्टेज) जाण्यासाठी त्यांना आता त्यांच्या शेवटच्या सामन्यात गटविजेत्या जर्मनीचा पराभव करणे आवश्यक आहे. पहिल्या सामन्यात जर्मनीकडून ७-१ असा पराभव स्वीकारणाऱ्या कुरासाओ संघालाही शेवटच्या सामन्यात आयव्हरी कोस्टवर विजय मिळवल्यास अंतिम ३२ संघांमध्ये स्थान मिळवण्याची संधी असेल. ◂ (वृत्तसंस्था)

## भारत 'अ' संघाने जिंकली तिरंगी मालिका

### श्रीलंका 'अ' संघाचा ६६ धावांनी पराभव
### सूर्यवंशीचे 'लिस्ट ए' सर्वांत जलद अर्धशतक



सामनावीर वैभव सूर्यवंशी

**डाम्बुला, २१ जून**

आंतरराष्ट्रीय स्तरावर (वरिष्ठ संघात) अद्याप पदार्पण न केलेल्या खेळाडूच्या भूमिकेतील कदाचित ही त्याची शेवटची खेळी असावी; वैभव सूर्यवंशीने 'लिस्ट ए' क्रिकेटमधील सर्वात जलद अर्धशतक (केवळ ११ चेंडूत) झळकावले आणि त्याची ही आक्रमक खेळी २९ चेंडूमध्ये ९४ धावांवर येऊन थांबली. या खेळीच्या जोरावर भारत 'अ' संघाने रविवारी डाम्बुला येथे झालेल्या तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात श्रीलंका 'अ' संघाचा ६६ धावांनी पराभव केला.

वैभव सूर्यवंशी (९४) व तिलक वर्माच्या (६७) अर्धशतकांच्या बळावर भारत 'अ' संघाने ९ बाद ३७७ धावा उभारल्या. प्रत्युत्तर देताना श्रीलंका 'अ' संघाला ४७.१ षटकांत सर्वबाद ३११ धावांपर्यंतच मजल मारता आली. २९ चेंडूंत ९४ धावांची खेळी करणारा वैभव सूर्यवंशी सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

अंतिम सामन्यापूर्वीच्या चार डावांमध्ये चांगली सुरुवात करून वैभव सूर्यवंशीने एकूण ११७ धावा केल्या होत्या. त्याच्या या वेगवान आणि आक्रमक फलंदाजीने भारत 'अ' संघाच्या डावाचा भक्कम पाया रचला. भारतीय खेळाडूंची फलंदाजी बघून ते चारशे धावांचा टप्पा गाठेल असे वाटत होते, परंतु अखेरीस त्यांनी ९ बाद ३७७ धावांची मजल मारली.

वैभव सूर्यवंशीने २९ चेंडूंत १० चौकार व ८ षटकारांसह ९४ धावांची खेळी केली. सलामीवीर प्रियांश आर्य (३९), ऋतुराज गायकवाड (४०), कर्णधार तिलक वर्मा (६७), कुमार कुशाग्र (३६), विपराज निगम (२७) व अनुकूल रॉयने (३९) संघाची धावसंख्या वाढविण्यात भरीव योगदान दिले.

लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेकडून चौथ्या क्रमांकावरील सदिरा समरविक्रमाने ४४ चेंडूंत ९ चौकारांसह ५२ धावांची अर्धशतकी खेळी केली, परंतु इतर फलंदाजांची पुरेशी साथ मिळाली नाही. श्रीलंका अ संघाला ३११ धावांवर रोखताना भरताकडून यश ठाकूर व विपराज निगमने प्रत्येकी ३ बळी, अनुकूल रॉयने २ बळी, तर अशोक शर्मा, व तिलक वर्माने प्रत्येकी एक बळी टिपला. ◂ (वृत्तसंस्था)




## भारताचे दक्षिण आफ्रिकेसमोर १५९ धावांचे लक्ष्य



शेफाली वर्मा

**मॅन्चेस्टर, २१ जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत येथे रविवारी खेळल्या जात असलेल्या गट एकमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या साखळी सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत ७ बाद १५८ धावां नोंदविल्या आणि दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी १५९ धावांचे लक्ष्य ठेवले.

कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, यावेळी प्रेमा रावतला टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पणाची संधी देण्यात आली.

स्मृती मंधाना व शेफाली वर्माने ३० धावांची सलामी भागीदारी करून भारताच्या डावाची सुरुवात केली. मारिझाने कॅपने स्मृती मंधानाचा (१७) त्रिफळा उडविला. शेफालीने यास्तिका भाटियाच्या (१५) साथीने संघाला अर्धशतकी उंबरठा ओलांडून दिला. शबनीम इस्माईलने शेफालीला जाफ्ताकडून झेलबाद केले. शेफालीने १५ चेंडूंत ४ चौकार व एका षटकारसह ३१ धावांचे योगदान दिले. पुढे जेमिमाह रॉड्रिग्ज (१२), कर्णधार हरमनप्रीत कौर (२४), दीप्ती शर्माने (२९) दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांचा धैर्याने सामना करत संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला. हरमनप्रीतने दीप्तीसोबत पाचव्या गड्यासाठी ३३ धावांची भागीदारी केली.

पुढे ऋचा घोष (१५), अरुंधती रेड्डी (नाबाद ६) व प्रेमा रावतने (नाबाद ३) भारताला २० षटकांत ७ बाद १५८ अशी आव्हानात्मक धावसंख्या रचून दिली.

दक्षिण आफ्रिकेकडून मारिझाने कॅप व शबनीम इस्माईलने प्रत्येकी २ बळी, नोनकुलुलेको म्लाबा, अयाबोंगा खाका व नादिन डी क्लर्कने प्रत्येकी १ बळी टिपला. ◂ (वृत्तसंस्था)

## वेस्ट इंडीजची श्रीलंकेवर मात

**ब्रिस्टल, २१ जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत येथे वेस्ट इंडीजच्या फिरकी गोलंदाजांनी श्रीलंकेच्या फलंदाजांवर वर्चस्व गाजवत संघाच्या सलग तिसऱ्या विजयाचा पाया रचला; त्यानंतर स्टेफनी टेलरने काहीशा तणावपूर्ण स्थितीतही संयमी खेळी करत संघाला ५ गडी राखून विजय मिळवून दिला.



सामनावीर हिली मॅथ्यूज

श्रीलंकेला १९.४ षटकांत ९८ धावांत गुंडाळल्यानंतर वेस्ट इंडीजने १६.१ षटकांत ५ गडी गमावित ९९ धवा काढून आपला विजय साकार केला. वेस्ट इंडीजच्या या विजयात हिली मॅथ्यूजची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली, तिने १७ चेंडूंत १७ धावा केल्या तसेच १५ धावांत ३ बळी टिपले. तिलाच सामनावीर पुरस्कार देण्यात आला. या निकालामुळे वेस्ट इंडीजचा संघ इंग्लंडसोबत 'गट २' मध्ये संयुक्तपणे अव्वल स्थानावर पोहोचला आहे. केवळ 'नेट रन रेट'मध्ये ते इंग्लंडपेक्षा मागे आहेत), तर दुसरीकडे श्रीलंकेच्या पुढील फेरीत जाण्याच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

## जयस्वाल इंग्लंड दौऱ्यासाठीच्या वन-डे संघातून बाहेर

### कोहली, बुमराह, अक्षर पटेलचे पुनरागमन



**नवी दिल्ली, २१ जून**

यशस्वी जयस्वालने शनिवारी अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या वन-डेमध्ये नाबाद ११० धावांची खेळी करून शतक झळकावले होते. असे असूनही, पुढच्या महिन्यात इंग्लंडमध्ये होणाऱ्या तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेसाठीच्या भारतीय संघात त्याला स्थान मिळाले नाही. त्याच्या कारकिर्दीतील केवळ सहाव्या वन-डेमधील हे त्याचे दुसरे शतक होते, तरीही इंग्लंड दौऱ्यासाठीच्या १५ जणांच्या संघात त्याला जागा मिळवता आली नाही. यावरून वन-डे क्रिकेटमधील भारताची फलंदाजीची समृद्ध फळी दिसून येते. विराट कोहलीचे संघात पुनरागमन हे त्याच्या तंदुरुस्तीच्या चाचणीतील यशावर अवलंबून असेल. पायाच्या दुखापतीमुळे बाहेर पडलेल्या कोहलीच्या जागी अफगाणिस्तानविरुद्धच्या वन-डे मालिकेसाठी जयस्वालची निवड करण्यात आली होती.

कोहलीची तंदुरुस्ती चाचणी पुढील आठवड्यात बंगळुरू येथील बीसीसीआयच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये घेतली जाईल.

भारताच्या वेगवान गोलंदाजीच्या फळीत बुमराहने प्रिन्स यादवची जागा घेतली आहे, तर डावखुरा फिरकी अष्टपैलू खेळाडू हर्ष दुबेच्या जागी अक्षर पटेलचे थेट पुनरागमन झाले आहे. प्रिन्स आणि दुबे या दोघांनीही अफगाणिस्तानविरुद्ध वन-डेमध्ये पदार्पण केले होते.

हार्दिक पांड्यालाही संघात स्थान मिळालेले नाही. या अष्टपैलू खेळाडूची सुरुवातीला अफगाणिस्तानविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी निवड झाली होती, परंतु पायाच्या दुखापतीमुळे तो मालिकेतून बाहेर पडला. इंग्लंड दौऱ्यावरील तीन वन-डे सामने बर्मिंगहॅम (१४ जुलै), कार्डिफ (१६ जुलै) आणि लॉर्डस (१९ जुलै) येथे खेळविले जाणार आहेत.

**इंग्लंडमधील वन-डे मालिकेसाठी भारतीय संघ :** शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली (तंदुरुस्ती चाचणीच्या अधीन), श्रेयस अय्यर (उपकर्णधार), केएल राहुल (यष्टिरक्षक), इशान किशन (यष्टिरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, नितीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, प्रसिध कृष्णा, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, गुरनूर ब्रार. ◂ (वृत्तसंस्था)

## संक्षिप्त...

### ज्येष्ठ समाजवादी नेते प्रा. शिवाजीराव शिंदे यांचे निधन



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २१ जून : विद्यार्थी दशेपासूनच डाव्या व समाजवादी विचारांची कास धरून संपूर्ण महाराष्ट्रात वंचितांच्या न्यायासाठी आयुष्य वेचणारे निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु) येथील ज्येष्ठ समाजवादी नेते प्रा. शिवाजीराव शिंदे यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी लातूर येथील विवेकानंद कॅन्सर हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. गेल्या तीन महिन्यांपासून ते आतड्याच्या कर्करोगाशी (कॅन्सर) झुंज देत होते. हैदराबाद आणि लातूर येथे त्यांच्यावर उपचार सुरू होते, मात्र वाढत्या वयामुळे उपचाराला प्रतिसाद न मिळाल्याने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील समाजवादाचा एक निस्वार्थी व बुलंद आवाज कायमचा हरवला असून, एका धगधगत्या पर्वाचा अंत झाला आहे.त्यांच्या पार्थिव देहावर सोमवार, दिनांक २२ रोजी सकाळी ९:00 वाजता त्यांचे मूळ गाव अंबुलगा बु. (ता. निलंगा) येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्र्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# विश्वेश्वरय्या महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम

## १६३विद्यार्थ्यांनी मिळविले ९०% पेक्षा अधिक गुण;६६८ विद्यार्थी विशेष गुणांसह उत्तीर्ण



तभा वृत्तसेवा

औसा दि. २१ जून : तालुक्यातील आलमला येथील विश्र्वेश्र्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या उन्हाळी परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या वर्षीही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवत अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले असून १६३ विद्यार्थी ९०% पेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत तर विशेष प्राविण्यासह ६६८ विद्यार्थी तर प्रथम श्रेणीत ३४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महाविद्यालयाचा अंतीम वर्षाचा निकाल ९६.९४ टक्के लागला आहे.

तृतीय वर्षातील संगणक अभियांत्रिकी शाखेतील संध्या आळणे, नम्रता गोगाडे, रामोला शेळके अनुक्रमे ९६.३५ टक्के गुण घेऊन महाविद्यालयातून प्रथम, राज कांबळे ९६.२४ टक्के गुण घेऊन व्दितीय तर समिक्षा रूकमे ९५.0६ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. संगणक अभियांत्रिकी प्रथम वर्षातून साक्षी टेकाळे ९२.४७ टक्के गुण घेऊन प्रथम, हुजेफ बापुडे ९२ टक्के गुण घेऊन व्दितीय तर सौंदर्या शिंदे ९१.८८ टक्के गुण तृतीय आली आहे. संगणक व्दितीय वर्षातून सृष्टी म्हेत्रे ९२.५९ टक्के गुण घेऊन प्रथम, श्रुती गणापुरे ९१.७७ टक्के गुण घेऊन व्दितीय तर महादेवी दळवे ९0 टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे.

इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी तृतीय वर्षातुन अफरिन शेख ९५.५३ टक्के गुण घेऊन प्रथम, तनाज मुलानी ९५.४७ टक्के गुण घेऊन व्दितीय तर ऋषीकेश देशपांडे ९५.४१ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे.

सिव्हील इंजिनीअरिंग तृतीय वर्षात यशराज कानडे ९३.३0 टक्के गुण घेऊन प्रथम, रोहन जाधव ९३.१0 टक्के गुण घेऊन व्दितीय तर प्रणव जाधव ९२.६0 टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे.

इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग तृतीय वर्षामधुन श्रेया म्हाळगी ९३.७९ टक्के गुण घेऊन प्रथम, वेदांत शिंदे ९३.0५ टक्के गुण घेऊन व्दितीय तर साधना म्हेत्रे ९२.६३ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे.

ईलेक्ट्रॉनिक्स न्ड टेलिकम्नुनिकेशन शाखेतील तृतीय वर्षातुन ओंकार गोरे ९३.६७ टक्के गुण घेऊन प्रथम, समिक्षा नागराळे ९२.३३ टक्के गुण घेऊन व्दितीय तर श्रवण गावकरे ९२ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. मेकॅनिकल इंजिनीअरिंग अंतीम वर्षातुन नागेश जावळे ९१.७८ टक्के गुण घेऊन प्रथम, कृष्णा बिराजदार ८९.६७ टक्के गुण घेऊन व्दितीय तर शुभम जोशी ८७.७८ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे.

मेकॅनिकल व्दितीय वर्षातुन भिंगोले गायत्री ८६.६७ टक्के तर प्रथम वर्षातुन सुप्रित ख्याडे ८८.३0 टक्के गुण घेऊन प्रथम आला आहे.

महाविद्यालयातुन ऋतुजा खोसे, राजेश केंद्रे अरबाज सय्यद, प्रतिक बिडवे ९५.४१ टक्के, मंथन औताडे ९४.८२ , कृष्णा पाटील ९५.१८, समीक्षा खुने ९४.९४ , संध्या माने, स्नेहा लोणारे अनुक्रमे ९४.८२, ऋषीकेश जगताप ९४.४७ , हजारे अदिती, प्रियंका पाटील अनुक्रमे ९४.१२ टक्के, कृष्णाई तोटे ९४, अमन पटेल ९३.७७, पल्लवी शिंदे ९३.५३, श्रेया बायसठाकुर, श्र्वेता लोहारे अनुक्रम ९३.४१ टक्के, साक्षी बालागिडे ९३.१८, अदित्य हवालदार ९३.८८, श्रेया काळे ९४.७१, भगवती जाधव ९२.९४, रिया सातपुते ९२.५९, अश्र्वीनी तोडकर ९१.२९, वैभवी डाकोरे९१.७७, सक्षम वाघमारे ९१.४१, ऋतुजा धवने९0.५९, राधिका आगळे ९0.८२, सुमित चंदनशिवे ९२.४७, श्रृष्टी पाटील ९३.७७, किरण साळुंके ९३.६0, माहेश्र्वरी बोधने ९२.८२, अथर्व सबनिस ९२.८२, जायेदखान पठाण ९२.३५, मयुरी कवठे ९२.४७, शौर्य येदले ९१.६0, प्रथमेश सरवदे, प्रतिक बिडवे ९१.५३, गणेश चित्ते ९२.४७ टक्के, स्वानंदी बोकिल ९२.५९, गौरी जाधव ९१.८८, कार्तिक शाह ९१.१८, तनुजा बनसोडे अथर्व दोडतळे, पार्थ साळुंके ९१.२९ टक्के, वैभव राऊत ९0.३५, प्रथमेश पवार ९0.८२, प्रद्युम्न मगर ९0.१२, फरिना मुजावर ९0, आसावरी इटकर ९१.0६, अभय काळे ९0.५९, अदिबा पाटील ९0.४७, प्रतिक्षा कांबळे ९0.३५, सागर चामे ९0.१२, दिक्षा चौधरी ९५.१८, सृष्टी सूर्यवंशी ९४.८२, प्रकाश कंकाळ ९४.७१, पाटील अथर्व ९४.१२, राणी मोरे ९४, स्नेहा लोमटे ९३.५३, अदिनाथ केंद्रे ९३.४१, निकिता धवन, गौरव चिद्रे ९३.२९, आसावरी पाठक ९३.१८, शुभम शिंदे ९३.0६, नम्रता माळी ९२.८२, विश्र्वजित ढगे, जिंदाशहा फकिर ९२.७१, स्नेहल पाटील ९२.४७, रितेश चौधरी, वैभवी कठारे, सायली पाटील ९२.३५, सई मद्ये, हर्षवर्धन सातपुते ९२.२४, मन्मथ मुरगे, हर्षद माने ९२.१२, गिता साळुंके ९१.८८, गिताश्री बिराजदार , अमृता गावकडे , वैष्णवी लोंढे ९१.७७, नेहा मातोळे , महेश कोलबुदे ९१.६५, प्रतिभा बिराजदार, साक्षी उपासे ९१.५३ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

परिक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, विश्र्वेश्र्वरय्या इन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, उपप्राचार्य डॉ. गोपाळ दंडिमे, विभाग प्रमुख प्रा. रेवणसिध्द बुक्का, प्रा. प्रविण साबदे, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. अंकुश बिडवे, प्रा. संदेश माडे, प्रा. अजित लोकरे, प्रा. अब्दुल समद काझी सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले

## शिवाजी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. २१ जून : रेणापूर येथील शिवाजी महाविद्यालयात उन्हाळी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी. व एम.कॉम. परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत बी. ए. बी. कॉम, बी एस्सी, व एम कॉमच्या २०२६ च्या उन्हाळी परिक्षेत येथील शिवाजी महाविद्यालयाने दरवर्षीची गुणवत्तेची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले. यामध्ये कला शाखेतून

सत्यम जोगदंड ८0.३१ टक्के गुण घेवुन प्रथम, द्वितीय अनुसया लहाने ७८.४८ टक्के, तृतीय प्राजक्ता कांबळे ७७. ८0 टक्के गुण वाणिज्य शाखेतून दिप्ती गंगणे ७६.७५ टक्के गुण घेवून प्रथम, द्वितीय प्रिया येंनफळे ७५.२0 टक्के, तृतीय सायली सांळुके ७३.४७टक्के गुण घेवुन उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखा-भक्ती जोगदंड या विद्यार्यांनी ७९.८0 टक्के गुण घेवुन प्रथम, द्वितीय वैष्णवी औसेकर ७७.९७ टक्के, तृतीय मारिया खान ७६.५७ टक्के गुण घेवून उत्तीर्ण तसेच एम कॉम मधून सानिया बागवान ७१.२0 टक्के गुण घेवुन प्रथम तर अलफिया शेख ६८.३0 टक्के गुण घेवुन उत्तीर्ण झाले आहे.

## मुरूड गावातून जाणाऱ्या महामार्गाची संयुक्त पाहणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ जून : मुरुड लातूर-मुरुड-येडशी-टेंभुर्णी या महामार्गाची चौपदरीकरण व्हावे म्हणून सातत्याने पाठपुरावा चालू आहे. त्या अनुषंगाने लातूर-मुरुड-येडशी या ७0 किलोमीटर चे चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर असून लातूर-मुरुड-येडशी हा चौपदरीकरण महामार्ग मुरुड शहराच्या बाहेरून रिंग रोडने जातो. त्यामुळे मुरुड शहरातून जाणारा साडेचार किलोमीटर महामार्गाचे चौपदरीकरण, दुभाजक, नाली पथदिवे व फूटपाथ करावे. यासाठी लक्ष्मीकांत तवले यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन दिले होते. त्यांनी अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग विभागास सदरील साडेचार किलोमीटरचे अंदाजपत्रक करावे, यासाठी त्यांच्या स्तरावर आदेश निघालेले आहेत. सदरील आदेशाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग, लातूर यांनी सदरील साडेचार किलोमीटरच्या चौपदरीकरणासह रस्त्याच्या बाजूला असलेल्या, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाचे पोल तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग यांच्या पाईपलाईन, चौपदरीकरणाच्या एका बाजूला घ्याव्यात. या संदर्भात राष्ट्रीय महामार्ग विभाग, लातूर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, लातूर जिल्हा परिषद लातूर, व महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, मुरुड. या सर्व विभागाच्या वतीने सदरील साडेचार किलोमीटर महामार्गाची संयुक्त पाहणी करण्यात आली.

## राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

### वर्षभर शैक्षणिक साहित्य देणार : तालुकाध्यक्ष सुरेश शेवाळे



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २१ जून : महाराष्ट्र नवनिर्माण सेना चाकूरच्या वतीने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त चापोली येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहीत्याचे वाटप करण्यात आले व येथिल विद्यार्थ्यांना वर्षभर शैक्षणिक साहीत्य पुरवठा करण्याचे आश्र्वासन मनसे तालुकाध्यक्ष सुरेश शेवाळे यांनी दिले. यावेळी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक परमेश्र्वर स्वामी,उर्दु शाळेचे शेख जक्कि मोहंमद नुर मोहमद,कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा मुर्गे,शिक्षक सतीशचंद्र शंकरे, शिक्षिका वर्षा श्रृंगारे,चापोली ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी संतोष कुरुळेकर,महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष सुरेश शेवाळे,तालुका उपाध्यक्ष बस्वराज होनराव,नवनाथ गोरगिळे, शंकर पाटिल,अतिश सरकाळे,भागवत शंकरे, राम गादगे,बालाजी कोरे,बाळु आलमले,योगेश स्वामी आदी उपस्थित होते.

## जळकोट मुखेड बोधन रेल्वे संदर्भात गोपाळकृष्णन, खा. काळगे यांच्यात महत्त्वाची बैठक

### लवकरच केंद्र सरकारकडे लातूर रोड जळकोट बोधन पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले




तभा वृत्तसेवा

जळकोट दि. २१ जून : गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या व रेल्वेच्या नकाशावर आलेला १३0 किलोमीटर अंतराचा लातूर रोड जळकोट मुखेड नरसी बिलोली बोधन रेल्वे मार्ग . या नवीन रेल्वे मार्गाच्या निधी संदर्भात दि१८ जुन रोजी उदगीर येथे झालेल्या दक्षिण मध्य रेल्वे रेल्वेच्या सिकंदराबादचे विभागीय व्यवस्थापक गोपाळ कृष्णन यांच्या उपस्थित बैठकीत घेण्यात आली . लातूरचे खासदार डॉ . शिवाजीराव काळे यांनी हा प्रश्र्न किती महत्त्वाचा आहे तो उपस्थित करून सांगण्यात आले . तेव्हा सिकंदराबाद चे विभागीय व्यवस्थापक गोपाळकृष्ण यांनी यावर तात्काळ केंद्र शासनाकडे याची शिफारस करू असे आश्र्वासन त्यांनी या बैठकीत दिली असल्याचे खासदार डॉक्टर शिवाजीराव काळगे यांनी सांगितले दक्षिण आणि उत्तर भारताला अत्यंत जळून जोडणारा हा हा मार्ग असून या मार्गामुळे विशाखापटनम मुंबई ही दोन बंधारे जोडली जाणार असून यामुळे व्यापारात उद्योगात रोजगारात रोजगारात याचा मोठा फायदा होणार असून समुद्र भारताची या दळणवळण मुळे कनेक्टिव्हिटी मिळणार असून आणि या भागाच्या विकासात भर पडणार असून अनेक उद्योगधंदे सुरू होऊन अनेक बेकारांच्या हाताला काम मिळेल हा त्याचा पाठीमागचा उद्देश असल्याचेही यावेळी डॉक्टर काळगे यांनी सांगितले या बैठकीत वंदे भारत ट्रेन सुरू करण्यात यावी. सिकंदराबाद ते मुंबई सिकंदराबाद पुणे शहनायन ट्रेन सुरू करण्यात यावी आठवड्यातून तीनदा असलेल्या यशवंतपुर ते लातूर सिकंदराबाद हडपसर बिदर मुंबई या रेल्वे गाड्या नियमित सुरू करण्यात याव्यात तसेच रेल्वे संरक्षण दलाची कायम नियुक्ती उदगीर व लातूर रोड येथे चौकी स्थापन करून करण्यात यावी याही मागण्या यावेळी करण्यात आल्या या सर्व प्रश्र्नावर सिकंदराबाद दक्षिण मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापक गोपाळकृष्ण यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सदरचे प्रश्र्न मार्गी लावण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्र्वासन दिले तर डॉक्टर काळगे यांनी लातूर रोड ते बोधन हा रेल्वे मार्गासाठी येणाऱ्या केंद्रीय पावसाळी अधिवेशनात हा प्रश्र्न लावून धरल्या धरण्यात येईल असे बोलताना सांगितले .

याप्रसंगी उदगीर रेल्वे संघर्ष समिती चे अध्यक्ष . रमेश अंबरखाने, सचिव मोतीलाल डोईजोडे, माजी आमदार . शिवराज तोंडचिरकर, उमाकांत वडजे, विजय पारसेवार,. नाथा कोटलवार, आशिष पाटील, दयानंद बिरादार, एस. एस. पाटील, . मुरलीधर जाधव, विश्र्वनाथ बिरादार, ओम गांजुरे, श्रीनिवास सोनी, सचिन शिवशेट्टे आदी मान्यवर मराठवाडा जनता विकास परिषदेचे सदस्य, विविध संस्था, संघटनेचे पदाधिकारी, दक्षिण मध्य रेल्वे विभागाचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
छोट्या जाहिराती/जाहीर प्रगटन / इतर जाहिराती योग्य दरात छापल्या जातील संपर्क –७३८५५६७०३१

## आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप




तभा वृत्तसेवा

वलांडी, दि. २१ जून : निलंगा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार, लोकनेते तथा विकासपुरुष मा. संभाजी भैय्या पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद सदस्य रामलिंग शेषेराव शेरे यांच्या पुढाकारातून जवळगा गटातील विविध जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

वाढदिवसाचे औचित्य साधून समाजोपयोगी उपक्रम राबवत विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल व इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उत्साह निर्माण झाला असून त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदाने कार्यक्रमाला विशेष अर्थ प्राप्त झाला.

या उपक्रमांतर्गत बोंबळी (खु.), बोंबळी (बु.), टाकळी, कोरेवाडी, दवणहिप्परगा, महादेववाडी, वडमुरंबी, बोळेगाव, आनंदवाडी, इंद्राळ आणि रामवाडी या ११ गावांतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना भेट देण्यात आली.

यावेळी बोलताना जि.प. सदस्य रामलिंग शेषेराव शेरे यांनी सांगितले की, मा. संभाजी भैय्या पाटील निलंगेकर यांनी नेहमीच शिक्षण, सामाजिक विकास आणि सर्वसामान्यांच्या कल्याणाला प्राधान्य दिले आहे. त्यांच्या प्रेरणेतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हा छोटासा प्रयत्न करण्यात आला आहे.

शिक्षण हीच समाजपरिवर्तनाची खरी ताकद असून नेत्यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याची परंपरा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या प्रसंगी भाजपचे सरचिटणीस सुधीर भोसले, भाजयुमो सरचिटणीस प्रशांत पाटील, नरसिंग बिरादार, जयंत पाटील, विठ्ठल बोयने, ज्योतिराम बिरादार, ज्ञानेश्र्वर सगर, रितेश भोसले यांच्यासह शालेय विद्यार्थी, शिक्षक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसेनेतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप



तभा वृत्तसेवा

किनगाव दि. २१ जून : शिवसेनेच्या ६0 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राळगातांडा येथे सामाजिक बांधिलकी जपत गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन आणि इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप शनिवारी करण्यात आले. हे साहित्य हाती पडताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.

शिवसेना वर्धापन दिनानिमित्त हा मागील ३0 वर्षे पासून चिमुकल्यांना मदत करण्यात येत आहे. यावेळी शिवसेना माजी तालुकाप्रमुख प्रदीप चौकटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानोबा राठोड, मुख्याध्यापक राजू चिलकरवार, सुशेन पाटील, दत्ता बैकरे, किशोर बने, राजाराम श्रीमंगले यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## संभाजीभैय्या पाटील निलंगेकर वाढदिवसानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांना खाऊ वाटप




तभा वृत्तसेवा

वलांडी दि. २१ जून : लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा निलंगा मतदारसंघाचे आमदार यांच्या वाढदिवसानिमित्त वलांडी येथे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी खाऊ वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.

श्री संगमेश्र्वर शिक्षण प्रसारक मंडळ, शिवूरद्वारा संचलित छत्रपती शिवाजी महाराज निवासी मतिमंद विद्यालय, वलांडी तसेच बजरंग निवासी अपंग विद्यालय, वलांडी येथील विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवराज आष्टुरे यांच्या वतीने खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

सामाजिक बांधिलकी जपत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी खाऊचा आनंद घेत पालकमंत्री संभाजीभैय्या पाटील निलंगेकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी दोन्ही विद्यालयांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

फोटो ओळ : माजी पालकमंत्री संभाजीभैय्या पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त वलांडी येथील दिव्यांग विद्यार्थ्यांना संस्थापक अध्यक्ष शिवराज आष्टुरे यांच्या वतीने खाऊ वाटप करण्यात आले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### लग्नाचे आमिष दाखवून वारंवार अत्याचार; तरुणासह आई-वडिलांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २२ जून-**

लग्नाचे आमिष दाखवून एका २३ वर्षीय तरुणीस सोलापूर-पुणे मार्गावरील एका लॉजवर नेऊन वारंवार लैंगिक अत्याचार करून जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी एका तरूणासह त्याच्या आई-वडिलांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात बलात्कार व अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अरुण सुधीर गुरव, भाग्यश्री सुधीर गुरव, सुधीर विठ्ठल गुरव (तिघे रा. तांदूळवाडी) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत २३ वर्षीय पीडितेने खुद्द फिर्याद दिली आहे. यातील आरोपी अरुण याने यातील पीडित तरुणीशी २०२४ ते आजपर्यंत प्रेमसंबंध निर्माण करून, तिला लग्नाचे आमिष दाखवून जबरदस्तीने संबंध ठेवले. त्यानंतर लग्न करण्यास नकार दिला. तसेच आरोपीचे आई वडील भाग्यश्री व सुधीर यांनी पीडितेला ''तू मागास समाजाची आहेस, आमचा तुझ्याशी संबंध नाही'' असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ करून अपमान केल्याचे फिर्यादित म्हटले आहे. सहाय्यक पोलिस आयुक्त हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

### एकुलत्या मुलाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि.२१ जून-**

एका २१ वर्षीय एकुलत्या मुलाने राहत्या घरातील छताच्या लोखंडी अँगलला साडीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथे उघडकीस आली. संकेत राजेंद्र जाधव उर्फ ढेकळे (रा.कारंडेनगर, बेलाटी, ता.उत्तर सोलापूर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. तो अविवाहित असून मजुरी करायचा. शनिवारी त्याचे आई-वडील हे कामानिमित्त बाहेर जाऊन संध्याकाळी आठ वाजता घरी परतले. तेव्हा घराचे दार आतून बंद होते. त्यांनी बराच वेळ आवाज दिला मात्र आतून काहीच उत्तर मिळत नसल्याने शंका आल्याने त्यांनी शेजारच्या घरातून त्यांच्या घरात प्रवेश केला. तेव्हा संकेत याने घरातील छताला गळफास घेतला असल्याचे त्यांच्या निदर्शनास पडले. इतरांच्या साह्याने त्यांनी संकेत यास फासातून सोडवून खाली उतरविले. ही खबर सलगर वस्ती पोलिसांना समजली असता पोलिस हवालदार एस.एस. पांढरे यांनी घटनास्थळी पोहोचून त्यास शासकीय रुग्णालयात दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मयत संकेत याच्या पश्चात आई, वडील, दोन विवाहित बहिणी असा परिवार आहे.

### लग्नाचे आमिषने दाखवून तरुणीवर अत्याचार

**सोलापूर, दि. २१ जून-**

लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणीवर सोलापूर मंगळवेढा रोडवरील एका लॉजमध्ये नेऊन लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणी एका तरुणाविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदित्य विजयकुमार कापुरे (रा. आमराई, देगाव नाका, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत खुद्द पीडित तरुणीने फिर्याद दिली आहे. यातील आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून यातील पीडित तरुणीला २४ मार्च २०२६ ते आजतागायत सोलापूर-मंगळवेढा रोडवरील लॉजमध्ये नेऊन तिच्यावर वेळोवेळी लैंगिक अत्याचार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक खामकर या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

# जनजागृतीद्वारे ग्राहकांच्या शंका दूर करुनच स्मार्ट मीटर बसविणार

**'महावितरण'चे नूतन संचालक धनंजय औंढेकर**

**२ कोटी ४१ लाखांपैकी एक कोटी २० लाख स्मार्ट मीटर बसविले**

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि. २१ जून-**

महावितरणकडून महाराष्ट्रातील घरोघरी स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरु असून एकूण तीन कोटींपैकी आतापर्यंत एक कोटी २० लाख स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्ट मीटरबाबत वीज ग्राहकांनी कोणत्याही शंका मनात ठेवू नयेत. स्मार्ट मीटर बसविल्याने वीजेचे बील जास्त येणार नाही याची आम्ही खात्री देतो. जनजागृतीसाठी ग्राहकाच्या घरी जुने मीटर आणि स्मार्ट मीटर प्रत्यक्ष बसवून प्रात्यक्षिकाद्वारे वीज ग्राहकांच्या सर्व शंका दूर केल्या जातील, अशी ग्वाही महावितरण कंपनीचे नूतन संचालक धनंजय औंढेकर यांनी सोलापुरात दैनिक तरुण भारतशी बोलताना दिली. ग्राहकांना वीजेचे बील ऑनलाईन देण्यासह अनेक नवीन प्रयोग यशस्वीपणे राबविलेले असून ग्राहकांना महावितरणकडून देण्यात येणाऱ्या सर्व सोयी-सुविधा सहज आणि वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबध्द असल्याचाही विश्वास श्री. औंढेकर यांनी दर्शविला.

महावितरण कंपनीच्या संचालक (संचालन) पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर धनंजय औंढेकर यांनी श्री अक्कलकोट स्वामी समर्थांचे दर्शन घेत आशिर्वाद घेतले. श्री. औंढेकर यांनी थेट भरती प्रक्रियेद्वारे या पदावर निवड करण्यात आली असून यापूर्वी ते कार्यकारी संचालक (वितरण/प्रकल्प) म्हणून कार्यरत होते. महावितरणमध्ये जवळपास २९ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या औंढेकर यांच्याकडे आता कंपनीच्या संचालनाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. महावितरणमधील आजवरच्या विविध पदांवरील सेवेत श्री. औंढेकर यांनी वीज ग्राहकांसाठी अनेक योजना राबविलेल्या असून लोकाभिमुख प्रशासक अशी त्यांची जनतेसह खात्यात ओळख आहे. मूळचे हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ येथील असलेल्या धनंजय औंढेकर यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवीसह एमबीए (फायनान्स), एनर्जी ऑडिटर आणि नवी दिल्ली येथील पॉवर डिस्ट्रीब्युशन मॅनेजमेंट मधील ॲडव्हान्स सर्टिफिकेट अभ्यासक्रम विशेष प्राविण्यासह पूर्ण केला आहे. सन १९९७ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे त्यांनी सेवेला सुरुवात केली. त्यानंतर २००६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून कार्यकारी अभियंता, २०१६ मध्ये अधीक्षक अभियंता आणि २०१९ मध्ये पदोन्नतीद्वारे मुख्य अभियंता पदावर त्यांची नियुक्ती झाली. सेवाकाळात त्यांनी बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, सोलापूर, कल्याण तसेच मुंबई मुख्यालयात विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. २०२४ पासून कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत असताना त्यांच्या नेतृत्वाखाली महावितरणने 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेत देशात प्रथम क्रमांक पटकावला. एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याचा विक्रमही महावितरणने नोंदविला असून त्याची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. तसेच प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत घरावरील सौर ऊर्जा प्रकल्पांच्या अंमलबजावणीत महावितरणने देशात दुसरे स्थान मिळविले. या योजनेसाठी देशातील पहिली फेसलेस-पेपरलेस ऑनलाइन सुविधा सुरू करण्यासह नवीन वीजजोडणी, ग्राहकांच्या नावातील बदल आणि वीजभार वाढीसाठी स्वयंचलित मंजुरी प्रणाली सुरू करण्यातही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे.



औपचारिक गप्पांमध्ये बोलताना धनंजय औंढेकर यांनी सांगितले की, राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस, सीएमओ कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव तथा सीएमडी लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि विशेष संचालक विश्वास पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीला अधिक सक्षम, ग्राहकस्नेही आणि हरित ऊर्जेकडे नेण्यासाठी प्राधान्य दिले जाईल. नवीन वीजजोडणीची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन करण्यात येणार असून सुरळीत वीजपुरवठा, दर्जेदार ग्राहकसेवा, वीज हानीत घट आणि महसूलवाढ ही प्रमुख उद्दिष्टे राहतील. सध्या कार्यरत पथकांची संख्या ६३ वरून १०० पर्यंत करण्याचा मानस असून राज्यातील वीज चोरीला आळा घालण्यासाठी ही पथके कार्यरत असतील. महावितरण कर्मचाऱ्यांच्या कामाची गती वाढविण्यावरही भर असणार आहे. स्मार्ट मीटर बसविण्याबाबत वीज ग्राहकांनी सहकार्य करावे, असेही आवाहन त्यांनी केले आहे. २०१७ साली सोलापुरात कार्यरत असतानादेखील श्री. औंढेकर यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. सन २०१८ ते २० या कालावधीत मुंबई येथे कार्यरत असताना २०१८ पासून महाराष्ट्रात सेंट्रल बिलिंग सिस्टीम सुरु केली आणि त्यामुळे मीटर रिडींग सुरळीत सुरु झाल्याचेही त्यांनी सांगितले.

महावितरणच्या संचालन क्षेत्रातील अनुभवी अधिकारी म्हणून ओळख असलेल्या धनंजय औंढेकर यांच्या नियुक्तीमुळे कंपनीच्या विविध प्रकल्पांना अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. याप्रसंगी महावितरणचे सोलापूर अधीक्षक अभियंता सुनिल माने, महापारेषणचे कार्यकारी अभियंता नवनाथ चव्हाण, वीज कामगार नेते विलास कोल्हे आदी उपस्थित होते.

### कोयता दाखवून धमकावले


**सोलापूर, दि.२१ जून-**

चायनीज गाडीवर झालेल्या वादाचा राग मनात धरुन एका तरुणाला कोयता दाखवत धमकावल्या प्रकरणी अरुण भीम राव पेद्दे (रा.लहान इरण्णा वस्ती, रामवाडी, सोलापूर) यांच्याविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दीपक नागनाथ चलवादी (वय-२५, रा.शामा नगर झोपडपट्टी, सोलापूर) १८ जून रोजी त्यांचा वाद झाला होता. २० जून रोजी इरण्णा वस्तीकडे जात असताना कोयता घेऊन मारण्यासाठी धावून आला.

# राज्यसेवेत २६५ पदांची मेगाभरती; पण उपजिल्हाधिकारी पदाचा अद्याप पत्ता नाही!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जून**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) राज्यसेवा भरती प्रक्रियेतील पदसंख्या वाढवत एकूण २६५ जागांचा सुधारित तपशील जाहीर केला आहे. वाढीव पदांमुळे अनेक स्पर्धा परीक्षार्थींना दिलासा मिळाला असला, तरी उपजिल्हाधिकारी पदाचा समावेश नसल्याने महसूल प्रशासनात करिअर करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.




आयोगाने दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी ८७ रिक्त पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यानंतर विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या मागणीपत्रांच्या आधारे पदसंख्येत मोठी वाढ करण्यात आली. नव्या सुधारित यादीत पोलिस उपअधीक्षक/सहाय्यक पोलिस आयुक्त, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य कर सहाय्यक आयुक्त, वित्त व लेखा सेवा, मंत्रालयीन कक्ष अधिकारी, उद्योग अधिकारी, जलसंधारण अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी तसेच विविध तांत्रिक आणि प्रशासकीय पदांचा समावेश करण्यात आला आहे.

पोलिस उपअधीक्षक/सहाय्यक पोलिस आयुक्त या पदांसाठी आठ जागा देण्यात आल्या आहेत. मात्र राज्यसेवा परीक्षेतील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या उपजिल्हाधिकारी पदाचा उल्लेख सुधारित जाहिरातीत नसल्याने चर्चा सुरु झाली आहे. स्पर्धा परीक्षा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, ही अंतिम पदसंख्या नसून महसूल विभागाकडून मागणीपत्र प्राप्त झाल्यास उपजिल्हाधिकारी पदाचा समावेश पुढील टप्प्यात होऊ शकतो. आयोगाच्या नियमांनुसार राज्यसेवा पूर्व परीक्षेचा निकाल जाहीर होण्यापूर्वी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या वाढीव जागा आणि नवीन मागण्या मूळ जाहिरातीत समाविष्ट करण्याची तरतूद आहे.

स्पर्धा परीक्षा विद्यार्थी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले की, राज्यातील रिक्त पदांचा विचार करता महसूल विभागासह आणखी काही संवर्गांचा समावेश होणे आवश्यक आहे. शासनाने वेळेत मागणीपत्र पाठविल्यास उमेदवारांसाठी महसूल प्रशासनातील संधी उपलब्ध होऊ शकतात.

# तीन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर जि.प. पदाधिकाऱ्यांना नवी वाहने

**अध्यक्ष-उपाध्यक्षांसाठी एक्स.यु.व्ही ७०० तर सभापतींसाठी स्कॉर्पिओ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जून-**

जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच विविध विषय समिती आणि पंचायत समिती सभापतींसाठी नवीन वाहनांची खरेदी प्रक्रिया पूर्ण झाली असून आचारसंहिता संपताच ही वाहने पदाधिकाऱ्यांच्या सेवेत दाखल होणार आहेत. पदभार स्वीकारल्यानंतर तब्बल तीन महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर पदाधिकाऱ्यांना अधिकृत वाहनांची सुविधा मिळणार असल्याने प्रशासकीय कामकाजाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने अध्यक्ष व उपाध्यक्षांसाठी अत्याधुनिक महिंद्रा एक्स यु व्ही ७००, विषय समिती सभापतींसाठी स्कॉर्पिओ तर पंचायत समिती सभापतींसाठी नवीन बोलेरो वाहने खरेदी केली आहेत. वाहनांची खरेदी प्रक्रिया पूर्ण झाली असून सध्या आरटीओ नोंदणी आणि विमा प्रक्रियेचे काम अंतिम टप्प्यात आहे. पुढील काही दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे.

तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी मार्च महिन्यात वाहन खरेदीचे आदेश दिल्यानंतर प्रक्रिया सुरु झाली होती. मात्र संबंधित कंपनीकडे वाहनांचा तुटवडा असल्याने वाहन पुरवठ्यास विलंब झाला. त्यामुळे नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांना



सुमारे तीन महिने प्रतीक्षा करावी लागली. वाहने उपलब्ध झाल्यानंतर प्रशासनाने आवश्यक औपचारिकता पूर्ण करण्यास सुरुवात केली आहे.

जिल्हा परिषदेच्या सहा विषय समिती सभापतींसह सात पंचायत समिती सभापतींना मिळून एकूण १३ नवीन वाहने वितरित करण्यात येणार आहेत. या वाहनांमुळे ग्रामीण भागातील दौरे, विकासकामांचा आढावा, नागरिकांच्या समस्या जाणून घेणे आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीवर अधिक प्रभावीपणे लक्ष ठेवणे शक्य होणार असल्याचे सांगण्यात येते. अध्यक्षांसाठी यापूर्वी खरेदी करण्यात आलेले टाटा सफारी वाहन सध्या वापराअभावी पार्किंगमध्ये पडून आहे. नव्या वाहनांच्या खरेदीनंतर जुन्या वाहनाच्या भवितव्याबाबत प्रशासनाला निर्णय घ्यावा लागणार आहे. जिल्हा परिषद प्रशासनाच्या या निर्णयामुळे पदाधिकाऱ्यांच्या कामकाजासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होत असून ग्रामीण विकासाच्या कामांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पत्रकारिता आव्हानात्मक क्षेत्र, परस्परांना बळ देणे गरजेचे : आ. कल्याणशेट्टी

**श्रमिक पत्रकार संघातर्फे शालेय साहित्याचे वाटप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जून-**

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाने केवळ पत्रकारांचे प्रश्न मांडण्यापुरते काम मर्यादित ठेवले नाही. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, पत्रकारांसाठी मेडिक्लेम योजना आणि विविध सामाजिक उपक्रम राबवून संघटनेने आदर्श निर्माण केला आहे. पत्रकारिता हे आव्हानात्मक क्षेत्र असून, पत्रकारांनी एकत्र येऊन परस्परांना बळ देणे गरजेचे आहे. शालेय साहित्य वाटप हा केवळ उपक्रम नसून पत्रकार कुटुंबांना एकत्र आणणारा आणि संघटनेविषयी आत्मीयता निर्माण करणारा उपक्रम आहे, असे गौरोद्गार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी काढले.



महापौर विनायक कोंड्याल, डॉ.शैलेशकुमार पाटील फाउंडेशन, शहाजीराजे पवार युवा मंच आणि राजदीप (एचपी) गॅस एजन्सी यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या पत्रकारांच्या पाल्यांना शालेय साहित्य वाटपप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, डॉ.शैलेशकुमार पाटील फाउंडेशनचे व्हाईस प्रेसिडेंट जगदीश पाटील, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत, ज्येष्ठ पत्रकार महेश रामदासी, विजयकुमार देशपांडे, सरदार अत्तार, तात्यासाहेब पवार, वैभव गाढवे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, उपाध्यक्ष आफताब शेख आदी उपस्थित होते.

समान विचार आणि समान ध्येय असलेली माणसे एकत्र आली, तर त्यातून मजबूत संघटना निर्माण होते. अडचणींवर मात करता येते. प्रत्येक क्षेत्रात संघर्ष आहे. प्रत्येकाच्या वाट्याला काही ना काही अडचणी येतात. एकजुटीतून त्या सोडवता येतात, असेही आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले. भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार म्हणाले की, कोणत्याही प्रसंगी लोकप्रतिनिधी पोहोचण्यापूर्वी घटनास्थळी पत्रकार उपस्थित असतात. समाजातील प्रत्येक घडामोड नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार प्रामाणिकपणे करतात. समाजातील सर्वसामान्य माणसाला आजही पत्रकारांवर विश्वास आहे. श्वेता हुल्ले यांनी सूत्रसंचालन केले.


**जाहिर प्रसिध्दीकरण**

सचांलक मंडळ पंचवार्षिक निवडणूक २०२६-३१
प्रारुप मतदार यादी अंतिम करणेचा कार्यक्रम

**तेरणा शेतकरी सहकारी रेशीम वस्त्र निर्माण संस्था म.उस्मानाबाद**

| कार्यक्रमाचा तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|
| प्रारुप मतदार यादी प्रसिध्द दिनांक | दिनांक २२/०६/२०२६ |
| प्रारुप मतदार यादीवर दावे आक्षेप दाखल करणेचा कालावधी | दिनांक २२/०६/२०२६ ते दिनांक ०१/०७/२०२६ |
| सुनावणी | दिनांक ०८/०७/२०२६ |
| प्राप्त आक्षेप यावर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धाराशिव यांनी निर्णय देणे | दिनांक १४/०७/२०२६ |
| अंतिम मतदार यादी प्रसिध्दीचा दिनांक | दिनांक १६/०७/२०२६ |

१. शासकीय व सार्वजनिक सुट्टीचे दिवशी निवडणूक कामकाज बंद राहील.
२. संबधीत दावेदार/हकरतदार/आक्षेपकार यांनी त्यांचे दावे / हरकती/आक्षेप लेखी नेमून दिलेल्या दिनांक, वेळी व ठिकाणी सबळ पुराव्यासह दाखल करणे आवश्यक आहे. पुराव्याशिवाय दाखल दावे/हरकती/आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

**सही/-**
**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव**



यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे

**सोजर कॉलेज ऑफ फार्मसी**

**मु.पो. खांडवी, ता. बार्शी, जि. सोलापूर**

फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया, महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त आणि
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाशी संलग्नित

संकेतस्थळ : www.sojarcop.edu.in ईमेल : hrsojar@gmail.com संपर्क : 9604397996

**पाहिजेत**

कायम स्वरुपी विनाअनुदानीत तत्वावर विविध शिक्षकिय पदावर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी पूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रासह **"अध्यक्ष यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ परांडा रोड गांधी स्टॉप बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर पिन कोड ४१३४०१"** या पत्त्यावर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांमध्ये पोहचतील अशा पध्दतीने पाठवावे. अपूर्ण अर्ज किंवा अपूर्ण कागदापत्रे किंवा नियत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
एकूण रिक्त जागा, आरक्षण, शैक्षणिक अनुभव व इतर अर्हता, वेतन, अटी शर्ती व अर्ज करण्याची पध्दत याबाबतच्या सविस्तर माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (www.sojarcop.edu.in) आणि विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.dbatu.ac.in) उपलब्ध आहे.
स्थळ : बार्शी
दिनांक : २०/०६/२०२६

**अध्यक्ष**
**यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी**


**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# योग आहे आरोग्याची क्रांती, योगासनाने जीवनात येईल सुखशांती





## मनोभावे करा योग, दूर पळतील सर्व रोग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जून-**

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालय, सोलापूर जिल्हा प्रशासन, मेरा युवा भारत आणि सोलापूर जिल्हा योग्य समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हरिभाई देवकरण प्रशालेच्या विस्तीर्ण मैदानावर आयोजित केलेल्या प्राणायम, ध्यानधारणा अर्थात सामुदायिक योग प्रात्यक्षिकद्वारे ''मनोभावे करा योग, दूर पळतील सर्व रोग... व्यायामात लभते स्वास्थं, दीर्घायुष्यं सर्व सुखं... योग आहे आरोग्याची क्रांती, योगासनाने जीवनात येईल सुखशांती...'' असा संदेश देण्यात आला.

प्रारंभी तहसीलदार पूनम दंडेले यांच्या हस्ते आणि शिक्षणाधिकारी कादर शेख, जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शंकर कांबळे, योगगुरु मनमोहन भुतडा, शाळा समितीचे अध्यक्ष एच.डी. मंकणी, जिल्हा क्रीडाधिकारी प्रकाश मोहरे, मनपा क्रीडाधिकारी नजीर शेख, उपमुख्याध्यापक कुमार यांच्यासह सुभाष चव्हाण, रघुनाथ क्षीरसागर, डी. पी.चिवडशेट्टी, नंदकुमार चितापुरे, विद्या होनमोडे, रोहिणी उपळाईकर, रघुनंदन भुतडा, संगीता जाधव, प्रभा कोडले आदींच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन करण्यात आले.

वासंती निंबाळकर, अभिषेक गायकवाड, विद्या होण्मोडे, लता माळगे, विजय क्षीरसागर यांनी शंख वादन केले. विद्या होण्मोडे, उन्नती संचेती, अभिषेक गायकवाड, कालिदास कोंडा यांनी प्रार्थना, शिथिलीकरण व उभ्याची आसने घेतली. प्रियांका झिंगाडे, शुभांगी घाडगे, जयश्री उमर्गीकर, संतोष खराडे यांनी बैठी आसने सादर केली. वैशाली दासरी, रेखा गोरंटी, लक्ष्मण सगर, दयानंद माशाळकर यांनी पोटावरील आसने करुन दाखविली. भगवान बनसोडे, स्नेहा बनसोडे, अश्विनी बनसोडे, मधुकर सुतार यांनी प्राणायाम करुन दाखविले. सुशांत संगनगारी, परशुराम, हरीश टवाणी यांनी पाठीवरील आसने सादर केली. संगीता जाधव यांनी ध्यान, संकल्प व प्रार्थना घेतली. निरंजन नृत्य अकादमीच्या जान्हवी दुदगीकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी बहारदार असे योग नृत्य सादर केले. लता माळगे, रोहिणी उपळाईकर, उज्ज्वला शिवगुंडे, रवी कंटले यांनी निवेदन केले. प्रमोद चुंगे यांनी स्वागत केले. स्मिता शहा यांनी सूत्रसंचालन केले. राहुल गायकवाड यांनी आभार मानले. याप्रसंगी सोलापूरकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.





### पाच जणांचा योगगुरु पदवी प्रदान

यावेळी भगवान तुकाराम बनसोडे, लता रेवणसिध्द माळगे, मिलिंद मुकुंद वाईकर, विशाखा प्रशांत रेठरे व मधुकर उध्दवराव सुतार यांना योगगुरु ही पदवी देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

### या संस्था, संघटनांचा होता सहभाग

पतंजली योगपीठ, भारतीय योग संस्था, विवेकानंद केंद्र, योग सेवा मंडळ, योग साधना मंडळ, योग प्रभा मंडळ, गीता परिवार, सर्व कल्याण योग, सर्वोदय योग साधना मंडळ, योग असोसिएशन, भारत स्वाभिमान ट्रस्ट यांसह जिल्ह्यातील विविध योग संस्था.

## महत्वाचे...

### शेतजमिनीच्या वादातून मारहाण

**सोलापूर, दि.२१ जून-**

शेतजमिनीच्या वादातून एका शेतकऱ्याला दगड व लाथाबुक्क्याने मारहाण केल्याची घटना करमाळा तालुक्यातील रावगाव येथे घडली. ज्ञानेश्वर दिनकर ढाकणे (वय-४५) असे मारहाण झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. शनिवारी दुपारी ते शेतात असताना प्रवीण केकान, गणेश केकाण व इतर चार जणांनी मिळून मारहाण केली. करमाळा येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी भाऊ तुकाराम ढाकणे यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### पलंगावरुन पडल्याने तरुणीचा मृत्यू

**सोलापूर, दि.२१ जून-**

घरामध्ये झोपलेल्या तीस वर्षीय तरुणीचा पलंगावरुन खाली पडून मृत्यू झाल्याची घटना रविवार पेठ परिसरात घडली. रेणुका पंडित मंजेली असे मयत तरुणीचे नाव आहे. शनिवारी संध्याकाळी ती घरामध्ये पलंगावर झोपलेली असताना झोपेत ती खाली पडली. बेशुध्दावस्थेत तिला बहीण सपना चव्हाण यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

### सिध्देवर तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि.२० जून-**

सोलापूरचे ग्रामदैवत सिध्देश्वर मंदिर येथील तलावात बुडून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. राहुल प्रभाकर भुमकर (वय-३०,रा.गवंडी गल्ली, उत्तर कसबा, बाळीवेस, सोलापूर)असे मयत तरुणाचे नाव आहे. शनिवारी सायंकाळी त्याचा मृतदेह तलावातील पाण्यावर तरंगताना आढळून आला. ही खबर फौजदार चावडी पोलिसांना समजली असता पोलिस नाईक एच.व्ही. मुलाणी यांनी घटनास्थळी पोहोचून इतरांच्या साहाय्याने सदरचा मृतदेह बाहेर काढून येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल केला.

### जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर, दि.२१ जून-**

दुचाकी स्लीप होऊन जखमी झालेल्या हिवरे गावच्या एका इसमाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात मृत्यू झाला. संभाजी शिवाजी गुंड (वय-४३, रा.हिवरे, ता.मोहोळ) असे मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. संभाजी गुंड हे शुक्रवारी सकाळी दुचाकीवरुन हिवरे गावाकडून तेलंगवाडीकडे जात असताना त्यांची दुचाकी स्लीप होऊन ते गंभीर जखमी झाले होते. त्यांचे नातेवाईक विशाल गुंड यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचारादरम्यान शनिवारी त्यांचा मृत्यू झाला.




## हॉटेलमध्ये झोपलेल्या कामगाराचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जून-**

रात्रीच्या सुमारास काम करुन हॉटेलमध्ये झोपलेल्या एका कामगाराचा झोपल्या ठिकाणी मृत्यू झाल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी शिवारातील हॉटेल रितेश येथे घडली. गंगाधर चिदानंद दीक्षित (वय-४०, रा.भंडारकवठे, ता.दक्षिण सोलापूर) असे मयत कामगाराचे नाव आहे. शनिवारी ते हॉटेलमध्ये झोपले होते. रविवारी सकाळी हॉटेल मालकाने त्यांना उठविण्याचा प्रयत्न केला असता ते बेशुध्दावस्थेत दिसून आले. गंगाधर दीक्षित यांना रमेश शिंदे यांनी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# नीट फेरपरीक्षेला ५२८ विद्यार्थ्यांची दांडी; ५,९४७ पैकी ५,४१९ विद्यार्थ्यांची उपस्थिती





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जून-**

रविवार, दि.२१ जून २०२६ रोजी सोलापूर शहरातील १६ परीक्षा केंद्रांवर नीट (यूजी) फेरपरीक्षा शांततापूर्ण वातावरणात आणि कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत पार पडली. मात्र या परिक्षेला ५२८ विद्यार्थ्यांनी दांडी मारली होती. एकूण ५,९४७ विद्यार्थ्यांपैकी ५,४१९ विद्यार्थ्यांनी परीक्षेला हजेरी लावत तब्बल ९१.१३ टक्के उपस्थिती नोंदवली. पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या या फेरपरीक्षेसाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली होती.

प्रश्नपत्रिकांची वाहतूक, साठवणूक आणि वितरण प्रक्रिया केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल व पोलिसांच्या देखरेखीखाली पार पडली. एसव्हीसीएस हायस्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेज येथे ४४१, एसव्हीसीएस हायस्कूल एमआयडीसी येथे ४३८, संगमेश्वर कॉलेज येथे ४४२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. दिव्यांग प्रवर्गातील ३१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर एक विद्यार्थी अनुपस्थित राहिला, असे सांगण्यात आले.

### कोणताही अनुचित प्रकार नाही

परीक्षा केंद्रांवर कोणताही अनुचित प्रकार घडला नसून संपूर्ण परीक्षा प्रक्रिया सुरळीत पार पडले. हरिभाई देवकरण परीक्षा केंद्रावर सकाळीच विद्यार्थ्यांची मोठी गर्दी दिसून आली. प्रशासनाने केलेल्या योग्य नियोजनाचे पालक आणि विद्यार्थ्यांनी स्वागत करत केले.

### कागदपत्रांची पडताळणी

परीक्षा केंद्रांवर प्रवेशापूर्वी विद्यार्थ्यांची कागदपत्रे, ओळखपत्रे आणि आवश्यक तपासणी करण्यात आली. परीक्षा केंद्र परिसरात अनावश्यक गर्दी होऊ नये; यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या होत्या. त्यामुळे परीक्षा प्रक्रिया नियोजनबध्द वातावरणात पार पडली.



## मुलीच्या घरी विचारपूस करणाऱ्या बापाला मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जून-**

मुलीच्या घरी जाऊन विचारपूस करणाऱ्या बापाला लाकडाने व लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील धरणी गावात घडली. आप्पा अण्णा मोहिते (वय-४५) असे मारहाण झालेल्या बापाचे नाव आहे. ते शनिवारी मुलीच्या घरी विचारपूस करण्यासाठी गेले असता तुम्ही कोण विचारणारे? असे म्हणत विशाल पाटील, सचिन पाटील व इतर दोन जणांनी मारहाण केली. मुलगा राहुल मोहिते याने मंगळवेढा येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारार्थ सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# रासायनिक प्रक्रिया करण्यावर मंदिर समिती ठाम, वारकरी संघटनेचा मात्र विरोध


■ **न्यायालयात याचिका**
■ **सोमवारी देणार निकाल**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ जून-**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल मुर्तीवर रासायनिक लेपन प्रक्रिया करण्याविषयी मंदिर समिती ठाम आहे. वारकरी संघटनेने मात्र यास विरोध दर्शविला असून पंढरपूर येथील प्रथम वर्ग दिवाणी न्यायालयातील न्यायाधीश राऊत यांच्याकडे याबाबत याचिका दाखल करण्यात आली. यावर सुनावणी पूर्ण झाली असून न्यायालयाने सोमवारी निकाल देणार आहे. या निकालाकडे पंढरपूरसह राज्यभरातील वारकरी भाविकांचे लक्ष लागले आहे.

श्रीविठ्ठलाच्या दर्शनाला वर्षभरात एक कोटीहून अधिक भाविक येत असतात. भाविक विठ्ठलाचे चरणस्पर्श घेऊन दर्शन घेतात. यामुळे विठ्ठलाच्या चरणाची झीज होत आहे. विठ्ठलाच्या मूळ मुर्तीस अभिषेक घालण्यात येत असल्याने मुर्तीचीही झीज झाली आहे. ही बाब लक्षात घेता, श्रीविठ्ठल-रुक्मिणी मुर्तीचे संवर्धन करण्यासाठी पुरातत्व विभागाच्या सूचनेनुसार मंदिर समितीने रासायनिक लेपन प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला आहे.

पंढरपूर येथील न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर नुकतीच सुनावणी पूर्ण झाली आहे. वारकरी संघटना व मंदिर महासंघाच्या वतीने ॲड.धनंजय रानडे यांनी बाजू मांडताना सांगितले की, श्रीविठ्ठल मुर्ती ही सर्वसामान्य भाविकांचे श्रध्दास्थान आहे. अभिषेकाचे जल भाविक तीर्थ म्हणून प्राशन करीत असतात. रासायनिक प्रक्रिया केल्याने मुर्तीची हानी आणि भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरु शकते. त्यामुळे श्रीविठ्ठल-रुक्मिणी मुर्तीना रासायनिक लेपन प्रक्रिया न करता आयुर्वेदिक लेपन प्रक्रिया करण्यात यावी.



### न्यायालयाने त्यांचा अर्ज फेटाळला

जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक होऊन वारकरी संप्रदायातील विविध संघटना, मान्यवर महाराज मंडळींना याबाबत सूचित करण्यात आले आहे. तरीही काही संघटना न्यायालयात गेल्या होत्या. परंतु न्यायालयाने त्यांचा अर्ज फेटाळला असल्याने पुरातन विभागामार्फत मूर्ती लेपन प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे, असे श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

### मंगळवार, बुधवार मंदिर राहणार बंद

पुरातन पुरातन विभागाच्या सूचनेनुसार दि.२२ जून ते २४ जून दरम्यान रासायनिक प्रक्रिया करण्यात येणार आहे. श्रीविठ्ठल-रुक्मिणी मुर्तीचे संवर्धन करण्याच्या कामास सोमवार, दि.२२ जून २०२६ रोजी रात्री १० वाजता प्रारंभ करण्यात येणार आहे. त्यामुळे मंगळवार, दि.२३ जून आणि बुधवार, दि.२४ जून २०२६ असे दोन दिवस मंदिर बंद राहणार आहे. भाविकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.

### 'रासायनिक'ऐवजी 'आयुर्वेदीय' लेपन करावे

श्रीविठ्ठल मुर्तीस 'रासायनिक'ऐवजी प्राचीन 'आयुर्वेदीय' पध्दतीने लेपन केले जावे; यासाठी वारकरी संप्रदाय व महाराष्ट्र मंदिर महासंघ आग्रही आहेत. त्यासंदर्भात मंदिर प्रशासनाशी चर्चा निष्फळ ठरल्याने नाईलाजास्तव न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायालयाकडून सकारात्मक निर्णय मिळेल, अशी आम्हाला खात्री असल्याचे महाराष्ट्र मंदिर महासंघाचे कार्यकारिणी सदस्य पुरुषोत्तम लंके यांनी सांगितले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी-१४७९

**तुका म्हणे पाप । माय नावडे ज्या बाप ।।**

आपल्याला कोणती व्यक्ती आवडावी व कोणती आवडू नये हे जो तो ठरवत असतो. व्यक्तीचे गुण, कौशल्य, स्वभाव, संबंध आदी बाबी विचारात घेऊन माणूस व्यक्तिबद्दल आपले मत बनवत असतो. या मताच्या आधारावर त्या व्यक्तिबद्दल आवड-नावड तो ठरवत असतो. पण काही व्यक्ति ह्या अशा असतात की, त्यांची आवड-नावड ठरवण्याचा आपल्याला अधिकारच नसतो. अर्थात, त्यांचा स्वभाव, गुण, कौशल्य, राहणीमान इत्यादी बाबी न पाहता केवळ संबंध पाहावे लागतात. या संबंधात सर्व काही सामावलेले असते. हे संबंध जगाच्या पाठीवर इतर कोणाशीही निर्माण करता येणे शक्यही नसते. हे संबंध म्हणजे दुसरे-तिसरे कांही नसून मुलांचे आई-वडीलांशी असणारे संबंध होत. ईतरांना आपण आई-वडील स्वरुप पाहू शकतो, त्यांच्यावर आई-वडीलांप्रमाणे प्रेम करू शकतो. तरी पण मुळात आई-वडीलांची जागा निश्चितच वेगळी असते. आई-वडीलांच्या या अतूट संबंधास किंवा जागेस, अधिकारास जो तडा देतो, म्हणजेच ज्याला आई-वडील आवडत नाहीत, अशा मूर्खांचे तोंड सुध्दा पाहण्याची वेळ आपल्यावर येऊ नये. कारण हे मूर्ख म्हणजे चालते-बोलते पापाचे पुतळे होत. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**तुका म्हणे पाप । माय नावडे ज्या बाप**

ज्याला जन्मदाते म्हणजेच आई-वडील आवडत नाहीत, तो कितीही मोठ्या पदावर असला किंवा सत्ताधिश असला तरीही त्याचे मोठेपण व्यर्थ असते. मूळात आई-वडीलांचे छत्र लाभायलाच भाग्य लागते. अन्यथा आपण पाहतो की अनेकांचे आई किंवा वडील किंवा दोघेही जन्मत:च त्यांच्या लहानपणीच वारलेले असतात. त्यामुळे अशांना खूप तळमळ असूनही ते आई-वडीलांची सेवा करू शकत नाहीत. म्हणून ज्यांना कोणाला आई-वडीलांचे छत्र लाभले आहे, त्यांनी आपल्या आई-वडीलांच्या सेवेची संधी अजिबात दवडू नये. भक्त पुंडलिक, श्रावण बाळ, संत रोहिदास ही मंडळी आई-वडीलांच्या सेवेमुळे अजरामर झाली आहेत. या संत महात्म्यांचे गुणगाण आपण करतो आणि त्यांच्या गुणाप्रमाणे आपण गुण अंगिकारत नाही, हे दुर्दैव नव्हे तर काय? संपत्तीसाठी किंवा इच्छापूर्तीसाठी जन्मदात्या आई-वडीलांचा अवमान करणारे, त्यांना बाजूला टाकणारे, त्यांच्यापासून दूर निघून जाणारे किंवा सदैव त्यांची अवहेलना करणारे मूर्ख समाजात कांही कमी नाहीत. आई-वडीलांविषयीचा संत, महात्म्यांचा दृष्टीकोन आपण अंगिकारला तर वृध्दाश्रम ओस पडून कुटूंब फुलू लागतील. आई-वडीलांच्या छत्रछायेत आपणा सर्वांचे संसार फुलत राहावेत अशी संत श्री ज्ञानोबा-तुकोबाराय चरणी प्रार्थना. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : सोमवार,
दि. २२ जून २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - ज्येष्ठ शु. अष्टमी
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- उ.फाल्गुनी(१०.२१)
योग - व्यतिपात (१०.३०)
करण - बालव (२८.०४)
राहू काल : सोमवार
स. ०७.३० ते ०९.००

दिनविशेष : १८९७ : पुण्यामध्ये प्लेगच्या साथीदरम्यान झालेल्या जुलमाचा बदला घेण्यासाठी दामोदर हरी चाफेकर यांनी ब्रिटिश अधिकारी चार्ल्स रँड याच्यावर गोळ्या झाडल्या. १९४०: दुसरे महायुद्धः फ्रान्सने जर्मनीसमोर शरणागती पत्करली. १९४१: नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सावरकर सदन येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भेट घेतली.

# शहरातील विविध शाळांमध्ये योग दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जून-**

**शहरातील विविध शाळेतील २१ जून रोजी बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योग प्रशिक्षकांनी विविध योगासने, प्राणायाम आणि श्वसनाच्या व्यायामांचे प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन तसेच विविध संतुलनात्मक आसने प्रभावीपणे सादर केली. एकूणच, काय तर शहर व जिल्ह्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी योगविषयक धडे गिरविल्याचे चित्र दिसून आले.**



## सिंहगड पब्लिक स्कूल

केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावर्षीच्या 'योगा फॉर हेल्दी एजिंग' या संकल्पनेनुसार निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवनासाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगावचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले उपस्थित होते. कार्यक्रमात अध्यक्षांनी स्वतः शिक्षक व पालकांसमवेत विविध योगासने करून उपस्थितांना प्रेरणा दिली. या उपक्रमामुळे आरोग्याविषयी जनजागृती होण्यास मदत झाली असून सर्वांनी नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प केला.

## श्राविका संस्था



पी.एस.व्ही. ट्रस्ट श्राविका संस्था श्री सिद्धिविनायक योग व प्राणायाम पतंजली योग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन श्राविका संस्थेच्या प्रांगणा साजरा झाला.

याप्रसंगी सिद्धिविनायक योग समितीच्या योग प्रशिक्षिका वसुंधरा पवार, चंद्रकांत पवार, स्नेहा मेहता, उषा क्षीरसागर, रघुनाथ क्षीरसागर, श्राविका संस्थेच्या वरिष्ठ मार्गदर्शिका दीप्ती शहा, मुख्याध्यापिका अश्विनी पंडित, मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, मुख्याध्यापिका राखी देशमाने, प्राचार्य विलास लेंगरे, उपमुख्याध्यापिका माधवी खोत, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ,जयेश शिरढोणे, अर्चना अक्कलकोटे, कल्पना राणावत काटकर, यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन करून प्रतिमा पूजन करण्यात आले. या आंतरराष्ट्रीय योग प्रात्यक्षिक मध्ये १५०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे यांनी योग दिनाचे महत्त्व सांगितले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना वसुंधरा पवार, चंद्रकांत पवार यांनी योगासनाच्या प्रात्यक्षिक घेतले. सूत्रसंचालन अनुप कस्तुरे यांनी केले तर पाहुण्यांच्या परिचय, राजश्री आगरखेड तर आभार माणिकशेटे यांनी मानले. योग दिन यशस्वी करण्यासाठी रोहन घाडगे, अजित पाटील, कल्याण अप्पा हायगोंडे, सोमनाथ मगर, अभिनंदन उपाध्ये, अभिजित पाटील, कविता उपाध्ये, प्रियंका जैन, अनंत बेळ्ळे शिंदे, जाधव, विश्वजीत मोहोळे, मनोज शहापुरे, योगेश गिरी, यांनी परिश्रम घेतले.

## एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल



एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रसिद्ध योग प्रशिक्षक ऋषिकेश राजेश पुट्टा यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुख्याध्यापिका रेखा पाटील आणि ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य राजकुमार गायकवाड यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. योग दिनानिमित्त आयोजित विशेष सत्रात ऋषिकेश पुट्टा यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. योग ही केवळ व्यायामपद्धती नसून निरोगी, सुदृढ आणि संतुलित जीवन जगण्याची जीवनशैली आहे, हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये योगाचे महत्त्व रुजविणे तसेच संतुलित जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करणे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे मुख्याध्यापिका पाटील यांनी सांगितले.



सोलापूर : योग दिनानिमित्त नेहरुनगर येथील शासकीय मैदानावर रविवारी मॉर्निंग प्राणायम ग्रुपचे पुरुष व महिला सदस्य योग करताना.



## जैन गुरुकुल प्रशाला

श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेत योग दिवस मुख्याध्यापक राजकुमार काळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, परीक्षा विभाग प्रमुख राजेश मोहोळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. तद्नंतर सहशिक्षिका पूजा काटकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी योगशिक्षक सुभाष उपासे यांनी विविध आसनांचे महत्त्व सांगत प्रात्यक्षिके सादर करण्यासाठी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक राजकुमार काळे व सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांबरोबर योग प्रात्यक्षिकेत सहभाग घेत आनंद लुटला. सहशिक्षक विजयकुमार काळेगोरे, यांनी विश्वप्रार्थना सादर केले. तद्नंतर मुख्याध्यापक राजकुमार काळे यांनी आपल्या मनोगतातून सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेतील मिलिंद खोबरे, प्रसन्न काटकर, प्रसाद कुलकर्णी, अरविंद गोटीमुकूल यांनी परिश्रम घेतले. सहशिक्षक विकास शिळ्ळे यांनी सूत्रसंचालन केले तर क्रीडा विभाग प्रमुख संजय पंडित यांनी आभार मानले.

## श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळा

श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळेत २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यावेळी आपल्या शाळेचे मुख्याध्यापक सचिन जाधव व सुधाकर कामशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या शाळेतील योगशिक्षक सिद्धाराम व्हनसुरे यांनी प्रार्थना, शिथिलीकरण, व्यायाम, योगासन, प्राणायाम, भ्रामरी, ध्यान, संकल्प व शांतीपाठ घेतले व योगाविषयीचे महत्त्व सांगितले. याप्रसंगी मुख्याध्यापक सचिन जाधव सुधाकर कामशेट्टी उपस्थित होते.





## एसपीएम पॉलिटेक्निक

भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर प्रभाग क्रमांक २६ आणि शि. प्र. मंडळ, कुमठे यांच्या संयुक्त विद्यमाने एस.पी.एम. पॉलिटेक्निक येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास पतंजली योग समितीच्या योग शिक्षिका मंगल गायकवाड, निलीमा मोंढे, आशा जेधे व तन्वी निंबाळकर यांनी उपस्थित राहून विविध योग प्रात्यक्षिके सादर केली. प्रास्ताविक संस्थेचे मुख्य विश्वस्त तथा नगरसेवक जयकुमार माने यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर विश्वस्त स्वाती माने, ब्रह्मदेवदादा माने बँकेचे संचालक सचिन चौधरी, एसपीएमच्या प्राचार्या रोहिणी चव्हाण, माध्यमिक प्रशालेचे अंबादास रेडे सर, आदर्श बालविकासच्या जमखंडीकर मॅडम, पर्यवेक्षक क्षीरसागर, लिटिल स्टारचे समन्वयक मलकारी कोरे उपस्थित होते. योग शिक्षिका मंगल गायकवाड यांनी विविध योगासने, प्राणायाम व योगाभ्यासाचे प्रात्यक्षिक सादर करुन दाखविले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर जाधव तर आभार विजयसिंह क्षीरसागर यांनी मानले.

## स्वामी विवेकानंद प्रशाला

स्वामी विवेकानंद प्रशालेत जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजेश्वरी कोंगारी, संगीता गुंडू व मुख्याध्यापक डॉ. हणमंत नारायणकर उपस्थित होते. योगसनांमुळे शारीरीक व मानसिक अरोग्य उत्तम राहते. हा दिवस एक पृथ्वी, एक स्वास्थ्य या मुख्य संकल्पनेवर आधारित आहे.

सूत्रसंचालन क्रीडाशिक्षक सुभाष माने यांनी केले तर आभार खंडू शिंदे यांनी मानले. प्रशालेतील सहशिक्षकांनी विद्यार्थ्यांबरोबर योगासनाची विविध प्रकार केले. यावेळी मच्छिंद्र सपताळे, संजय राठोड, गणपती कोळी, उज्वला हिंगमिरे उपस्थित होते. कार्यक्रमास सर्व शिक्षक उपस्थित होते.



## एसपीएम इंग्लिश स्कूल

शि.प्र.मंडळी पुणे संचलित एसपीएम इंग्लिश स्कूल येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या योग प्रशिक्षिका प्रतिमा स्वामी या उपस्थित होत्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने, प्राणायाम व ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी प्रतिमा स्वामी यांनी योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व सांगताना नियमित योगाभ्यासामुळे शरीर निरोगी राहते, मन शांत व एकाग्र होते तसेच आत्मविश्वास वाढतो, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमास शाळेच्या प्राचार्या संगीता कोळी सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शाळा समिती अध्यक्ष अनिल बर्वे व सदस्य सुरेश मंकणी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



## ठोकळ प्रशाला

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय येथे २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रशालेतील विद्यार्थी, विद्यार्थिनीसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी प्रणिती सांगलीकर व रक्षिता हावळे या विद्यार्थिनींच्या मार्गदर्शनाखाली ओंकार सूर्य नमस्कार, कपालभाती, भ्रामरी, शिताली, अनुलोम- विलोम, वज्रासन, भुजंगासन, शवासन इत्यादी प्राणायाम व आसने घेण्यात आले. योग दिनाच्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अँड. विपीन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ व संचालिका शिल्पा ठोकळ यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमासाठी प्राचार्य डी. डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी सहशिक्षक सुरवसे ए. पी. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आभार चव्हाण पी. एच. यांनी मानले.



## अनुभव प्रतिष्ठान

२१ जून रोजी संपूर्ण जगभरात जागतिक योग दिन साजरा केला जात असताना, अनुभव प्रतिष्ठान यांच्या वतीने शिवदासमय सांस्कृतिक भवन शेळगी येथे हा दिवस साजरा करण्यात आला. शिवशिंपी समाजाचे अध्यक्ष शिवानंद नसली साहेब व योगगुरू शोभा तोरणगी यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन व भारत मातेचे प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश भाईकट्टी यांनी मांडले. सूत्रसंचालन प्रतिष्ठानचे सचिव गणेश येळमेली यांनी केले तर आभार प्रतिष्ठानचे महिला अध्यक्ष श्वेता कालदीप यांनी मानले.



## नूमवि मराठी शाळा

नू.म.वि मराठी शाळेत आंतरराष्ट्रीय योगदिन विविध प्रात्यक्षिकांनी साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांनी आपल्या प्रास्ताविकेतून निरोगी जीवन जगण्यासाठी, मनाची एकाग्रता वाढवण्यासाठी योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

प्रमुख पाहुणे योगगुरु ऋषिकेश पुट्टा यांचा सत्कार माननीय मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे योगगुरु ऋषिकेश पुट्टा यांनी प्रार्थना घेऊन योगाचे विविध प्रकार व सूर्यनमस्कार विद्यार्थ्यांकडून करून घेतले. यानंतर इयत्ता चौथी 'आ' च्या विद्यार्थ्यांनी योग, व्यायाम आणि नृत्य यांचा सुंदर संगम असलेले तालबद्ध योग नृत्य सादर केले. या नृत्याला वर्गशिक्षिका नवगिरे यांनी मार्गदर्शन केले.

शाळेतील सहशिक्षक मधुरे यांनी संगीत कवायत प्रकार घेतले. इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व शिक्षकांनी संगीत कवायत प्रकार केले. सूत्रसंचालन नर्मदा कनकी यांनी केले. आभार सुवर्णा आळसंदे यांनी मानले.

## महात्मा विद्या मंदिर व सोमनाग प्रशाला

जागतिक योग दिनानिमित्त महात्मा विद्या मंदिर व सोमनाग प्रशाला, सुनील नगर येथे योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका शारदा चौगुले होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नागराज चौगुले, सोमनाग प्रशालेचे मुख्याध्यापक शहाजी नीळ, योग प्रशिक्षक कल्पना कोटा, रेवती दिकोंडा, प्रभाकर बंडा उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात प्रार्थना व योग दिनाच्या महत्वाविषयी माहिती देवून करण्यात आली. प्रशिक्षक व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने, प्राणायाम, सूर्यनमस्कार तसेच ध्यानधारणा यांचा सराव केला. प्रत्येक योगप्रकारचे शरीरावर होणारे सकारात्मक परिणाम, श्वसनक्रियेचे महत्व आणि एकाग्रता वाढविण्यात ध्यानाची भूमिका याविषयी विद्यार्थ्यांन माहिती देण्यात आली. यावेळी विद्यार्थी व पालकांनी ही या उपक्रमात मोठ्या उत्सहाने सहभाग नोंदवून योगाभ्यासाचा आनंद घेतला. कार्यक्रमास मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## महत्वाचे...



### मेहता शाळेत योग दिन साजरा

**सोलापूर, दि. २१ जून-**

कै. वि. मो. मेहता माध्यमिक प्रशालेत योग दिन साजरा करण्यात आला. प्रशालेचे रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याने २५ योग शिक्षकांना निमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रभाकर जमखंडीकर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देत मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी आणि संतुलित जीवन जगण्याची एक जीवनशैली आहे. नियमित योगाभ्यासामुळे स्मरणशक्ती, एकाग्रता व आत्मविश्वास वाढतो. विद्यार्थ्यांनी दररोज काही वेळ योगासाठी दिल्यास अभ्यासातील ताण कमी होऊन मानसिक शांतता प्राप्त होते. यानंतर विद्यार्थी व शिक्षकांनी सामूहिकरीत्या विविध योगासने व प्राणायामांची प्रात्यक्षिके सादर केली. प्रास्ताविक व मान्यवरांचा सत्कार मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी केला तर सूत्रसंचालन प्रतिमा स्वामी यांनी केले.



### स्वामी समर्थ सेवाभावी संस्थेतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**बार्शी, दि. २१ जून -**

श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बार्शी यांच्यावतीने गरजू शालेय विद्यार्थ्यांना वही, पुस्तके व दप्तर वाटप कार्यक्रम उत्साहात झाला. कार्यक्रमाला मान्यवरांसह पालक, शिक्षक व स्वामीभक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पी. टी. पाटील हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रताप जगदाळे तसेच ढाळे पिंपळगाव येथील दत्त महाराज उपस्थित होते. मान्यवरांचा सत्कार झाल्यानंतर संस्थेचे सचिव शिंदे यांनी संस्थेच्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेत प्रास्ताविक केले. अध्यक्षीय भाषणात पी. टी. पाटील यांनी संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.



### सोजर प्रशालेत योग दिन साजरा

**बार्शी, दि. २१ जून-**

सोजर इंग्लिश स्कूल, प्राथमिक व माध्यमिक विभागातर्फे प्रशालेच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिवस आणि आंतरराष्ट्रीय संगीत दिवस साजरा करण्यात आला. प्रशालेच्या दोन्ही विभागांचे मुख्याध्यापक संदीप पोळ व नेटके यांच्या हस्ते योगगुरु श्री श्री रविशंकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शिक्षक तुषार गदगी यांनी योग दिवस व संगीत दिवसाचे महत्त्व सांगून प्रस्तावना केली. शिक्षक प्रसाद सहस्त्रबुद्धे, प्रमोदिनी गायकवाड व सोनाली नष्टे यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रकारातील निवडक योगासनांची प्रात्यक्षिके झाली. शिक्षक ब्रह्मदेव मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संगीताच्या तालावर विद्यार्थ्यांनी झुंबा डान्सचा आनंद घेतला. प्रशालेतील दोन्ही विभागाच्या सर्वच शिक्षकांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. माणिक कुलकर्णी व सहस्त्रबुद्धे यांच्या गीतांनी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### योग विहार येथे योग दिन साजरा

**सोलापूर, दि. २१ जून-**

आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळ, सोलापूर यांच्या वतीने विजापूर रोडवरील इंदिरानगरजवळील महातपस्वी कुमारस्वामीजी योगविहार येथे जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योगासन व प्राणायामाची प्रात्यक्षिके घेण्यात आली. आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळाचे अध्यक्ष श्री. राजेंद्र मायनाळ यांच्या मार्गदर्शनाखाली योगशिक्षिका संध्यारजनी दानवे यांनी विविध योगासने व प्राणायामांचे मार्गदर्शन करून प्रात्यक्षिके सादर केली. कार्यक्रमात महिला व पुरुष योगसाधकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.महातपस्वी कुमार स्वामीजी योगविहार येथे गेल्या २० वर्षांपासून दररोज सकाळी ६ ते ७ या वेळेत योगासन वर्ग विनामूल्य चालविले जात असून अनेक नागरिक त्याचा लाभ घेत आहेत.या कार्यक्रमास आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळाचे विश्वस्त विश्वनाथ म्हेत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विश्वनाथ म्हेत्रे तसेच उपस्थित योगसाधकांच्या हस्ते योगशिक्षिका संध्या रजनी दानवे यांचा सत्कार करण्यात आला.

### कवी संतोष चिले यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान

**सांगोला, दि. २१ जून-**



सिंधुदुर्ग येथील कवी संतोष चिले यांना युगंधरा मराठी साहित्य, कला व सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे यंदाचा युगंधरा आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्यवीर सावरकर काव्यमुकुटमणी पुरस्कार प्रदान करण्यात आला. युगंधरा आंतरराष्ट्रीय स्वातंत्र्यवीर सावरकर काव्यलेखन स्पर्धेमध्ये संतोष चिले यांनी साकारलेल्या अद्वितीय काव्यनिर्मितीबद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात आला. यापूर्वीही त्यांना छत्रपती शिवाजी महाराज प्रेरणा पुरस्कार २०२६ व दादासाहेब राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत.

# आरोग्य उपकेंद्रात बाहेरगावच्या आशा सेविकेची नियुक्ती

## झिंजेवाडीतील प्रकार : ग्रामस्थ आक्रमक; निवड रद्द करण्याची मागणी, पिलीव वैद्यकीय अधिकारी व तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांचे परस्पर विरोधी दावे

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २१ जून-**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती (पिलीव) गावात आशा स्वयंसेविकेच्या रिक्त एका जागेसाठी गवातील महिलांना डावलून गारवाड येथील महिलेची निवड करण्यात आली आहे. निवडीवर संताप व्यक्त करत निवड रद्द करण्याची आक्रमक मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.




झिंजेवाडी आरोग्य उपकेंद्रात आशासेविकेची एक जागा रिक्त होती. त्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते. गावातील १४ महिलांनी यासाठी रितसर अर्ज केले होते. आरोग्य खात्याच्या निकष व नियमानुसार आलेल्या सर्व अर्जाची रितसर छाननी करुन याठिकाणी योग्य त्या गावातील महिलेची या जागेवर नियुक्ती करणे आवश्यक होती. मात्र या ठिकाणी गावातील अर्ज केलेल्या सर्व महिलांना डावलून गारवाड येथील नसीमा आतार यांची आशा स्वयंसेविका म्हणून नियुक्ती केली आहे.

संबंधित नियुक्तीला झिंजेवस्ती येथील सर्वच ग्रामस्थांनी कडाडून विरोध केला आहे. २९ मे रोजी झालेल्या ग्रामसभेत माजी ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल मदने यांनी सदरच्या आशा स्वयंसेविकेच्या नेमणुकीबबाबत प्रशासक कोळी व सचिव यांना विचारले असता त्यांनी याबाबत उत्तर देण्यास टाळाटाळ केली. याठिकाणी चुकीच्या पद्धतीने नियुक्त केलेल्या आशा स्वयंसेविकेच्या नियुक्ती विरोधात झिंजेवस्ती ग्रामस्थांनी जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हा वैद्यकीय अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सोलापूर, माळशिरस पंचायत समितीचे सभापती, समितीचे उपसभापती यांच्याकडे लेखी तक्रार करुन ताबडतोब सदरची नियुक्ती रद्द करावी व झिंजेवस्ती गावातीलच महिलेची निवड करण्याची मागणी केली आहे. दरम्यान या निवडीबाबत पिलीवचे वैद्यकीय अधिकारी व माळशिरस तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्या बोलण्यातून परस्परविरोधी दावे केले जात आहेत. त्यामुळे ही निवड आणखीनच वादात सापडली आहे.

**स्थानिक रहिवासी नाहीत : पिलीव वैद्यकीय अधिकारी**

पिलीव येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास जाधव यांनी याबाबत बोलताना सदर नियुक्त केलेल्या आशासेविका या झिंजेवस्ती येथील रहिवाशी नाहीत. त्यांच्या आधार कार्डवरील पत्ता हा गारवाड (मगरवाडी) असल्याचे म्हटले आहे.

**निवड पूर्णपणे पारदर्शक : तालुका वैद्यकीय अधिकारी**

दरम्यान याबाबत माळशिरस तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. जानकर यांना विचारले असता त्यांनी संबंधित निवड पुर्णपणे पारदर्शक व शासनाच्या नियमानुसार केली आहे. त्यांनी दिलेले सर्व पुरावे गावातीलच आहेत. ग्रामपंचायतीने यामध्ये हरकत घेणे आवश्यक आहे. सर्व दिलेल्या पुराव्यानिशी व शासनाच्या नियमानुसारच निवड केली आहे. तक्रारीत कोणतेही तथ्य नाही.

# चित्रकार चेतन भोसले यांची भारत सरकारच्या फेलोशिपसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २१ जून-**

मुळचे श्रीपूर ता.माळशिरस (सध्या वास्तव्य पुणे) चेतन भोसले यांची समकालीन चित्रकार म्हणून भारत सरकारच्या प्रतिष्ठित ज्युनियर फेलोशिप २०२५/२०२६ साठी निवड करण्यात आली. देशपातळीवर या फेलोशिपसाठी महाराष्ट्रातून तीन चित्रकार निवडले गेले आहेत. चेतन भोसले यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्रातील समकालीन चित्रकार व इंस्टॉलेशन कलाकार चेतन जयंत भोसले यांची भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालया तर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या ज्युनिअर फेलोशीप निवड झाली आहे. ही निवड दृश्यकला, चित्रकला या क्षेत्रात केली आहे. देशभरातील निवडक कलाकारांमध्ये त्यांचा समावेश आहे. संस्कृती मंत्रालयाच्या तज्ञ समितीने कला क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य संशोधनाची क्षमता सर्जनशील दृष्टी आणि सांस्कृतिक योगदान यांचा विचार करून ही निवड केली आहे. ही फेलोशिप भारतातील उदयोन्मुख आणि प्रतिभावान कलाकारांना त्यांच्या संशोधनाधारित कला प्रकल्पासाठी दिली जाते. चेतन भोसले हे समकालीन चित्रकला आणि इंस्टॉलेशन आर्ट या क्षेत्रात गेली अनेक वर्षे कार्यरत आहेत.

चेतन भोसले यांच्या कलाकृतीत निसर्ग स्मृती संघर्ष अध्यात्म सामाजिक वास्तव आणि पर्यावरणाच्या प्रश्न यांचे प्रभावी चित्रण आढळते. त्यांनी विविध



राज्यस्तरीय व राष्ट्रीय कला प्रदर्शनात सहभाग नोंदवून अनेक पुरस्कार व सन्मान प्राप्त केले आहेत. पुण्यातील अभिनव कला महाविद्यालयाचे विद्यार्थी असलेले चेतन भोसले यांनी आपल्या कला साधने द्वारे भारतीय समकालीन कलेमध्ये स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ही फेलोशिप त्यांच्या कलात्मक संशोधनाला नवी दिशा तसेच भविष्यातील महत्वाकांक्षी कला प्रकल्पांना बळ देणारी आहे. भारत सरकारची ज्युनियर फेलोशिप ही देशातील कला साहित्य आणि संस्कृती क्षेत्रातील संशोधन व सर्जनशील कार्याला प्रोत्साहन देणारी अत्यंत प्रतिष्ठेची योजना मानली जाते.

**कलात्मक प्रवासातील अत्यंत महत्वाचा टप्पा**

ही फेलोशिप माझ्या कलात्मक प्रवासातील अत्यंत महत्वाचा टप्पा आहे. या माध्यमातून मला संशोधन, प्रयोगशीलता आणि सर्जनशील अभिव्यक्ती यांना अधिक व्यापक स्वरूप देता येईल.

**- चेतन भोसले,**
चित्रकार व इंस्टॉलेशन कलाकार

## सांगोला नगरपरिषद साजरा करणार एकल महिला दिवस

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ जून-**

नगरपरिषद सांगोला यांच्या वतीने मंगळवार दि.२३ जून रोजी एकल महिला दिवस साजरा करण्यात येणार आहे. या निमित्त सकाळी दहा वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह, सांगोला येथे विशेष कार्यक्रम होणार आहे.

एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाच्या विविध योजना, हक्क व सुविधा यांची माहिती या कार्यक्रमाद्वारे देण्यात येणार आहे. तसेच महिलांच्या समस्या, गरजा आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

तरी नगरपरिषद हद्दीतील सर्व एकल महिलांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्ष आनंदा माने, महिला व बालकल्याण सभापती छाया मेटकरी तसेच मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी केले आहे.



## गणेश कमळे परिवारातर्फे नगरसेवक महेश इंगळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ जून-**

सलग सहाव्यांदा नगरसेवकपदी निवडून आल्याबद्दल येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा भाजप नगरसेवक महेश इंगळे यांचा भाजप नवी मुंबईचे उपाध्यक्ष गणेश कमळे परिवारातर्फे सत्कार करण्यात आला.

सत्कार सोहळा येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानात झाला. यावेळी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानतर्फे गणेश कमळे व कुटुंबीयांचाही श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, देऊन नगरसेवक महेश इंगळे यांनी सन्मान केला. यावेळी नवी मुंबई जिल्हा महिला मोर्चा अध्यक्षा राजश्री कमळे, समाजसेविका आरती सगर, पूजा शेट्टी, विहान शेट्टी, मेघा भूतांनाल यांचा सत्कार झाला. स्वामींच्या दर्शनानंतर महेश इंगळे यांचा श्रीफळ, शाल आणि स्वामींच्या गळ्यातील हार देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक आणि धार्मिक कार्याचे कौतुक केले. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, संजय पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे उपस्थित होते.




## बार्शीत नेत्र तपासणी शिबीर; ५३ जणांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २१ जून-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व मातृभूमी प्रतिष्ठान बार्शी संचलित श्री भगवंत नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबीर झाले.

शिबिरात ५३ प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांची नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच २० शिबिरार्थींनी नेत्रदानाचा लिखित संकल्प केला.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे, श्री भगवंत नेत्रालयाचे अध्यक्ष प्रा. किरण गाढवे, नेत्रतज्ञ डॉ. अभिजित आडसूळ, मात्रभूमी प्रतिष्ठानचे सदस्य प्रा. कल्याण घळके, डॉ. मनोज चिकराम, प्रा. समाधान लोंढे, प्रा. कृष्णा माळी, डॉ. महादेव ढगे, शुभम रांजवान, सुजाता गायकवाड उपस्थित होते.

# पिलीव येथील कालव्यावरील पूल संरक्षक कठड्यांविना

### अँगलही तुटलेले; वारंवार अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२१ जून-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील निरा उजवा कालव्यावरील पुलाला एका बाजुचे संरक्षक कठडे नाहीत. तसेच अँगलही पुर्णपणे तुटून गेल्यामुळे याठिकाणी वारंवार अपघात घडत आहेत.

सदर ठिकाणी पिलीवहून पंढरपूरकडे वाहने जात असताना बरोबर कालव्यावरील पुलावर जाताना अपघाती वळण आहे. वाहने वेगाने येतात, मात्र वळणाचा अंदाज न आल्यामुळे अनेकदा ही वाहने सरळ कालव्यात जातात. पुलावरून रात्रंदिवस वाहनांची सतत रहदारी असते. पुलावरून मोठ्या संख्येने भाविक पंढरपूर, तुळजापूर, गाणगापूर, गोंदवले, शिंगणापूर याठिकाणी ये-जा करतात. महामार्गाचे काम करीत असताना संबंधित कंपनी ठेकेदाराकडे याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या. पुलावरील संरक्षक कठडे किंवा तुटलेल्या पुलावर लोखंडी अँगल बसविण्याची मागणी केली. मात्र संबंधित कंपनी तसेच ठेकेदार याने कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही. परिणामी याठिकाणी या पुलावरून चारचाकी-दुचाकी वाहनांचे संरक्षक कठडे व त्यावर अँगल नसल्यामुळेच अपघात होत आहे. आता पुढील महिन्यात आषाढी वारी आहे; यानिमित्त याच पुलावरून वाहनांची अक्षरक्षः रीघ लागते. तेव्हा कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी आषाढी वारीपुर्वी ताबडतोब कालव्यावरील पुलाला संरक्षक कठडे तसेच संरक्षक लोखंडी अँगल बसविण्याची मागणी ग्रामस्थ तसेच प्रवाशांमधून होत आहे.



पिलीव येथील निरा उजवा कॅनॉलवरील पुलाचे संरक्षक कठडे व अँगल तुटल्याचे बोलके चित्र.

**आषाढी वारीपूर्वी हा प्रश्न मार्गी लावेन**

पिलीवनजीक असणाऱ्या निरा उजव्या कालव्यावरील पुलाचे संरक्षक कठडे तसेच लोखंडी अँगल तुटुन गेल्यामुळे याठिकाणी वारंवार अपघात होत आहेत. याबाबत मी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी बोलून आषाढी वारीपुर्वी हा प्रश्न मार्गी लावेन.

**- नम्रता पुकळे,**
सदस्या, पिलीव पंचायत समिती गण.

# पंढरपुरातील सागर जाधव यांचे ‘घबाडकुंड’मध्ये दिग्दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ जून-**

येथील युवा,सर्जनशील सहाय्यक दिग्दर्शक सागर जाधव यांचा घबाडकुंड हा सस्पेन्स, हॉरर, कॉमेडी मराठी चित्रपट शुक्रवार दि. १९ जून रोजी राज्यात प्रदर्शित झाला. विशेष म्हणजे चित्रपटाचे सहायक दिग्दर्शक म्हणून पंढरपूरच्या सागर जाधव यांनी काम आहे. पंढरपूर सारख्या ग्रामीण भागातून एका उदयोन्मुख युवा दिग्दर्शकाने सोलापूर जिल्ह्याचे नाव उंचीवर नेले आहे.

सागर जाधव यांना बालपणापासूनच सिनेक्षेत्राचे आकर्षण आहे. सागर यांनी बाहुबली १, वेडात वीर दौडले सात, एलिझाबेथ एकादशी, रिंगण, जिगरिया (हिंदी), कन्यारत्न आदी सिनेमात अभिनयही केला आहे. मात्र सहाय्यक दिग्दर्शक म्हणून घबाडकुंड हा पहिलाच चित्रपट असल्याचे सागर यांनी सांगितले. चित्रपटाचे दिग्दर्शक प्रीतम एस के पाटील हे असून पुणे येथील लोणी काळभोर परिसरातील डोंगराळ भागात, निबीड जंगलात या सिनेमाचे सलग चित्रीकरण केले आहे.



घबाडकुंड हा चित्रपट हिंदी भाषेत देखील डब करण्यात येणार आहे. सिनेमाची पटकथा संजय नवगिरे, कथा अक्षय धर्मपाल, डी आर रसिक कदम यांची असून संगीत अभय जगताप यांचे आहे. चित्रपटाविषयी माहिती देताना सहाय्यक दिग्दर्शक सागर जाधव म्हणाले, हा चित्रपट युनिव्हर्सल आहे. रहस्यमय असा थरार, वेगळेपण असणार आहे. हॉरर फिल्म असल्याने साठ टक्के शूटिंग रात्री करण्यात आले आहे. सलग ४० दिवस चित्रीकरण सुरू होते. लोकांना असे सिनेमे आवडत असल्याने मराठीत एक वेगळा प्रयोग केला आहे.

**थ्रिलिंग अनुभवासाठी हा चित्रपट पहावा**

मराठी चित्रपट समृद्ध होत असून आता मराठी भाषेत मुंजा,दशावतार, तुंबाड, काळसेकर आहेत का?, स सासूचा, सावट, गाढ अंधार, लपाछपी, बाली, झोंबिवली, तुंबाडची मंजुळा असे वेगळ्या धाटणीचे चित्रपट तयार होत आहेत. घबाडकुंड हा चित्रपट जागतिक स्तरावर जाणार असून प्रेक्षकांनी वेगळ्या थ्रिलिंग अनुभवासाठी हा चित्रपट जरुर पहावा.

**- सागर जाधव**, युवा सहाय्यक दिग्दर्शक, पंढरपूर.

**यांच्या आहेत प्रमुख भूमिका**

चित्रपटात संदीप पाठक, देवदत्त नागे, शशांक शेंडे, प्राजक्ता हणमघर , कुशल बद्रिके, समिता पायगुडे यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.




## आपुलकी प्रतिष्ठानतर्फे गरजू महिलांना उपजीविकेची साधने वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ जून-**

सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने शहर व तालुक्यातील ५ गरजू महिलांना उपजीविकेची साधने वाटप करण्यात आली.

आपुलकी प्रतिष्ठान कार्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात पत्रकार भारत कदम, निसार तांबोळी व उद्योजक राजेंद्र बिरगे यांच्या हस्ते मेडशिंगी येथील निर्मला मोरे, शालन अवघडे, सांगोला येथील माया इंगोले यांना शेळी, पुष्पा पारसे यांना शिलाई मशीन तर वाटंबरे येथील उज्वला पवार यांना पिठाची गिरणी उपजीविकेसाठी भेट देण्यात आली. यावेळी भारत कदम यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी केले. कार्यक्रमाला आपुलकी प्रतिष्ठानचे सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


### एकता मंच, डोणगाव

उत्तर सोलापूर तालुक्यातील डोणगाव येथे एकता महिला मंचतर्फे योग दिन साजरा करण्यात आला. मंच महिला सदस्यांनी एकत्र येत योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा केली. महिलांना दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले उपक्रमात एकता महिला मंचच्या सावित्री पाटील, प्रीती येरनाळे, सुरेखा शेळके, संजीवनी शेळके, रेखा शेळके, आशा पाटील, निलगंगा येरनाळे, कोमल शेळके आणि पूजा चौगुले यांच्यासह इतर महिला पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.





## महत्त्वाचे...



### आर्या पब्लिक स्कूल, माढा

विठ्ठल प्रतिष्ठान, निमगाव (टे.) संचलित आर्या पब्लिक स्कूल, माढा येथे जागतिक योग दिन उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य एस. जे. थोरात यांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. यानंतर विद्यालयाचे क्रीडा शिक्षक व योग प्रशिक्षक शुभम पुरवत यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून दाखविले. कार्यक्रमास विद्यालयातील दत्तात्रय चव्हाण, मनोज नागटिळक, जयदेव गायकवाड, अतुल लंकेश्वर, रोहित भांगे, संध्या सरडे, वंदना गोसावी, सारिका यादव, प्रियंका काशीद, मेघा भांगे, रागिनी शिंदे, उज्वला हिप्परगी, प्रतीक्षा पाटील, प्रतिभा आलदर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल माजी जिल्हा परिषद सदस्य रणजितसिंह शिंदे, व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे तसेच कार्यालयीन अधीक्षक संभाजी पाटील यांनी विद्यालयाचे, शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.




### राऊंड टेबल जीवनज्योत प्रशाला, कंदलगाव

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथील राऊंड टेबल जीवनज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी दी. शि. कमळे यांच्या प्रतिमेचे पूजन बँक ऑफ इंडिया सात रस्ता सोलापूर शाखेचे मॅनेजर तथा योग मार्गदर्शक शांताप्पा सलगरे व सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे सहसचिव प्रा.सुबोध कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. शांताप्पा सलगरे यांनी विद्यार्थ्यांसमोर ताडासन, वृक्षासन, वज्रासन, उष्ट्रासन, मयुरासन, शीर्षासन आदी आसनांची प्रात्यक्षिके दाखवली. भस्त्रिका प्राणायाम, कपाल भाती, अनुलोम-विलोम, भ्रमरी प्राणायामही करुन दाखविले. यावेळी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे सहसचिव प्रा.सुबोध कोळी यांच्या हस्ते शांतप्पा सलगरे यांचा सत्कार करण्यात आला. प्रशालेचे प्राचार्य आर. बी. यलगोंडे, पर्यवेक्षक एस.बी.जमादार उपस्थित होते.



### एकता महिला मंच, भांडेगाव

जागतिक योग दिनाचे औचित्य साधून आज, २१ जून २०२६ रोजी बार्शी तालुक्यातील भांडेगाव येथे एकता महिला मंचतर्फे आयोजित कार्यक्रमात गावातील महिला सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. महिलांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा केली. योग साधना शिबिराला एकता महिला मंचच्या पदाधिकारी स्वाती शिंदे, दामिनी मंडलिक , आशा मंडलिक , पूजा मंडलिक, स्वाती मंडलिक , विद्या डिसले उपस्थित होत्या.




### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उपळाई (ठों), बार्शी

योग दिनाचे औचित्य साधून २१ जून रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठों.) येथे योगदिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक अनिल काळे यांनी योगाचे महत्व विशद करुन अनेक योग प्रकाराचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना ते करायला लावले. यात उभे राहून करावयाची आसने, बसून करावयाची आसने, पाठीवरील व पोटावरील आसने यांचा समावेश होता. यावेळी शिक्षक रामचंद्र बरचे, प्रभाकर काटे, दिपाली गोरे यांनीही सहभाग नोंदविला. यावेळी आनंद घाडगे, सुवर्णगौरी गवळी, मीरा गरड, वैशाली खुने, आनंद घाडगे उपस्थित होते.

# जिल्ह्यात जपला योग साधनेने आरोग्याचा मंत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जून-**

जागतिक योग दिनानिमित्त जिल्ह्यात बहुतांश शाळा, महाविद्यालयांसह योग संस्था, सामाजिक संघटनांनी योगाभ्यास केला. सर्वत्र सकाळच्या प्रहरी मान्यवरांसह विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी योग दिनानिमित्त उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. योग प्रशिक्षकांचे तज्ज्ञ मार्गदर्शन, विविध आसनांची माहिती व फायदे जाणून घेतले. जिल्हाभरात लाखो अबालवृद्ध नागरिक, महिलांनीही योग चळवळीत सहभाग घेत वर्षभरासाठी निरोगी आयुष्य जपण्यासाठी सातत्यपूर्ण योगाभ्यास करण्याचा संकल्प घेतला.

## जागतिक योग दिन; शाळा, महाविद्यालयांसह अन्य संस्थांतर्फे उत्साहात योगाभ्यास

### लक्ष्मी आनंद विद्या मंदिर, टेंभुर्णी

लक्ष्मी आनंद विद्या मंदिर व ज्युनिअर कॉलेज येथे योग दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पतंजली परिवाराच्या योग प्रशिक्षकांच्या उपस्थितीत प्रतिमापूजन करून करण्यात आली.

कार्यक्रमासाठी पतंजली परिवाराकडून संजय बोराटे, दिलीप जाधव, जवाहरलाल लोंढे, लक्ष्मण शीद हे योग प्रशिक्षक प्रमुख उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने व व्यायाम प्रकारांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासनांचा सराव केला. प्रशालेतील विद्यार्थिनींनी योग दिनाचे महत्त्व विशद करणारे आकर्षक नृत्य सादर केले.



संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे व सचिव सुरज बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास प्राचार्य विकास करळे, पी.आर.ओ. खुळे उपस्थित होते.

### सांगोला विद्यामंदिर, सांगोला

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी योगगुरू डी. डी.जगताप, अरविंद डोंबे यांनी योगाचे महत्त्व पटवून दिले. डी.डी. जगताप यांनी केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाने मान्यता दिलेल्या अत्यंत महत्त्वाच्या चार प्राणायामांची माहिती दिली. उभे राहून आणि बसून करायची आसने, प्राणायाम याविषयीचे शास्त्रशुद्ध नियम समजावून सांगितले. त्यांनी स्वतः उत्तम प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी चैतन्य हास्य योग मंडळाचे सदस्य प्रा.राजेंद्र ठोंबरे यांनी निवृत्त शिक्षकांना व उपस्थितांना चैतन्य हास्य योग मंडळामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. याप्रसंगी चैतन्य हास्य योग मंडळाचे सदस्य, सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य चारूदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक उत्तम सरगर, काकासाहेब नरूटे, शुभांगी घोंगडे यांच्यासह प्रशालेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डी.के.पाटील यांनी केले. आभार प्रदीप धुकटे यांनी मानले.

### योगदिनानिमित्त वारी परिवाराची मंगळवेढा-माचणूर सायकल राईड

प्रत्येक माणसाचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य उत्तम राहण्यासाठी योगासन हाच उत्तम पर्याय आहे हा संदेश देण्यासाठी मंगळवेढ्यातील वारी परिवार सायकल क्लबच्या वतीने २१ जून आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त मंगळवेढा-माचणूर सायकल राईड काढण्यात आली.



राईडमध्ये 'सायकल चालवा, इंधन वाचवा. योग करूया, निरोगी राहूया' असा नारा देण्यात आला. सध्या धावपळीच्या युगात योगाबरोबरच सायकलिंग करणेही खूप आवश्यक आहे. यासाठी मंगळवेढा-माचणूर-मंगळवेढा ३० किलोमीटर सायकल राईड काढून जनजागृती करण्यात आली. यावेळी भीमा नदीच्या काठावर निसर्गरम्य वातावरणात सिद्धेश्वर मंदिराच्या घाटावर योगासनाची प्रात्यक्षिके करुन योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी राईडमध्ये सायकल क्लबचे अध्यक्ष स्वप्निल टेकाळे, रिदम शहा, राहुल सांवंजी, अविनाश जाधव, प्रफुल्ल सोमदळे, सचिन साळुंखे, विवेकानंद वाले, सिद्धेश्वर डोंगरे, चंद्रजीत शहा, कमलेश माळी, विष्णू भोसले, प्रा. विनायक कलुबर्मे सहभागी होते.

### जिल्हा परिषद मुलींची केंद्र शाळा, माढा



माढा जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची केंद्र शाळा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. सकाळी ७ वाजता विद्यार्थिनींनी विविध योगासने व प्राणायाम ंचे प्रभावी सादरीकरण केले. योगगुरू लोंढे व प्रवीण भांगे यांनी योगासने व प्राणायामाचे महत्त्व सांगत सुर्य नमस्कार, वृक्षासन, ताडासन, मकरासन, धनुरासन, गोमुखासन तसेच विविध प्राणायाम ंचे प्रात्यक्षिक सादर केले. विद्यार्थिनींनीही अतिशय उत्साहाने व शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदवत योगासने सादर केली. या प्रसंगी मुख्याध्यापक सुरेश माळी, शिक्षक विनोद परिचारक, चारुदत्त आष्टेकर, प्रशांत होवाळ, दत्तात्रय घुमरे, शिक्षिका लोखंडे उबाळे, नूतन कानडे व स्वाती घावटे उपस्थित होत्या. शिक्षकांनी विद्यार्थिनींना नियमित योगाभ्यासाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थिनींनी नियमित योग करण्याचा संकल्प केला.



### विद्या निकेतन प्रशाला, मोहोळ

मोहोळ तालुक्यातील मसले चौधरी येथील विद्या निकेतन प्रशालेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा झाला. संस्थेचे अध्यक्ष जनार्दन कादे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र जाधव यांच्या उपस्थितीत योग प्रशिक्षक शिवानंद बोधले यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्व अनन्यसाधारण असल्याचे सांगून योगसाधनेमुळे आपले शरीर लवचिक, मजबूत व मनाची एकाग्रता वाढते, असे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र जाधव हे होते. कार्यक्रमासाठी प्रशालेतील शिक्षक रविकांत साबळे, कांचन पवार, शहाजी आतकरे, सेवक गोविंद जांभळे यांनी परिश्रम घेतले.

### अनंत चैतन्य प्रशाला, हन्नूर

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला, हन्नूर येथे योगदिन साजरा करण्यात आला.

मुख्याध्यापक ज्ञानदेव शिंदे यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पुजन केले. शिक्षक शहाजी माने, राजेंद्र यंदे, मल्लमा चपळगाव, स्वप्नाली जमदाडे यांनी विद्यार्थ्यांना नियमित योग व प्राणायाम करण्याचे आवाहन केले. प्रशालेचे योगशिक्षक पर्यवेक्षक सुरेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना योगाभ्यासाचे धडे देण्यात आले. यावेळी प्रशालेतील मृदुलादेवी स्वामी, अप्पासाहेब काळे, धनंजय जोजन, शशिकांत अंकलगे, सागर मठदेवरु, अजीज मुल्ला, प्रा. कालीबत्ते व काशिनाथ पाटील उपस्थित होते. प्रशालेत आयोजित योग शिबिराचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार सचिन कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, माजी प्राचार्य सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, जि. प. सदस्या शांभवी कल्याणशेट्टी, उपसभापती सागर कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन



मसुती, शिक्षण विभागप्रमुख रुपाली शहा, विज्ञान विभागप्रमुख पुनम कोकळगी यांनी विद्यार्थ्यांचे तसेच योग मार्गदर्शक शहाजी माने व योग प्रशिक्षक सुरेश जाधव यांचे अभिनंदन केले.

### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेजमध्ये आज आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक बागल, उपप्राचार्य म ासाळ, सत्यवान वाघमारे, झाडे, मेटकरी सहभागी झाले होते. यावेळी योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगत प्रत्यक्ष योगाचे धडे देण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### द. ह.कवठेकर प्रशाला, पंढरपूर

पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द. ह. कवठेकर प्रशालेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा झाला. कार्यक्रमास मार्गदर्शक योगशिक्षक म्हणून योग विद्याधाम पंढरपूरचे राजेंद्र केसकर, स्वाती ननवरे, राणी वाघमोडे, मयुरी कोळी आणि चिंतामणी दामोदरे उपस्थित होते. मुख्याध्यापक व्ही.एम. कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. योगशिक्षक राजेंद्र केसकर व स्वाती ननवरे यांनी ओंकार, पूरक हालचाली, बैठक स्थिती दंड स्थितीतील आसने, सूर्य नमस्कार, प्राणायाम इत्यादी व्यायाम प्रकार प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांकडून करून घेतले. क्रीडा शिक्षक संतोष पाटोळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपमुख्याध्यापिका एस.आर. कुलकर्णी यांनी आभार व्यक्त केले. प्रशांत मोरे यांनी सूत्रसंचालन केले. जे.एम. शेलार, एम.बी.कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रमात ८५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

### पंढरपुरात विविध योगसंस्थांतर्फे योग दिन साजरा

तालुका प्रशासन, पांडुरंग परिवार, पतंजली योग संस्था, श्री विठ्ठल रुक्मिणी योग प्राणायाम संस्था, निसर्ग उपचार केंद्र यांच्या वतीने आरती मंडप प्रांगण येथे जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी तहसीलदार सचिन लंगुटे व युवक नेते अ‍ॅड. प्रणव परिचारक यांच्या हस्ते पी.एस.आय गोसावी, पंढरपूर अर्बन बँकेचे माजी चेअरमन रा.पा.कटेकर तसेच पतंजली संस्थेचे सुरेंद्र पिसे, अ‍ॅड. सुनिल वाळूजकर, ज्योती शेटे, अमृता परिचारक, वृक्षप्रेमी ग्रुप सोमनाथ होरणे, भाजप शहराध्यक्ष रोहित पानकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भारत मातेचे प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली.

तहसीलदार सचिन लंगुटे यांनी मानवी शरीर आणि मनाच्या आरोग्यासाठी योगाचे महत्त्व पटवून देणे हा या दिनाचा मुख्य



उद्देश आहे. २१ जून हा वर्षातील सर्वात मोठा दिवस असतो (उत्तरायण काळ). या दिवशी सूर्याची किरणे पृथ्वीवर सर्वाधिक काळ राहतात. भारतीय संस्कृती आणि विज्ञानानुसार, या काळातील निसर्गातील बदल मानवी शरीरासाठी सकारात्मक ऊर्जा देणारे मानले जातात, असे सांगितले. कार्यक्रमाचे स्वागत सुरेंद्र पिसे, प्रास्ताविक अ‍ॅड. सुनिल वाळूजकर, सूत्रसंचालन ज्योती शेटे यांनी केले. आभार उमा महाविद्यालयाचे प्राचार्य बाड यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ.संजय देशपांडे, मधुकर सुतार, प्रशांत आगावणे, रवींद्र कोडग, त्रिभुवन तारे, निसार शेख, चंदुलाल सुपेकर, आप्पासाहेब मुचलंबे, अ‍ॅड. रामलिंग कोष्टी, कांतीलाल सुपेकर, गजेंद्र माने यांनी प्रयत्न केले. यावेळी पंढरपूर शहरातील सर्व योग संस्थांचे पदाधिकारी व योग साधक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### बागल विद्यालय, कुंभेज

कुंभेज (ता.करमाळा) येथील दिगंबरराव बागल माध्यमिक विद्यालयात योग दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पाटील होते. यावेळी विद्यालयाचे क्रीडा शिक्षक विष्णू पोळ यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थिनी आकांक्षा क्षीरसागर व प्रणिती पवार यांनी योगासने सादर केली. कार्यक्रम ाच्या यशस्वी आयोजनासाठी कल्याणराव साळुंके, सिताराम बनसोडे, संतोष शिंदे, विष्णू पोळ, दादा जाधव यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किशोर कदम, संतोष घोरपडे, नंदकुमार कांबळे यांनी परिश्रम घेतले.